THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 8TH JUNE 1893.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

## सन १८८२ चा आक्ट ४ था.

सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद आक्ट.

### अनुक्रमणिका.

कलम.

बाब १.

प्रथमारंभींचे ठराव.

१. ल्हान सरनामा.
सुरुवात.
व्याप्ति.

२. आक्ट रद्द करणें.
विवक्षित कायदे, अनुषंगिक गोष्टी, हक्क, जबाबदाऱ्या, इत्यादिकांचा बचाव.

३. अर्थाचें कलम.
"स्थावर मिळकत."
"दस्तऐवज."
"नोंदलेला."
"जमिनीस लागून असलेला."
"खबर."

४. करारांविषयींचे ठराव करारांविषयींच्या आक्टांपैकीं आहेत असें समजावें.

कलम.

बाब २.

पक्षकारांनीं आपल्या कृत्यानें मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद.

(अ) स्थावर किंवा जंगम मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद.

५. "मिळकत तबदील करून देण्याचा व्यवहार" ह्या संज्ञेची व्याख्या.

६. कोणत्या गोष्टी तबदील करून देण्याचा अधिकार आहे.

७. मिळकत तबदील करून देण्याचा अधिकार कोणत्या मनुष्यांस आहे.

८. मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराचा काय परिणाम होतो.

९. मिळकत तोंडी तबदील करून देणें.

१०. विक्री वगैरेचा प्रतिबंध करणारी शर्त.

११. उत्पन्न केलेल्या हितसंबंधास विरुद्ध अशी अट घातली असतां काय होतें.

कलम.

१२. नादारी झाली असतां अगर हितसंबंध दुसऱ्यास देण्याचा प्रयत्न केला असतां हितसंबंध नाहींसा व्हावा अशी अट असल्यास काय होतें.

१३. न जन्मलेल्या मनुष्याच्या फायद्यासाठीं मिळकत तबदील करून देणें.

१४. निरंतरतेविरुद्ध ठराव.

१५. तबदील करून देण्याचा व्यवहार मनुष्यांच्या वर्गाच्या तर्फे झाला असून त्यांपैकीं कांहींस कलमें १३ व १४ हीं लागू असतील तर काय होतें तें.

१६. आधींचा हितसंबंध नाहींसा झाल्यावर ज्याचा अमल व्हावयाचा त्या तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद.

१७. सार्वजनिक हितासाठीं मिळकत निरंतर तबदील करून देणें.

१८. उत्पन्न जमूं देण्याबद्दल अट.

१९. निविष्ट हितसंबंध.

२०. न जन्मलेल्या मनुष्याच्या फायद्यासाठीं मिळकत तबदील करून दिल्यानें त्याला निविष्ट हितसंबंध केव्हां प्राप्त होतो.

२१. अवलंबी हितसंबंध.

२२. कोणत्याही वर्गातल्या विवक्षित वयांस पावलेल्या मनुष्यास तबदील करून देणें.

२३. विवक्षित अनिश्चित गोष्ट घडली तर मात्र हितसंबंध मिळण्याबाबद.

२४. निर्दिष्ट केलेल्या अशा वेळीं अवशिष्ट राहिलेल्या मनुष्यांपैकीं विवक्षित मनुष्यांस तबदील करून देणें.

२५. शर्तीवर तबदील करून देणें.

२६. आधींची शर्त पुरी करणें.

२७. पहिल्याच्या नांवची व्यवस्था रद्द झाल्यास दुसऱ्याच्या नांवची व्यवस्था अमलांत येईल अशा शर्तीवर कोणत्याही मनुष्यास तबदील करून देणें.

२८. अमुक गोष्ट घडण्याच्या अगर न घडण्याच्या शर्तीवर मिळकत दुसऱ्याला तबदील करून देणें.

२९. नंतरची शर्त पुरी करणें.

३०. नंतरच्या व्यवस्थेच्या बेकायदेशीरपणावरून आधींच्या व्यवस्थेला बाध येत नाहीं.

३१. विवक्षित अनिश्चित गोष्ट घडली असतां अगर न घडली असतां मिळकत तबदील करून देण्याचा व्यवहार रहित होईल अशी शर्त.

कलम.

३२. अशी अट बेकायदेशीर असूं नये.

३३. कृत्य करावें अशा अटीवर परंतु तें करण्याचा वेळ न सांगतां मिळकत तबदील करून देणें.

३४. अमुक कृत्य करावें अशा अटीवर आणि तें कृत्य करण्याची वेळ निर्दिष्ट करून मिळकत तबदील करून देणें.

दोहोंतून एक गोष्ट पत्करणें.

३५. दोहोंतून एक गोष्ट पत्करणें जरूर केव्हां होईल.

हिशांप्रमाणें वांटून देणें.

३६. हक्क असणाऱ्या असामीचा हितसंबंध संपल्यावर, मुदतीमुदतीनें यावयाच्या रकमा हिशांप्रमाणें वांटून देण.

३७. विभाग केल्यानंतर कर्तव्यतेचा फायदा हिशांप्रमाणें वांटून देणें.

ब—स्थावर मिळकत तबदील करून देणें.

३८. विवक्षित गोष्टी घडून आल्या असतां मात्र तबदील करून देण्याचा अधिकार असलेल्या मनुष्यानें तबदील करून देणें.

३९. तिसऱ्या मनुष्याचा पोटगीचा हक्क असतांना मिळकत तबदील करून दिली असेल त्याबाबद.

४०. जमिनीचा भोगवटा करण्यास प्रतिबंध जीवरून होतो त्या कर्तव्यतेचा बोजा.

अगर मालकीस लागून असलेल्या परंतु हितसंबंधाच्या अगर सवलतीच्या बरोबरीच्या नसणाऱ्या कर्तव्यतेचा बोजा.

४१. नांवापुरत्या मालकानें तबदील करून देणें.

४२. आधींचा तबदील करण्याचा व्यवहार रद्द करण्यास अधिकार असलेल्या मनुष्यानें तबदील करून देणें.

४३. अधिकार नसलेल्या मनुष्यानें तबदील करून दिल्यानंतर त्याला जर त्या तबदील करून दिलेल्या मिळकतींत हितसंबंध प्राप्त झाला, तर काय होतें.

४४. सामाइक मालकांपैकीं एकाद्या मालकानें तबदील करून देणें.

४५. कांहीं मोबदला घेऊन दोन अगर अधिक मनुष्यांस मिळून तबदील करून देणें.

४६. निरनिराळे हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांनीं मोबदला घेऊन मिळकत तबदील करून देणें.

४७. सामाइक मिळकतींतला हिसा सामाइक मालकांनीं तबदील करून देणें.

कलम.

४८. तबदील करून दिल्यानें उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या हक्कांपैकीं कोणत्या हक्कांस अग्रेसर ह्मणावें.

४९. तबदील करून घेणाऱ्या मनुष्याचा विम्याच्या पालिसीअन्वयें हक्क.

५०. अपुऱ्या हक्कानें धारण करणारास इमानें इतबारें दिलेलें भाडें.

५१. अपुऱ्या हक्काच्या परंतु इमानें इतबारें धारण करणाऱ्या मनुष्यानें केलेल्या सुधारणा.

५२. मिळकतीच्या संबंधानें दावा चाललेला असतांना ती तबदील करून देणें.

५३. दगलबाजीनें तबदील करून देणें.

## बाब ३.

### स्थावरमिळकतीच्या विक्र्यांविषयीं.

५४. "विक्री" शब्दाची व्याख्या.

विक्री कशी करावयाची तें.

विक्रीचा करार.

५५. विकत घेणाराचे व विकत देणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

५६. सामाइक बोजा असलेल्या दोन मिळकतींपैकीं एका मिळकतीची विक्री.

### विक्रीच्या वेळीं मिळकतीला बोजांतून मुक्त करणें.

५७. बोजांच्या संबंधानें कोर्टानें काय तजवीज करावी; आणि मिळकत बोजांतून मुक्त केल्यानंतर तिची विक्री.

## बाब ४.

### स्थावर मिळकतीच्या गहाणांबाबद व तिच्यावरील बोजांबाबद.

५८. "गहाण," "गहाण देणारा," "गहाण घेणारा" "गहाणाची रकम" आणि "गहाणखत" ह्या संज्ञांच्या व्याख्या.

साधें गहाण.

विक्रीच्या अटीचें गहाण.

भोगवट्याचें गहाण.

इंग्रजी रीतीचें गहाण.

५९. गहाणाचा व्यवहार खताअन्वयें केव्हां करावा तें.

### गहाण देणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

६०. सोडवून घेण्याचा गहाण देणाराचा हक्क.

गहाण मिळकतीचा कांहीं भाग सोडवून घेणें.

कलम.

६१. निरनिराळ्या वेळीं गहाण ठेविलेल्या दोन मिळकतींपैकीं एक मिळकत सोडविण्याचा हक्क.

६२. भोगवट्यानें गहाण देणाराची मिळकत पुनः कबजांत घेण्याचा अखत्यार.

६३. गहाण मिळकतीस भर पडणें.

मालकी तबदील करून घेतल्यामुळें प्राप्त केलेली भर.

६४. गहाण दिलेला पट्टा नवीन करून घेण्याबद्दल.

६५. गहाण देणाराचे गर्भित करार.

६६. कबजा असलेल्या गहाण देणारानें मिळकत बिघडूं देणें.

### गहाण घेणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

६७. गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करविण्याचा अगर ती मिळकत विकविण्याचा हक्क.

६८. गहाणाच्या रकमेबद्दल दावा आणण्याचा हक्क.

६९. विकण्याचा अधिकार कायदेशीर केव्हां होईल

७०. गहाण मिळकतीस भर पडणें.

७१. गहाण दिलेला पट्टा नवीन करून घेणें.

७२. गहाण घेणाराच्या हातीं कबजा असल्यास त्याचा हक्क.

७३. महसुलाबद्दल केलेल्या विक्रीच्या उत्पन्नावर बोजा.

७४. आधींच्या गहाण घेणाराची फेड करण्याचा नंतरच्या गहाण घेणाराचा हक्क.

७५. मध्यंतरींच्या गहाण घेणाराचे आधींच्या व नंतरच्या गहाण घेणारांविरुद्ध हक्क.

७६. गहाण घेणाराच्या कबजांत गहाण मिळकत असेल तेव्हां त्याच्या जबाबदाऱ्या.

त्याच्या कसुरीमुळें झालेलें नुकसान.

७७. व्याजाऐवजीं उत्पन्न घेणें.

### पूर्वाधिकार.

७८. आधींच्या गहाण घेणारास तहकूब करणें.

७९. अनियमित रकम सुरक्षित करण्यासाठीं कमाल रकम निर्दिष्ट करून केलेलें गहाण.

८० गहाणें जोडण्याची वहिवाट बंद केली आहे.

### व्यवस्था व हिस्सेरसी.

८१. तारणांची व्यवस्था.

८२. गहाणाच्या कर्जाची हिसेरसी.

### कोर्टांत अमानत ठेवणें.

८३. गहाणाबद्दल देणें असलेला पैसा कोर्टांत अमानत ठेवण्याचा अधिकार.

गहाण देणारानें ठेविलेला पैसा मिळण्याचा हक्क.

कलम.

८४. व्याज बंद राहणें.

**गहाण सोडवून घेण्याचा हक्क रद्द करविण्याबद्दल, विक्रीबद्दल अगर सोडवून घेण्याबद्दल दावे.**

८५. गहाण सोडवून घेण्याचा हक्क रद्द करविण्याबद्दल, विक्रीबद्दल अगर सोडवून घेण्याबद्दल दाव्यांतील पक्षकार.

**सोडविण्याचा हक्क रद्द करणें आणि विक्री करणें.**

८६. गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करविण्याच्या दाव्यांतील हुकुमनामा.

८७. देण्यास पात्र झालेली रकम दिल्यावर काय करावें.

गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करविण्याबाबत पक्का हुकुम.

मुदत वाढविण्याचा अधिकार.

८८. विक्रीविषयीं हुकुमनामा.

गहाण सोडविण्याचा हक्क बुडविण्याच्या दाव्यांत विक्रीचा हुकुमनामा करण्याचा अधिकार.

८९. देणें असलेली रकम प्रतिवादीनें दिली तर काय करावें.

९० गहाणासंबंधी येणें असलेली बाकी वसूल करणें.

**गहाण सोडविणें.**

९१. गहाण सोडविण्याबद्दल दावा करण्याचा अख्त्यार कोणास आहे.

९२. गहाण सोडविण्याच्या दाव्यांत हुकुमनामा.

९३. गहाण सोडविल्यास, गहाण मिळकत कबजांत दिली पाहिजे.

गहाण सोडविलें नाहीं तर गहाण सोडविण्याचा हक्क रद्द केला पाहिजे, अगर मिळकतीची विक्री केली पाहिजे.

वेळ वाढविण्याचा अधिकार.

९४. गहाण घेणाराचा हुकुमनामा झाल्यानंतरचा खर्च.

९५. अनेक सामाइक गहाण देणारांपैकीं एकजण सोडवील, तेव्हां त्याचा बोजा.

**आधींच्या गहाणास पात्र असलेल्या मिळकतीची विक्री.**

९६. अधींच्या गहाणास पात्र असलेल्या मिळकतीची विक्री.

९७. विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग कसा करावा तें.

**असाधारण गहाणें.**

९८. ५८ व्या कलमाच्या (ब), (क), (ड) व (इ) रकमांमध्यें सांगितलेलें नाहीं अशा प्रकारचें गहाण.

**गहाण मिळकतीची जप्ती.**

९९. गहाण मिळकतीची जप्ती.

कलम.

**बोजे.**

१००. बोजे.

१०१. बोजे नाहींसे होणें.

**नोटीस देणें व पैसा हजर करणें.**

१०२. नोटीस मुखत्यारावर बजावणें किंवा पैसा मुखत्यारास द्यावयास हजर करणें.

१०३. करार करण्याविषयीं नालायक असणाऱ्या मनुष्याला अगर मनुष्याकडून नोटीस वगैरे

१०४. कानू करण्याचा अधिकार.

---

## बाब ५.

**स्थावर मिळकतीच्या पट्ट्यांविषयीं.**

१०५. पट्ट्याची व्याख्या.

पटयानें देणारा, पटयानें घेणारा, उक्ती रकम, आणि भाडें, ह्यांच्या व्याख्या.

१०६. लेखी करार अगर स्थानिक रिवाज ह्यांचा अभावीं विवक्षित पट्टे कितीवेळ चालतील.

१०७. पट्टा कसा करावा तें.

१०८. पट्ट्यानें देणारा व पट्ट्यानें घेणारा ह्यांचे हक्क व जबाबदाऱ्या.

**(अ) पट्ट्यानें देणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.**

**(ब) पट्ट्यानें घेणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.**

१०९. पट्ट्यानें देणारा मिळकत ज्याला तबदील करून देईल त्याचे हक्क.

११०. मुदत सुरू होते तो दिवस सोडून देणें.

वर्षाच्या पट्ट्याचा अमल कोठपर्यंत चालतो.

पट्टा संपला ह्मणण्याची मुखत्यारी.

१११. पट्टा केव्हां संपतो.

११२. रद्द करण्याचा हक्क सोडून देणें.

११३. सोडून देण्याबद्दलची नोटीस अमलांत आणण्याचा हक्क सोडून देणें.

११४. भाडें न दिल्याबद्दल पट्टा रद्द न होण्याकरितां इलाज.

११५. पट्टा सोडून दिल्याचा आणि रद्द झाल्याचा पोटपट्ट्यांवर परिणाम.

११६. पट्ट्याच्या मुदतीनंतर धारण करण्याचा परिणाम.

११७. शेतकीच्या कामाबद्दलच्या पट्ट्यांस ह्या बाबींतील ठराव लागू नाहींत.

---

## बाब ६.

**अदलाबदलीविषयीं.**

११८. "अदलाबदल" ह्या शब्दाची व्याख्या.

११९. कोणत्याही मनुष्यास बदली मिळालेली वस्तु काढून घेण्यांत आली असतां त्या मनुष्याचा हक्क.

कलम.
१२०. पक्षकारांचे हक्क व जबाबदाऱ्या.
१२१. पैक्याची अदलाबदल.

बाब ७.

देणग्यांविषयीं.

१२२. "देणगी"ची व्याख्या.
स्वीकार केव्हां केला पाहिजे.
१२३. तबदील करून देण्याचा व्यवहार कसा करावा तें.
१२४. विद्यमान आणि पुढें उत्पन्न होणाऱ्या मिळकतीची देणगी
१२५. अनेक मनुष्यांस दिलेली देणगी त्यांपैकीं एकानें स्वीकारिली नाहीं तर काय होतें तें.
१२६. देणगी केव्हां तहकूब करतां अगर रद्द करितां येते तें.
१२७. बोजा असलेल्या देणग्या.
नालायक मनुष्यास बोजा असलेली देणगी देणें.
१२८. सगळी मिळकत देणगीनें ज्याला दिली आहे तो.
१२९. मुसलमानी कायदा आणि अंतकाळ जवळ आला असतांना केलेल्या देणग्या ह्यांचा बचाव.

कलम.

बाब ८.

व्यवहार्य हक्क तबदील करून देण्याविषयीं.

१३०. व्यवहार्य हक्क.
१३१. कर्जें तबदील करून देणें.
१३२. नोटीस लेखी असून तिजवर सही असली पाहिजे.
१३३. रिणकोनें तबदील करण्याचा व्यवहार अमलांत आणिला पाहिजे.
१३४. रिणकोच्या दारपणाबद्दल हमी.
१३५. ज्या मनुष्याविरुद्ध असलेला हक्क विकण्यांत येईल, त्याची सुटका.
१३६. न्यायाच्या कोर्टाशीं संबंध असलेल्या अमलदारांनीं काय करूं नये
१३७. कर्ज ज्याला तबदील करून दिलें असेल त्याची जबाबदारी.
१३८. गहाण दिलेलें कर्ज.
१३९. बेचनी दस्तऐवजांचा बचाव.

परिशिष्ट.

(अ) स्टाटयूट.
(ब) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट.
(क) रेग्युलेशन.

# सन १८८२ चा आक्ट ४ था.

(सन १८८२ चा आक्ट ३ रा ह्यावरून सुधारलेला.)

[ह्या आक्टास गव्हर्नर जनरल ह्यांची संमति तारीख १७ माहे फेब्रुवारी सन १८८२ रोजीं मिळाली.]

## पक्षकारांनीं आपल्या कृत्यानें मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबद्दलचा कायदा सुधारण्याबाबद आक्ट

पक्षकारांनीं आपल्या कृत्यानें मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहारासंबंधी कायद्यांतील विवक्षित भाग स्पष्टपणें निर्दिष्ट करणें व सुधारणें ज्या अर्थी योग्य आहे, त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे :—

## बाब १.

### प्रथमारंभींचे ठराव.

१. ह्या कायद्यास "सन १८८२ चा मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद आक्ट" असें ह्मणावें : लहान सरनामा.

तो तारीख १ जुलै सन १८८२ रोजीं अमलांत येईल ; सुरुवात.

तो, प्रथमतः, *मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांच्या, पंजाबचे लेफटेनंट गव्हर्नर व्याप्ति.

*हा आक्ट, जुडीशियल डिपार्टमेंटचा जाहिरनामा नंबर ५५४७, तारीख २७ माहे आक्टोबर सन १८९२, ह्यावरून तारीख १ माहे जानेवारी सन १८९३ पासून मुंबई इलाख्यांत अमलांत आला.

ह्यांच्या आणि ब्रिटिश ब्रह्मदेशाचे चीफ कमिशनर ह्यांच्या वहिवाटींतील मुलूक शिवाय करून बाकीच्या सगळ्या ब्रिटिश हिंदुस्तानास लागू होईल.

परंतु, सदहू स्थानिक सरकारांपैकीं कोणत्याही स्थानिक सरकारास, वेळोवेळीं, स्थानिक सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन, आपल्या वहिवाटींतील सगळ्या मुलुकास अगर त्याच्या कोणत्याही विवक्षित भागास ह्या आक्ट लागू करण्याचा अधिकार आहे.

आणि कोणत्याही स्थानिक सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजुरी आणवून, आणि स्थानिक सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन, कलम ६४ पाराग्राफ २ व ३, कलम ६९, कलम १०७, आणि कलम १२३ ह्या सर्व अगर ह्यांतील विवक्षित कलमांचा अमल आपल्या वहिवाटींतील अमुक प्रदेशांत अमुक तारखेपासून बंद झाला आहे अगर बंद होईल असें वेळोवेळीं ठरविण्याचा अख्त्यार आहे.

ह्या कलमाच्या वरील भागांत कोणताही ठराव असला तरी, ज्या कोणत्याही जिल्ह्यास अगर प्रदेशास, सन १८७७ चा हिंदुस्तानचा नोंदण्याचा आक्ट त्याच्या पहिल्या कलमांतील अधिकाराअन्वयें अगर इतर कारणावरून लागू केलेला नसेल, त्या जिल्ह्यास अगर प्रदेशास, ह्या आक्टांतील कलम ६४ पारेग्राफ २ व ३, कलम ६९, कलम १०७ व कलम १२३ हीं लागू होणार नाहींत व लागू करतां येणार नाहींत असें समजावें.

आक्ट रद्द करणें.

विवक्षित कायदे, अनुषंगिक गोष्टी, हक्क, जबाबदाऱ्या, इत्यादिकांचा बचाव.

२. ज्या प्रदेशांस हा आक्ट विद्यमान काळीं लागू असेल, त्या प्रदेशांमध्यें, ह्या आक्टास जोडलेल्या परिशिष्टांत सांगितलेले कायदे, त्याच परिशिष्टांत निर्दिष्ट केले आहेत तेथवर रद्द केले आहेत असें समजावें. परंतु ह्या आक्टांतील कोणत्याही ठरावावरून, खालीं निर्दिष्ट केलेल्या बाबतींपैकीं कोणत्याही बाबतीस बाध येणार नाहीं: त्या बाबती येणेंप्रमाणें:—

(अ) ह्या आक्टांत कोणत्याही कायद्याचे जे ठराव स्पष्टपणें रद्द केलेले नाहींत, ते कायद्याचे ठराव;

(ब) कोणत्याही कराराच्या अगर मिळकतीच्या रचनेसंबंधाच्या ज्या अटी अगर अनुषंगिक गोष्टी ह्या आक्टाच्या ठरावांस अनुसरून असतील आणि ज्यांस विद्यमानकाळीं अमलांत असलेल्या कायद्यावरून कांहीं हरकत येत नसेल त्या अटी अगर अनुषंगिक गोष्टी;

(क) हा आक्ट अमलांत येण्याच्या आधीं घडवून आणिलेल्या कायदेशीर संबंधापासून उद्भवणारा कोणताही हक्क अगर कोणतीही जबाबदारी; अगर अशा कोणत्याही हक्काच्या अगर जबाबदारीच्या संबंधाचा कोणताही इलाज; अगर

(ड) ह्या आक्टाच्या ५७ व्या कलमांत व बाब ४ थी हींत ठराव आहेत ते प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, कायद्यावरून अगर योग्य हुकुमत असणाऱ्या कोर्टाच्या हुकुमावरून अगर हुकुमनाम्यावरून अगर तशा हुकुमाची अगर हुकुमनाम्याची बजावणी करण्यांत आल्यावरून घडून आलेला मिळकत तबदील करून देण्याचा व्यवहार.

आणि ह्या आक्टाच्या दुसऱ्या बाबींतल्या कोणत्याही ठरावावरून, हिंदु, मुसलमान अगर बौद्ध लोकांच्या कायद्यांतील कोणत्याही नियमास बाध येणार नाहीं.

अर्थाचें कलम.

३. ह्या आक्टांत, विषयास अगर पूर्वापरसंबंधास बाध येत नसेल तर,—

"स्थावर मिळकत."

"स्थावर मिळकत" ह्या संज्ञेत, उभीं असलेलीं इमारती लाकडाचीं झाडें, वाढत असलेलीं पिकें अगर वाढत असलेलें गवत ह्यांचा समावेश होत नाहीं.

"दस्तऐवज" ह्या शब्दाचा अर्थ, मृत्युलेखव्यतिरिक्त इतर दस्तऐवज, असा होतो. "दस्तऐवज."

"नोंदलेला" ह्या शब्दाचा अर्थ, दस्तऐवज नोंदण्याचें नियमन करण्यासाठीं विद्यमानकाळीं अमलांत असलेल्या कायद्याअन्वयें ब्रिटिश हिंदुस्तानांत नोंदलेला, असा होतो. "नोंदलेला."

"जमिनीस लागून असलेला" ह्या संज्ञेचा अर्थ— "जमिनीस लागून असलेला."

(अ) जमिनींत पाळें फुटलेला ; उदाहरणार्थ, झाडें व झुडपें ;

(ब) जमिनींत गडलेला ; उदाहरणार्थ, भिंती अगर इमले ; अगर

(क) गडून गेलेल्या वस्तुला, तिचा अक्षय फायदेशीर उपभोग घेण्याकरितां लागून ठेवलेला;

असा होतो ;

आणि, कोणत्याही मनुष्याला जी कोणतीही गोष्ट प्रत्यक्ष माहीत असेल, अगर, जी चौकशी किंवा जो तपास करणें त्याचें कर्तव्य होतें ती चौकशी अगर तो तपास करण्याचें त्यानें जाणूनबुजून सोडलें नसतें तर अगर त्यानें फार हयगय केली नसती तर जी गोष्ट त्याला समजली असती, अगर सन १८७२ चा हिंदुस्तानचा कराराविषयींचा आक्ट याच्या २२९ व्या कलमांत सांगितलेल्या प्रसंगीं ज्या गोष्टींची माहिती त्याच्या गुमास्त्याला दिली असेल अगर त्या गुमास्त्यानें मिळविली असेल, त्या गोष्टीची त्याला "खबर" आहे असें ह्मणावें. "खबर."

४. ह्या आक्टाच्या ज्या बाबींचा व कलमांचा करारांशीं संबंध आहे, त्या बाबी व तीं कलमें सन १८७२ चा हिंदुस्तानचा करारांविषयींचा आक्ट ह्यांतलींच आहेत असें समजावें ; आणि कलम ५४ पारिग्राफ २ व ३, कलम ५९, कलम १०७, आणि कलम १२३, हीं, सन १८७७ च्या हिंदुस्तानच्या नोंदण्याच्या आक्टास पुरवणीदाखल आहेत असें समजावें. करारांविषयींचे ठराव कराराविषयींच्या आक्टापैकीं आहेत असें समजावें.

---

## बाब २.

## पक्षकारांनीं आपल्या कृत्यानें मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद.

### (अ).—स्थावर किंवा जंगम मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद.

५. ह्यानंतरच्या कलमांमध्यें, "मिळकत तबदील करून देण्याचा व्यवहार" ह्या संज्ञेचा अर्थ, ज्या कृत्याच्यां योगानें कोणताही जीवंत मनुष्य, प्रस्तुत अगर पुढें, आपणाव्यतिरिक्त कोणत्याही एका अगर अनेक जीवंत मनुष्यांना किंवा स्वतःस आणि एका अगर अनेक इतर जीवंत मनुष्यांना मिळकत देतो, तें कृत्य, असा होतो ; आणि "मिळकत तबदील करून देणें" ह्मणजे असें कृत्य करणें होय. "मिळकत तबदील करून देण्याचा व्यवहार" ह्या संज्ञेची व्याख्या.

६. ह्या आक्टांत अगर विद्यमानकाळीं अमलांत असलेल्या इतर कोणत्याही कायद्यांत ज्या बाबतींसंबंधानें उलट ठराव असेल त्या खेरीज करून इतर सर्व बाबतींत, कोणत्याही प्रकारची मिळकत तबदील करून देतां येते : कोणत्या गोष्टी तबदील करून देण्याचा अधिकार आहे.

(अ) सर्वांत जवळच्या वारसाला कोणतीही एस्टेट प्राप्त होण्याचा संभव, कोणत्याही नातेवाइकाला कोणत्याही भाऊबंदाच्या मरणानंतर त्याच्या मृत्युलेखावरून मिळकत मिळण्याचा संभव किंवा ह्याच प्रकारचा दुसरा कोणताही नुसता संभव तबदील करून देतां येत नाहीं.

(ब) मागाहून पुन्या करावयाच्या शर्तींचा भंग केल्याबद्दल [ मिळकत ] परत घेण्याचा नुसता हक्क, त्या भंगाचा ज्या मिळकतीशीं संबंध असेल त्या मिळकतीच्या मालकाशिवाय दुसऱ्या कोणाकडेही तबदील करून देतां येत नाहीं.

(क) प्रधानस्थळव्यतिरिक्त तत्संबंधी सवलत तबदील करून देतां येत नाहीं.

(ड) मालकाला, फक्त आपण जातीनें भोगावयाचा कोणत्याही मिळकतींतील हितसंबंध तबदील करून देतां येत नाहीं.

(इ) दगलबाजीबद्दल अगर बेकायदेशीरपणें नुकसानी केल्याबद्दल मोबदला मिळण्याचा दावा करण्याचा नुसता हक्क तबदील करून देतां येत नाहीं.

(फ) कोणताही सरकारी हुद्दा तबदील करून देतां येत नाहीं, आणि त्याचप्रमाणें, कोणत्याही सरकारी नोकराचा पगार तो येणें व्हावयाच्या पूर्वी अगर येणें झाल्यानंतर तबदील करून देतां येत नाहीं.

(ग) सरकारचे लष्करी व सिविल पेन्शनर लोक यांस करून दिलेल्या नेमणुका आणि राजकीय कारणांसाठीं दिलेलीं पेन्शनें तबदील करून देतां येत नाहींत.

(ह) मिळकत तबदील करून देण्याचा व्यवहार (१) तो ज्या हितसंबंधाबद्दल असेल त्या हितसंबंधाच्या स्वरूपास तो जितक्या अंशीं नडत असेल तितक्या पुरता अगर (२) बेकायदेशीर कारणासाठीं, अगर (३) मिळकत ज्याला तबदील करून देणें बेकायदेशीर होईल अशा मनुष्याच्या तर्फेनें, करतां येत नाहीं.

(ऐ) तबदील करून न देण्याजोगा वहिवाटीचा हक्क असलेलें कूळ, ज्या एस्टेटीच्या संबंधानें महसूल देण्याची कसूर झालेली आहे त्या एस्टेटीचा मक्तेदार, अगर कोर्ट आफ् वार्ईसच्या वहिवाटीखालीं असलेली एस्टेट पट्ट्यानें घेणारा मनुष्य, यांपैकीं कोणत्याही इसमास या कलमांतील कोणत्याही ठरावावरून, त्या त्या नात्याचा आपला हितसंबंध दुसऱ्याला देण्याचा अधिकार प्राप्त होतो असें समजूं नये.

मिळकत तबदील करून देण्याचा अधिकार कोणत्या मनुष्यांस आहे.

७. जो कोणताही मनुष्य करार करण्यास योग्य असून तबदील करून देतां येते अशा मिळकतीचा मालक असेल, अगर स्वतःची नव्हे परंतु तबदील करून देतां येते अशा मिळकतीची विल्हेवाट करण्यास ज्या मनुष्यास अधिकार मिळालेला असेल, तो मनुष्य, तशी मिळकत, पूर्णपणें अगर अंशतः, शर्तींशिवाय अगर शर्तींनिशीं, विद्यमानकाळीं अमलांत असलेल्या कोणत्याही कायद्यांत परवानगी असेल त्याप्रसंगीं, त्या इयत्तेपर्यंत व त्या कायद्यांत ठरविलेल्या रीतीनें, तबदील करून देण्यास मुखत्यार आहे.

मिळकत तबदील करून देण्याच्या व्यवहाराचा काय परिणाम होतो.

८. निराळा आशय दर्शित केलेला अगर अवश्य गर्भित नसेल तर, मिळकत तबदील करून दिल्यानें, ती तबदील करून देणारा त्या मिळकतींतले व तींतल्या कायदेशीर अनुषंगिक गोष्टींतले जे हितसंबंध दुसऱ्यास देण्यास त्या वेळीं समर्थ असेल, ते सर्व हितसंबंध, लागलेच, मिळकत ज्याला तबदील करून दिलेली असेल, त्याचे होतात.

ती मिळकत जमीन असेल तेव्हां अशा अनुषंगिक गोष्टींमध्यें, त्या जमिनीस असलेल्या सवलती, ती तबदील करून दिल्यानंतर तिच्याबद्दल येणारें भाडें व उत्पन्न, आणि तिला लागून असलेल्या सर्व वस्तु, ह्या सर्व गोष्टींचा समावेश होतो;

आणि ती मिळकत जमिनीस लागून असलेलें यंत्र असेल तेव्हां त्यापासून निराळे काढतां येणाऱ्या भागांचा अशा अनुषंगिक गोष्टींमध्यें समावेश होतो;

आणि ती मिळकत एकादें घर असेल तेव्हां, त्या घरास असलेल्या सवलती, तें तबदील करून दिल्यानंतर त्याच्याबद्दल येणारें भाडें आणि त्या घराबरोबर अक्षय उपयोग करण्याकरितां पुरविलेलीं टाळीं, किल्ल्या, दरवाजे, खिडक्या व इतर वस्तु ह्यांचा अशा अनुषंगिक गोष्टींमध्यें समावेश होतो ;

आणि अशी मिळकत एकादें कर्ज अगर दुसरा एकादा व्यवहार्य हक्क असेल तेव्हां, त्याबद्दलच्या तारणांचा अशा अनुषंगिक गोष्टींमध्यें समावेश होतोः मात्र, तीं तारणें जेव्हां तबदील करून दिलेल्या कर्जाहून व हक्कांहून निराळ्या कर्जाचीं व हक्कांचीं-ही तारणें असतील, तेव्हां, त्यांचा त्या अनुषंगिक गोष्टींमध्यें समावेश होत नाहीं, आणि ती मिळकत तबदील करून देण्याच्या आधीं येणें होऊन थकलेल्या व्याजाचाही त्या अनुषंगिक गोष्टींमध्यें समावेश होत नाहीं;

आणि अशी मिळकत पैका असेल अगर जीपासून कांहीं उत्पन्न येत आहे अशी इतर मिळकत असेल, तेव्हां, तो तबदील करून देण्याचा व्यवहार अमलांत आल्यानंतर तिजबद्दल येणाऱ्या व्याजाचा अगर उत्पन्नाचा अशा अनुषंगिक गोष्टींमध्यें समावेश होतो.

९. मिळकत तबदील करून देण्याच्या संबंधानें लेख झालाच पाहिजे असा ज्या ज्या बाबतींत कायद्याचा स्पष्ट ठराव नसेल, त्या त्या बाबतींत मिळकत लेखाशिवाय तबदील करून देण्यास हरकत नाहीं. *मिळकत तोंडीं तबदील करून देणें.*

१०. कोणतीही मिळकत जर अशा शर्तीवर अगर अटीवर तबदील करून दिलेली असेल कीं, ती ज्याला तबदील करून दिलेली असेल त्यास अगर त्याच्या वतीनें हक्क सांगणाऱ्या कोणत्याही मनुष्यास त्या मिळकतींतील आपला हितसंबंध मुळींच सोडतां येऊं नये अगर त्याची विल्हेवाट मुळींच करतां येऊं नये, तर, ती अट अगर शर्त निरुपयोगी होईल; मात्र, ज्या पट्ट्यांतली सदर्हू प्रकारची अट पट्ट्यानें देणाऱ्या अगर त्याच्या वतीनें हक्क सांगणाऱ्या मनुष्याच्या फायद्याकरितां दाखल केलेली असेल, त्यास हा ठराव लागू होणार नाहीं ; आणखी असेंही ठरविलें आहे कीं, ( हिंदु, मुसलमान अथवा बौद्ध नाहीं अशा ) कोणत्याही स्त्रीला अगर तिच्या फायद्यासाठीं कोणतीही मिळकत अशा शर्तीवर तबदील करून देतां येईल कीं, तिची विवाहित स्थिति असेपर्यंत ती मिळकत अगर त्या स्त्रीचा तींतला भोग्य हितसंबंध तिनें दुसऱ्यास तबदील करून देऊं नये अगर त्या मिळकतीवर अगर हितसंबंधावर बोजा उत्पन्न करूं नये. *विक्री वगैरेचा प्रतिबंध करणारी शर्त.*

११. कोणतीही मिळकत तबदील करून दिल्यानें त्या मिळकतींत कोणत्याही मनुष्याचा पूर्ण हितसंबंध उत्पन्न होत असून, तो हितसंबंध त्यानें विवक्षित रीतीनें वापरावा अगर भोगावा अशी अट ती मिळकत तबदील करून देतांना घातली असली तर, त्या मनुष्यास, अशी अट घातलेली नाहीं असें समजून तो हितसंबंध घेऊन त्याची विल्हेवाट करण्याचा हक्क आहे असें समजावें. *उत्पन्न केलेल्या हितसंबंधविरुद्ध अशी अट घातली असतां काय होतें.*

मात्र, ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून, स्थावर मिळकतीच्या एका भागाच्या कायदेशीर भोगवट्यासाठीं त्याच मिळकतीच्या दुसऱ्या भागाचा भोगवटा मना करण्याच्या अगर तो भोगवटा विवक्षित रीतीनें करण्यास भाग पाडण्याच्या हक्कास बाध येतो असें समजूं नये.

१२. जर कोणतीही मिळकत अशा अटीवर अगर शर्तीवर तबदील करून दिलेली असेल कीं, कोणा मनुष्याला दिलेला अगर त्याच्या हितासाठीं राखून ठेविलेला किंवा दिलेला तींतला कोणताही हितसंबंध, तो मनुष्य नादार झाला असतां अगर त्यानें तो हितसंबंध दुसऱ्यास देण्याचा अगर त्याची विल्हेवाट करण्याचा प्रयत्न केला असतां नाहींसा व्हावा, तर, अशी अट अगर शर्त निरुपयोगी आहे असें समजावें. *नादारी झाली असतां अगर हितसंबंध दुसऱ्यास देण्याचा प्रयत्न केला असतां हितसंबंध नाहींसा व्हावा अशी अट असल्यास काय होतें.*

पट्टयानें देणाराच्या अगर त्याच्या वतीनें हक्क सांगणाराच्या फायद्यासाठीं कोणत्याही पट्टयांत घातलेल्या कोणत्याही अटीस ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

न जन्मलेल्या मनुष्याच्या फायद्यासाठीं मिळकत तबदील करून देणें.

१३. कोणतीही मिळकत तबदील करून देऊन जर त्या व्यवहाराच्या वेळीं अस्तित्वांत नसलेल्या अशा एकाद्या मनुष्याच्या फायद्यासाठीं त्या मिळकतींत हितसंबंध उत्पन्न केलेला असेल, आणि त्याच व्यवहारांत तो हितसंबंध दुसऱ्या कोणास देण्याबद्दल प्रथम ठरविलेलें असेल, तर त्या न जन्मलेल्या मनुष्याच्या फायद्यासाठीं उत्पन्न केलेला तो हितसंबंध, तबदील करून देणाराच्या त्या मिळकतींतल्या बाकी राहिलेल्या सगळ्या हितसंबंधाइतका असल्याशिवाय, अमलांत यावयाचा नाहीं.

उदाहरण.

अ हा आपल्या मालकीची मिळकत, आपणा स्वतःकरितां व आपल्या योजिलेल्या बायकोकरितां क्रमानें आपल्या व तिच्या हयातीपर्यंत, आणि आपणापैकीं मागें राहिलेल्याच्या मरणानंतर आपल्या योजिलेल्या लग्नसंबंधापासून होणाऱ्या वडील पुत्राकरितां त्याच्या हयातीपर्यंत, आणि त्याच्या मरणानंतर आपल्या दुसऱ्या पुत्राकरितां ह्मणून बकडे जिन्यानें देतो. ह्या व्यवहारांत वडील मुलाच्या फायद्याकरितां उत्पन्न केलेला हितसंबंध, अचा त्या मिळकतींतला बाकी राहिलेला पूर्ण हितसंबंध नाहीं ह्मणून, अमलांत येत नाहीं.

निरंतरतेविरुद्ध ठराव.

१४. जर कोणतीही मिळकत अशा रीतीनें तबदील करून दिलेली असेल कीं, त्या व्यवहाराच्या योगानें उत्पन्न केलेला हितसंबंध, त्या व्यवहाराच्या तारिखेस जीवंत असलेल्या एका अगर अधिक मनुष्यांच्या हयातीनंतर आणि ती हयाती संपण्याचे वेळीं जो अल्पवयी मनुष्य जिवंत असेल आणि ज्याला तो पूर्ण वयाचा झाला ह्मणजे तो हितसंबंध मिळावयाचा असेल त्याची अल्पवयस्कता संपल्यानंतर अमलांत यावा, तर, तो व्यवहार निरुपयोगी होईल.

तबदील करून देण्याचा व्यवहार मनुष्यांच्या वर्गाच्या तर्फे झाला असून त्यांपैकीं कांहींस कलमें १३ व १४ हीं लागू असतील तर काय होतें.

१५. कोणतीही मिळकत तबदील करून दिल्यानें त्या मिळकतींत कोणत्याही वर्गांतील मनुष्यांच्या फायद्याचा हितसंबंध उत्पन्न केलेला असून जर कलम तेरा व कलम चवदा ह्यांतील कोणत्याही ठरावावरून त्या मनुष्यांपैकीं कांहींच्या संबंधानें तो हितसंबंध निरुपयोगी होत असेल, तर, तो हितसंबंध त्या वर्गांतील सर्व मनुष्यांच्या संबंधानें निरुपयोगी होईल.

आधींचा हितसंबंध नाहींसा झाल्यावर ज्याचा अमल व्हावयाचा त्या तबदील करून देण्याच्या व्यवहाराबाबद.

१६. जेव्हां कोणतीही मिळकत तबदील करून देऊन उत्पन्न केलेला हितसंबंध, कलम तेरावें, चौदावें व पंधरावें ह्यांतल्या कोणत्याही ठरावावरून निरुपयोगी होईल, तेव्हां, त्याच व्यवहारांत उत्पन्न केलेला आणि अशा आधींच्या हितसंबंधानंतर अगर तो निरुपयोगी झाल्यानंतर अमलांत यावा असा ज्यासंबंधाचा इरादा असेल, तो हितसंबंधही निरुपयोगी होईल.

सार्वजनिक हितासाठीं मिळकत निरंतर तबदील करून देणें.

१७. धर्माची, ज्ञानाची, व्यापाराची, आरोग्याची, सुरक्षितपणाची, अगर मनुष्यजातीस हितकारक अशा दुसऱ्या कोणत्याही कार्याची समृद्धि करून जनसमूहाचा फायदा करण्यासाठीं जी कोणतीही मिळकत तबदील करून देण्यांत येईल तिला, कलम चवदावें, पंधरावें, व सोळावें ह्यांतले प्रतिबंधक ठराव लागू होणार नाहींत.

उत्पन्न जमूं देण्याबद्दल अट.

१८. कोणतीही मिळकत तबदील करून देतांना, त्या मिळकतीचें उत्पन्न जमूं दिलं पाहिजे अशी अट घातलेली असल्यास ती अट निरुपयोगी होईल, आणि उत्पन्न जमूं देण्याबद्दल अट नसल्याप्रमाणेंच त्या मिळकतीची व्यवस्था केली पाहिजे.

**अपवाद.**—तबदील करून दिलेली मिळकत स्थावर असेल तेव्हां अगर ती तबदील करून दिल्याच्या तारिखेपासून तिचें उत्पन्न जमूं द्यावें अशी अट घातलेली असेल तेव्हां, त्या तारिखेनंतर एका वर्षांत त्या मिळकतीपासून निपजणाऱ्या उत्पन्ना-

संबंधानें मात्र ती अट कायदेशीर होईल; आणि त्या वर्षाच्या अखेरीस ती मिळकत व तिचें उत्पन्न ह्यांची, ज्या मुदतीपर्यंत उत्पन्न जमूं द्यावें अशी अट असेल ती मुदत संपली असें समजून, व्यवस्था केली पाहिजे.

निविष्ट हितसंबंध.

१९. जेव्हां कोणतीही मिळकत तबदील करून देऊन उत्पन्न केलेला हितसंबंध, तो अमलांत येण्याचा वेळ निर्दिष्ट केल्याशिवाय, अगर तो तात्काळ अमलांत यावयाचा असा किंवा अमुक खचीत घडावयाची गोष्ट घडतांच अमलांत यावयाचा असा स्पष्ट निर्देश करून कोणत्याही मनुष्याला दिला असेल, तर, त्या व्यवहारांत घातलेल्या अटींवरून उलट इरादा दिसत असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, तो हितसंबंध निविष्ट आहे असें समजावें.

मिळकत ज्याला दिली असेल तो मनुष्य निविष्ट हितसंबंधाचा कबजा मिळण्यापूर्वी मरण पावला तरी, तो निविष्ट हितसंबंध फुकट जात नाहीं.

**खुलासा.**—तबदील करून दिलेल्या मिळकतींतील हितसंबंधाचा भोगवटा तहकुब ठेवण्याबद्दलची अट घातलेली आहे एवढ्याचवरून, अगर त्या मिळकतींतला हितसंबंध आधीं दुसऱ्या कोणा मनुष्यास देण्याबद्दलची अगर तो त्याकरितां राखून ठेवण्याबद्दलची अट आहे एवढ्याचवरून अगर भोगवट्याचा वेळ येई तोंपर्यंत मिळकतीचें उत्पन्न जमूं देण्याबद्दल अट घातलेली आहे एवढ्याचवरून अगर विवक्षित गोष्ट घडली तर तो हितसंबंध दुसऱ्या मनुष्याला मिळेल अशी अट घातलेली आहे एवढ्याचवरून, तो हितसंबंध निविष्ट होऊं नये असा इरादा असल्याचें अनुमान करितां येत नाहीं.

न जन्मलेल्या मनुष्याच्या फायद्यासाठीं मिळकत तबदील करून दिल्यानें त्याला निविष्ट हितसंबंध केव्हां प्राप्त होतो.

२०. कोणतीही मिळकत तबदील करून देऊन तींत, त्यावेळीं न जन्मलेल्या अशा कोणत्याही मनुष्याच्या फायद्यासाठीं हितसंबंध उत्पन्न करण्यांत आला तर, त्या मनुष्यास जन्मतांच तो हितसंबंध भोगण्याचा हक्क नसला तरी, त्या व्यवहाराच्या अटींवरून उलट इरादा दिसून येत नसल्यास, त्याला जन्मतांच निविष्ट हितसंबंध प्राप्त झाला आहे असें समजावें.

अवलंबी हितसंबंध.

२१. मिळकत तबदील करून देऊन, अमुक एक अनिश्चित गोष्ट घडली असतां मात्र अगर अमुक एक अनिश्चित गोष्ट न घडली तर मात्र अमलांत यावा अशा प्रकारचा हितसंबंध एकाद्या मनुष्याकरितां उत्पन्न केला तर, त्या मनुष्याला त्या व्यवहारावरून त्या मिळकतींत अवलंबी हितसंबंध प्राप्त होतो असें समजावें. परंतु पहिल्या बाबतींत ती गोष्ट घडून येतांच आणि दुसऱ्या बाबतींत ती गोष्ट घडून येणें अशक्य झालें ह्मणजे तो हितसंबंध निविष्ट होतो असें समजावें.

**अपवाद.**—कोणतीही मिळकत तबदील करून दिल्यावरून एकाद्या मनुष्याला अमुक वय प्राप्त होतांच तींतला हितसंबंध मिळण्याचा हक्क प्राप्त होत असेल, आणि शिवाय, त्या तबदील करून देणारानें त्या मनुष्यास, तें वय येण्यापूर्वी त्या हितसंबंधापासून येणारें उत्पन्न अटींविरहित दिलें असेल अगर त्या उत्पन्नाचा जरूर असेल तेवढा भाग त्या मनुष्याच्या हिताकडे लावावा असें केलें असेल, तर तो हितसंबंध अवलंबी समजूं नये.

कोणत्याही वर्गातल्या विवक्षित वयास पावलेल्या मनुष्यांस तबदील करून देणें.

२२. कोणतीही मिळकत जर अशा रीतीनें तबदील करून दिलेली असेल कीं, एखाद्या वर्गातील जीं मनुष्यें विवक्षित वयास पोंचतील त्यांच्याकरितां मात्र तींत हितसंबंध उत्पन्न व्हावा, तर, त्या वर्गापैकीं त्या वयास न पोंचलेल्या अशा मनुष्यांत तो हितसंबंध निविष्ट होत नाहीं.

विवक्षित अनिश्चित गोष्ट घडली तर मात्र हितसंबंध मिळण्याबाबद.

२३. जर कोणतीही मिळकत तींतला हितसंबंध अमुक अनिश्चित गोष्ट घडली असतां अमुक मनुष्यास मिळावा अशा अटीवर आणि ती गोष्ट घडण्याची वेळ मुळींच

न सांगतां तबदील करून दिलेली असेल तर, मध्यंतरींचा अगर पूर्वींचा हितसंबंध नाहींसा होण्यापूर्वी अगर नाहींसा होईल त्याचवेळेस सदहू गोष्ट न घडल्यास, तो हितसंबंध निरूपयोगी होईल.

निर्दिष्ट न केलेल्या अशा वेळीं अवशिष्ट राहिलेल्या मनुष्यांपैकीं विवक्षित मनुष्यांस तबदील करून देणें.

२४. जर कोणतीही मिळकत, तींतला हितसंबंध अमुक मनुष्यांपैकीं जे असामी कोणत्या तरी वेळेस जीवंत असतील त्यांस प्राप्त व्हावयाचा अशा अटीवर परंतु ती वेळ बरोबर निर्दिष्ट न करितां तबदील करून दिलेली असेल, तर, त्या व्यवहाराच्या अटीवरून उलट इरादा दिसून येत नसल्यास, तो हितसंबंध, मध्यंतरींचा अगर पूर्वींचा हितसंबंध नाहींसा व्हावयाचे वेळीं जीवंत असलेल्या मनुष्याकडे जाईल.

उदाहरण.

अ हा, ब च्या हयातीपर्यंत बला मिळावी ह्मणून, आणि त्याच्या मरणानंतर क व ड ह्यांना बरोबर विभागून यावी ह्मणून अगर त्यांपैकीं जो जीवंत राहील त्यास मिळावी ह्मणून कांहीं मिळकत बला तबदील करून देतो. ब जीवंत असतांच क मरतो. ड हा बच्या मागें जीवंत राहातो. तर ब मरतांच ती मिळकत ड कडे जाईल.

शर्तीवर तबदील करून देण्याचा व्यवहार.

२५. कोणतीही मिळकत तबदील करून देऊन उत्पन्न केलेला हितसंबंध कोणत्याही अटीवर अवलंबित केलेला असून ती अट पुरी करणें अशक्य असेल, अगर कायद्यानें मना असेल, अगर ती अमलांत येऊं दिल्यानें कोणत्याही कायद्याचे ठराव व्यर्थ होतील अशा स्वरूपाची ती असेल, अगर ती दगलबाजीची असेल, अगर दुसऱ्या एकाद्या मनुष्याच्या शरीरास किंवा मिळकतीस अपाय व्हावा अशी अगर जिच्यापासून तसा अपाय होण्याचा संभव आहे अशी ती असेल, अगर ती कोर्टाच्या मतें अनीतीची अगर राजनीतीस विरुद्ध असेल, तर, तो हितसंबंध निरूपयोगी होतो असें समजलें पाहिजे.

उदाहरणें.

(अ) बनें एका तासांत शंभर मैल चालून जावें अशा शर्तीवर अ त्याला एक शेत पट्ट्यानें देतो. तो पट्टा निरूपयोगी होय.

(ब) अची मुलगी क हिच्याशीं बनें लग्न करावें अशा शर्तीवर अ हा बला ५०० रुपये देतो. पैसा देण्याचे वेळीं क मेली होती. तो व्यवहार निरूपयोगी होय.

(क) बनें कचा खून करावा अशा शर्तीवर अ हा बला ५०० रुपये तबदील करून देतो. तो व्यवहार निरूपयोगी होय.

(ड) आपली पुतणी क हिनें आपल्या नवऱ्यास टाकावें अशा शर्तीवर अ हा तिला ५०० रुपये तबदील करून देतो. तो व्यवहार निरूपयोगी होय.

आधींची शर्त पुरी करणें.

२६. कोणतीही मिळकत तबदील करून देण्याच्या अटींमध्यें, त्या मिळकतींतील हितसंबंध भोगण्यापूर्वी अमुक मनुष्यानें अमुक शर्त पुरी केली पाहिजे अशी अट असेल तर तो मनुष्य त्या शर्तीप्रमाणें तत्त्वतः वागला असतां, ती शर्त पुरी केल्याप्रमाणें मानावी.

उदाहरणें.

बनें क, ड, व इ ह्यांच्या संमतीनें लग्न करावें अशा शर्तीवर अ हा त्याला ५००० रुपये तबदील करून देतो. इ मरतो. ब हा क व ड ह्यांच्या संमतीनें लग्न करितो. बनें ती शर्त पुरी केली असें समजावें.

(ब) बनें क, ड व इ ह्यांच्या संमतीनें लग्न करावें अशा शर्तीवर अ हा बला १००० रुपये तबदील करून देतो. ब हा क ड व इ ह्यांची संमति घेतल्यावांचून करितो, लग्न परंतु लग्न झाल्यावर त्यांची संमति मिळवितो. तर बनें सदहू शर्त पुरी केली नाहीं असें होतें.

२७. कोणतीही मिळकत तबदील करून देऊन कोणत्याही एका मनुष्याला तींतला हितसंबंध दिलेला असेल, आणि ती व्यवस्था रहित झाल्याच्या बाबतींत, तो हितसंबंध नंतर दुसऱ्या कोणा मनुष्यास मिळावा असें त्याच व्यवहारामध्यें ठरविलें असेल, तर, ती आधींची व्यवस्था रहित झाली असतां, ती रहित होतांच ती नंतरची व्यवस्था अमलांत येईल; मग ती पहिली व्यवस्था, मिळकत तबदील करून देणारानें ध्यानीं आणिल्याप्रमाणें रहित झालेली नसली तरी हरकत नाहीं.

पहिल्याच्या नांवची व्यवस्था रद्द झाल्यास दुसऱ्याच्या नांवची व्यवस्था अमलांत येईल अशा शर्तीवर कोणत्याही मनुष्यास तबदील करून देणें.

परंतु तो व्यवहार ज्या मनुष्यांच्या दरम्यान झालेला असेल, त्या मनुष्यांचा इरादा जर असा असला कीं, ती पहिली व्यवस्था अमुकच रीतीनें रहित झाल्यास दुसरी व्यवस्था अमलांत यावी, तर, ती पहिली व्यवस्था त्याप्रमाणें रहित झाल्याशिवाय ती दुसरी व्यवस्था अमलांत येणार नाहीं.

उदाहरणें.

(अ) अच्या मरणानंतर तीन महिन्यांच्या आंत बनें अमुक एक पट्टा करून दिल्यास बला, आणि बनें तसें करण्याची हयगय केल्यास कला मिळावे ह्या शर्तीवर अ हा बला १०० रुपये देतो. ब हा अ हयात असतांना मरतो. तर कच्या तर्फेनें केलेली व्यवस्था अमलांत येईल.

(ब) अ हा आपल्या बायकोला कांहीं मिळकत तबदील करून देतो परंतु ती आपल्या हयातींत मरण पावल्यास, तिला दिलेली मिळकत बकडे जावी असें ठरवितो. अ व त्याची बायको हीं दोघें समकालीं मरण पावतात, परंतु त्यांचें मरण अशा रीतीनें घडून येतें कीं, नवऱ्याच्या पूर्वी बायको मेली असें सिद्ध करणें अशक्य होतें. अशा प्रसंगीं बच्या तर्फेनें केलेली व्यवस्था अमलांत येत नाहीं.

२८. मिळकत तबदील करून देऊन तींतला हितसंबंध कोणत्याही मनुष्याला देतेवेळीं, त्या व्यवहारांत, त्या मिळकतींतला हितसंबंध अमुक अनिश्चित गोष्ट घडल्यास दुसऱ्यास मिळावा अशी अट अगर अमुक अनिश्चित गोष्ट घडून न आल्यास दुसऱ्यास मिळावा अशी अट दाखल करण्याचा अधिकार आहे. मात्र ह्यांपैकीं प्रत्येक बाबतींत व्यवस्था करावयाची ती, कलम १०, १२, २१, २२, २३, २४, २५ व २७ ह्यांतल्या ठरावांस पात्र राहील.

अमुक गोष्ट घडण्याच्या अगर न घडण्याच्या शर्तीवर मिळकत दुसऱ्याला तबदील करून देणें.

२९. वरील शेवटच्या कलमांत चिंतिलेल्या प्रकारची नंतरची व्यवस्था, ती अट तंतोतंत पुरी झाल्याशिवाय अमलांत येऊं शकणार नाहीं.

नंतरची शर्त पुरी करणें.

उदाहरण.

ब हा वयांत आला ह्मणजे अगर त्यानें लग्न केलें ह्मणजे त्यास मिळावे ह्मणून अहा बला १०० रुपये तबदील करून देतो; परंतु त्यांत अशी अट घालतो कीं, ब हा जर अल्पवयी असतांनाच मरण पावला, किंवा त्यानें जर कच्या संमतीशिवाय लग्न केलं, तर ते १०० रुपये डला मिळावे. ब हा केवळ १७ वर्षांचा असतांना कच्या संमतीशिवाय लग्न करितो तर डच्या संबंधाची व्यवस्था अमलांत येईल.

३०. नंतरची व्यवस्था कायद्यास अनुसरून नसली तरी, तिच्यामुळें आधींच्या व्यवस्थेला बाध येत नाहीं.

नंतरच्या व्यवस्थेच्या बेकायदेशीरपणावरून आधींच्या व्यवस्थेला बाध येत नाहीं.

**उदाहरण.**

अ हा एक शेत बला तिच्या हयातीपर्यंत तबदील करून देतो, आणि ती आपल्या नवऱ्यास न सोडील तर तें कला तबदील करून देईन अशी त्यांत अट घालतो; तर, अट मुळींच नव्हती असें समजून बला आपल्या हयातीपर्यंत तें शेत भोगण्याचा हक्क आहे.

विवक्षित अनिश्चित गोष्ट घडली असतां अगर न घडली असतां मिळकत तबदील करून देण्याचा व्यवहार राहित होईल अशी अट.

३१. कलम १२ ह्यांतील ठराव लागू राहून, कोणतीही मिळकत तबदील करून देऊन तींत अशा अटीवर हितसंबंध उत्पन्न करितां येतो कीं, विवक्षित अनिश्चित गोष्ट घडली असतां अगर विवक्षित अनिश्चित गोष्ट न घडली असतां तो नाहींसा व्हावा.

**उदाहरणें.**

(अ) अ हा एक शेत बला त्याच्या हयातीपर्यंत तबदील करून देतो आणि त्यांत अशी एक अट ठेवितो कीं, बनें जर अमुक रान तोडिलें, तर तो व्यवहार व्यर्थ होईल. ब तें रान तोडितो. बचा त्या शेतांतील हयातीपर्यंतचा हितसंबंध नाहींसा होईल.

(ब) अ हा एक शेत बला तबदील करून देतो आणि त्यांत अशी एक अट ठेवितो कीं, त्या व्यवहाराच्या तारिखेनंतर तीन वर्षांच्या आंत जर ब इंग्लंडास गेला नाहीं, तर त्याचा त्या शेतांतला हितसंबंध नाहींसा व्हावा. ठरविलेल्या मुदतींत ब इंग्लंडास जात नाहीं. त्याचा त्या शेतांतला हितसंबंध नाहींसा होईल.

अशी अट बेकायदेशीर असूं नये.

३२. कोणताही हितसंबंध नाहींसा होण्याबद्दल घातलेली अट कायदेशीर व्हावयाकरितां, ती अट ज्या गोष्टीच्या संबंधाची असेल, ती गोष्ट, हितसंबंध उत्पन्न करण्याला कायदेशीर अट होऊं शकली पाहिजे.

कृत्य करावें अशा अटीवर परंतु तें करण्याचा वेळ न सांगतां मिळकत तबदील करून देणें.

३३. कोणतीही मिळकत तबदील करून तींत उत्पन्न केलेला हितसंबंध, तो घेणारानें अमुक कृत्य केलें पाहिजे अशा अटीस पात्र केलेला असेल परंतु तें कृत्य करण्याचा वेळ निर्दिष्ट केला नसेल तेव्हां, त्या मनुष्यानें तें कृत्य करणें अगदींच अगर अनियमित वेळ पावेतों अशक्य केलें तर, त्या अटीचा भंग झाला असें होईल.

अमुक कृत्य करावें अशा अटीवर आणि तें कृत्य करण्याचा वेळ निर्दिष्ट करून मिळकत तबदील करून देणें.

३४. कोणतीही मिळकत कोणत्याही मनुष्याला तबदील करून देऊन उत्पन्न केलेला हितसंबंध भोगण्यापूर्वी त्यानें पुरी करावयाची शर्त ह्मणून, अगर पुरी केली नाहीं तर तो हितसंबंध त्याकडून दुसऱ्यास जावयाचा अशी शर्त ह्मणून त्या मनुष्यास कोणतेंही कृत्य करावयाचें असेल, आणि तें कृत्य करण्याचा वेळ निर्दिष्ट केलेला असेल, तेव्हां, ती अट पुरी न होण्यांत ज्या मनुष्याचा प्रत्यक्ष फायदा व्हावयाचा असेल त्या मनुष्याच्या दगलबाजीनें तें कृत्य निर्दिष्ट केलेल्या वेळाच्या आंत करणें राहिलें तर, अशा दगलबाजीमुळें जो विलंब लागला असेल तो भरून येण्याला जरूर असेल तितका आणखी वेळ तें कृत्य करण्याकरितां त्या मनुष्याच्या विरुद्ध दिला पाहिजे. परंतु, तें कृत्य करण्याची वेळ ठरविलेली नसेल तेव्हां, शर्त पुरी न होण्यामध्यें ज्याचें हित आहे अशा मनुष्याच्या दगलबाजीमुळें सदरहू कृत्य करणें अशक्य होईल अगर अनियमित वेळ पावेतों लांबेल तर, ती शर्त त्या मनुष्याच्या विरुद्ध पुरी झाली असें समजलें पाहिजे.

**दोहोंतून एक गोष्ट पत्करणें.**

दोहोंतून एक गोष्ट पत्करणें जरूर केव्हां होईल.

३५. ज्या मनुष्याला जी मिळकत तबदील करून देण्याचा अधिकार नाहीं तो मनुष्य ती मिळकत दुसऱ्याला तबदील करून देईल आणि त्याच व्यवहाराची अंगभूत ह्मणून त्या मिळकतीच्या मालकाला एकादी फायद्याची गोष्ट करून देईल, तर, त्या मालकानें तो व्यवहार कबूल केला पाहिजे एक, किंवा नाकबूल केला पाहिजे एक; त्यानें तो नाकबूल केल्यास त्याला, सदरीं उल्लेख केलेली फायद्याची गोष्ट सोडली पाहिजे, आणि मग, याप्रमाणें सोडलेली फायद्याची गोष्ट, तिची विल्हेवाट केलेली नसल्याप्रमाणेंच, त्या तबदील करून देणाराला अगर त्याच्या वारस्याला पुनः प्राप्त होईल;

तथापि,

तो व्यवहार मोबदल्याशिवाय असून, त्या मिळकतीच्या मालकानें सदरील दोन गोष्टींपैकीं एक गोष्ट पत्करण्यापूर्वीं तो तबदील करून देणारा मरण पावला तर, अगर ती मिळकत पुनः तबदील करून देण्यास इतर कोणत्याही रीतीनें तो असमर्थ झाला तर,

आणि तो व्यवहार मोबदला घेऊन केलेला असेल तेव्हां सर्व प्रसंगीं,

निराश झालेल्या तबदील करून घेणाऱ्या मनुष्यास जी मिळकत तबदील करून देण्याचा प्रयत्न केलेला असेल, त्या मनुष्यास त्या मिळकतीइतकी रकम अगर त्या मिळकतीच्या किंमती इतका पैसा त्या सोडून दिलेल्या फायद्यांतून भरून द्यावा लागेल.

**उदाहरणें.**

सुलतानपुरचें शेत कची मिळकत असून ८०० रुपये किंमतीचें आहे. अ हा एका देणगीपत्रांत तें बला देतो, आणि त्याच लेखाअन्वयें कला १००० रुपये तबदील करून देतो. क आपलें शेतच आपणांकडे ठेवण्याचें पत्करितो. ते १००० रुपये त्याला मिळावयाचे नाहींत.

वरील उदाहरणांतच आपलें शेत आपणांकडे ठेवण्याचें कनें पत्करण्यापूर्वीं अ मरण पावतो; तर त्याच्या वारस्यानें सदहू १००० रुपयांपैकीं ८०० रुपये बला दिले पाहिजेत.

मिळकत तबदील करून देणारा, ती मिळकत आपली आहे असें समजत असो अगर नसो, ह्या कलमाच्या पहिल्या पारिग्राफांतील ठराव दोन्ही बाबतींस लागू होतील.

अशा कोणत्याही व्यवहारावरून प्रत्यक्ष रीतीनें ज्या कोणत्याही मनुष्याचा फायदा न होतां परोक्षरीतीनें फायदा होत असेल, त्याला सदरीं सांगितल्याप्रमाणें दोन गोष्टींपैकीं एकच गोष्ट पत्करण्याची जरूरी नाहीं.

अशा व्यवहारावरून उत्पन्न होणारा एकादा फायदा एका नात्यानें स्वीकारणारा कोणताही मनुष्य, दुसऱ्या नात्यानें तो फायदा नाकबूल करूं शकेल.

वरील शेवटल्या चार नियमांस अपवादः—कोणताही मनुष्य जेव्हां कोणतीही मिळकत तबदील करून देईल, आणि त्या मिळकतीच्या मालकास अमुक फायदा दिलेला आहे असें व तो फायदा त्या मिळकतीच्या मोबदला दिलेला आहे असें त्या व्यवहारांत निर्दिष्ट केलेलें असेल, तेव्हां, त्या मालकानें त्या मिळकतीवर हक्क सांगितल्यास त्यानें तो विवक्षित फायदा सोडून दिला पाहिजे; परंतु त्याच व्यवहारांत त्याला जो दुसरा कोणताही फायदा दिलेला असेल, तो त्यानें सोडलाच पाहिजे असें नाहीं.

अशा प्रकारचा फायदा ज्या कोणत्याही मनुष्यास दिलेला असेल, त्याला, दोहोंतून एक गोष्ट पत्करणें आपणास भाग आहे हें माहीत असून, आणि एकादा समजुतदार मनुष्य दोन गोष्टींतून अमुक गोष्ट पत्करणें चांगलें असें ज्या कारणावरून अनुमान करील तीं कारणें माहीत असून, अगर त्यानें त्या कारणांबद्दल चौकशी करण्याचें सोडून, जर तो फायदा स्वीकारला, तर त्यानें तो तबदील करून देण्याचा व्यवहार कबूल केला असें होईल.

कोणा मनुष्यास दिलेला असा कोणताही फायदा जर त्यानें नाकबुली दर्शविणारें कोणतेंही कृत्य केल्यावांचून दोन वर्षेपर्यंत भोगला, तर, उलट पुरावा नसल्यास, त्याला वर लिहिलेली माहिती होती अगर वर सांगितल्याप्रमाणें त्यानें चौकशी करावयाची सोडिली, असें समजलें पाहिजे.

त्यानें जर असें कोणतेंही कृत्य केलें कीं, त्यामुळें, तबदील करून दिलेल्या मिळकतींत हितसंबंध असलेलीं मनुष्यें तें कृत्य करण्यांत आलें नसतें तर ज्या स्थितींत असतीं ती स्थिति

त्यांस प्राप्त करून देतां यावयाची नाहीं, तर, त्या कृत्यावरून, वर उल्लेख केलेल्या प्रकारची त्यास माहिती होती असें आणि वर लिहिल्याप्रमाणें चौकशी करावयाची त्यानें सोडिली असें, अनुमान करण्यास हरकत नाहीं.

**उदाहरण.**

ज्या एस्टेटीवर कचा हक्क आहे ती एस्टेट अ हा बला तबदील करून देतो, व त्याच व्यवहाराचा भाग म्हणून कला एक कोळशाची खाण देतो. ती खाण क हा आपल्या कबज्यांत घेऊन खलास करितो. असें केल्यानें त्यानें ती एस्टेट बच्या नांवीं करण्याचा व्यवहार मान्य केला असें समजलें पाहिजे.

त्यानें, तो व्यवहार कबूल करण्याचा अगर नाकबूल करण्याचा आपला इरादा त्या व्यवहाराच्या तारिखेपासून एका वर्षाच्या आंत, तबदील करून देणाराला अगर त्याच्या वारस्यांला कळविला नाहीं तर, ती मुदत संपली ह्मणजे त्या तबदील करून देणारास अगर त्याच्या वारस्यांस दोहोंतून एक गोष्ट पत्करण्याविषयीं त्याला फर्माविण्याचा अख्त्यार आहे; आणि असें फर्माविल्यानंतर वाजवी वेळाच्या आंत त्यानें त्याप्रमाणें केलें नाहीं तर, त्यानें तो तबदील करून देण्याचा व्यवहार कबूल केला असें समजलें पाहिजे.

नालायकी असल्यास ती नाहींशी होईपर्यंत किंवा कोणी योग्य अधिकारी दोहोंतून एक गोष्ट पत्करी तोंपर्यंत, तें पत्करण्याचें काम तहकूब ठेविलें पाहिजे.

**हिशांप्रमाणें वांटून देणें.**

*हक्क असणाऱ्या असामीचा हितसंबंध संपल्यावर, मुदती-मुदतीनें यावयाच्या रकमा हिशांप्रमाणें वांटून देणें.*

३६. कोणतींही भाडीं, वर्षासनें, पेन्शनें, डिव्हिडेंड आणि मुदती मुदतीनें मिळावयाच्या उत्पन्नाच्या स्वरूपाचीं इतर कोणतींही येणीं मिळण्यास हक्क असलेल्या मनुष्याचा हितसंबंध तबदील करून दिला जाईल तेव्हां, उलट करार अगर उलट स्थानिक वहिवाट नसल्यास, तीं सर्व येणीं, तबदील करून देणारा आणि ज्याला तो हितसंबंध तबदील करून दिलेला असेल तो, ह्यांच्या दरमियान दिवसानुदिवस निपजत जाऊन त्यांची त्याप्रमाणें हिसेरसीनें वांटणी करितां येईल असें समजावें. परंतु तीं येणीं, तीं देण्याच्या ज्या तारिखा नेमिल्या असतील, त्या तारखांस मात्र मिळतील.

*विभाग केल्यानंतर कर्तव्यतेचा फायदा हिशांप्रमाणें वांटून देणें.*

३७. जेव्हां कोणतीही मिळकत तबदील करून दिल्यावरून ती विभागली जाऊन निरनिराळ्या हिशांनीं धारण केली जाईल आणि त्यामुळें त्या संपूर्ण मिळकतीसंबंधाच्या कोणत्याही कर्तव्यतेचा फायदा तिच्या एका मालकाकडून अनेक मालकांकडे जाईल, तेव्हां, ती कर्तव्यता, त्या मालकांच्या दरम्यान कांहीं उलट करार नसल्यास, त्या मालकांचे त्या मिळकतींत हिसे असतील त्या हिशांच्या किमतीच्या मानानें त्या प्रत्येक मालकाच्या फायद्यासाठीं करण्यांत आली पाहिजे; मात्र, ती कर्तव्यता विभागतां येण्यासारखी असून, तिचें ओझें, ती विभागल्यामुळें वस्तुतः वाढलें न पाहिजे; परंतु ती कर्तव्यता जर विभागतां येण्यासारखी नसेल, अगर ती विभागली असतां तिचा बोजा वस्तुतः वाढण्यासारखा असेल, तर, ते मालक आपणांपैकीं ज्या मालकाच्या फायद्यासाठीं ती करावी ह्मणून सामाईक रीतीनें सांगतील, त्याच्या फायद्यासाठीं ती करण्यांत आली पाहिजे:

मात्र, अशा कर्तव्यतेचें ओझें ज्या मनुष्यावर असेल तो, ती मिळकत विभागल्याची वाजवी खबर त्याला असल्याखेरीज व मिळेपर्यंत, ती या कलमांत ठरविलेल्या रीतीनें पुरी करण्यास चुकल्याबद्दल जबाबदार होणार नाहीं.

ह्या कलमांतील ठराव शेतकीच्या कारणांसाठीं दिलेल्या पट्ट्यांस लागू आहेत अशा अर्थाचा जाहिरनामा स्थानिक सरकाराकडून सरकारी गॅझेटांत देण्यांत आल्याशिवाय अगर देण्यांत येई तों पर्यंत त्यांपैकीं कोणताही ठराव तशा पट्ट्यांस लागू होणार नाहीं.

उदाहरणें.

(अ) सालीना ३० रुपये व एक पोसलेलें मेंढरूं घेण्याच्या करारानें इला पट्टयानें दिलेलें एका खेड्यांतलें घर अ हा, ब, क व ड ह्यांस विकतो. खरेदीच्या पैशापैकीं अर्धी रक्कम बनें दिली आहे, आणि क व ड ह्यांनीं प्रत्येकीं एकचतुर्थांश दिली आहे. इला ह्याविषयीं खबर असली तर, त्यानें बला १५ रुपये दिले पाहिजेत, कला ७½ रुपये दिले पाहिजेत, आणि डला ७½ रुपये दिले पाहिजेत, आणि ब, क व ड हे मिळून सांगतील त्याप्रमाणें तें मेंढरूं दिलें पाहिजे.

(ब) सदरील घराच्या बाबतींत, सदर्हू खेड्यांतील प्रत्येक घराला, पूर येऊं नये ह्मणून, बांधावर दरसाल दाहा दिवसांचें काम करणें भाग असल्यामुळें, असाठीं हें काम आपण करूं असें इ यानें आपल्या पट्टयांत कबूल केलें आहे. ब, क व ड हे प्रत्येकीं आपआपल्या घराबद्दल दहा दहा दिवसांचें काम इला करावयास सांगतात. परंतु इ ह्याला, ब, क व ड मिळून हुकूम देतील त्याप्रमाणें एकंदरींत दाहा दिवस काम करावें लागेल-जास्त काम करण्यास त्याला भाग पडणार नाहीं.

## ब.—स्थावर मिळकत तबदील करून देणें.

३८. ज्या कोणत्याही मनुष्याला विवक्षित गोष्टी घडून आल्या असतां मात्र स्थावर मिळकतीची विल्हेवाट करण्याचा अधिकार असेल, आणि त्या गोष्टींच्या प्रकारांत बदल होण्यासारखा असेल, त्या मनुष्यानें तशा गोष्टी घडून आल्या असें म्हणून तशी मिळकत, कांहीं मोबदला घेऊन दुसऱ्याला तबदील करून दिली तर, ती मिळकत ज्या मनुष्याला तबदील करून दिलेली असेल तो मनुष्य तशा गोष्टी घडून आल्याबद्दल आपली खात्री होण्यासाठीं वाजवी काळजी घेऊन खऱ्या भावानें वागलेला असल्यास, एका तर्फे तबदील करून देणारा आणि दुसऱ्या तर्फे ज्याला ती मिळकत तबदील करून दिली आहे तो आणि त्या व्यवहाराशीं इतरांचा संबंध असल्यास ते, ह्यांच्या दरम्यान म्हटलें म्हणजे त्या गोष्टी घडून आल्या असें समजलें पाहिजे.

विवक्षित गोष्टी घडून आल्या असतां मात्र तबदील करून देण्याचा अधिकार असलेल्या मनुष्यानें तबदील करून देणें.

उदाहरण.

अ ह्या हिंदुविधवेच्या नवऱ्याचे तेढे वारस असून, ती, आपण विधवेच्या नात्यानें धारण केलेली मिळकत आपल्या निर्वाहास पुरत नाहीं ह्या सबबीवर, धर्मसंबंधीही नव्हे व परोपकार संबंधीही नव्हे अशा कारणाकरितां त्या मिळकतीपैकीं एक शेत बला विकण्याचा करार करिते. ब हा योग्य चौकशी करून, सदर्हू मिळकतीचें उत्पन्न अच्या निर्वाहाला पुरण्यासारखें नाहीं व सदर्हू शेत विकणें जरूर आहे अशी आपली खात्री करून घेऊन खऱ्या भावानें तें शेत अकडून विकत घेतो. एका तर्फेनें ब आणि दुसऱ्या तर्फेनें अ व ते तेढे वारस, ह्यांच्या दरम्यान म्हटलें म्हणजे सदर्हू विक्रीची जरूरी होती असें समजलें पाहिजे.

३९. स्थावर मिळकतीच्या उत्पन्नांतून एकाद्या तिसऱ्या मनुष्याला पोटगी मिळण्याचा अथवा आईबापांच्या हयातींत जो अगाऊ पैसा मिळतो तो अगर लग्नाचा खर्च मिळण्याचा हक्क असतांना ती स्थावर मिळकत, असा हक्क बुडविण्याच्या इरायानें दुसऱ्या मनुष्याला तबदील करून देण्यांत आली तर, ती मिळकत ज्याला तबदील करून दिलेली असेल त्याला त्या इरायाची खबर असल्यास किंवा ती मिळकत त्याला मोबदल्याशिवाय तबदील करून दिलेली असल्यास, तो हक्क त्या मनुष्याच्या विरुद्ध बजाविण्याचा अख्त्यार आहे; परंतु ती मिळकत कांहीं मोबदला घेऊन त्याला तबदील

तिसऱ्या मनुष्याचा पोटगीचा हक्क असतांना मिळकत तबदील करून दिली असेल त्याबाबत.

करून दिलेली असेल, आणि त्याला त्या हक्काची खबर नसेल, तर, त्याच्या विरुद्ध अगर त्याच्या हातांत असलेल्या त्या मिळकतीविरुद्ध तो हक्क बजावितां यावयाचा नाहीं.

उदाहरण.

(अ) अ हा हिंदू, आपली भावजय ब इच्या मयत नवऱ्याच्या मिळकतीचा हक्कदार झाल्या कारणानें आपणावर त्या भावजईचा तिच्या पोटगीबद्दल जो हक्क लागू झाला आहे त्याचा मोबदला म्हणून, तिला सुलतानपूर तबदील करून देतो; आणि तिच्याशीं असा करार करितो कीं, तुझ्याकडून सुलतानपूर जर काढून घेतलें, तर मी, माझ्या कबज्यांत दुसरी अमुक विवक्षित गांवें आहेत त्यांपैकीं तुला पसंत पडेल त्यांतील सुलतानपुराच्या क्षेत्रफळाइतकी जमीन तुला तबदील करून देईन. अ तीं खेडीं कला विकतो, व क हा तीं, खऱ्या भावानें व सदरील कराराची खबर नसतां विकत घेतो. ब कडून सुलतानपूर काढून घेतलें जातें. तर कला तबदील करून दिलेल्या खेड्यांवर तिचा हक्क नाहीं.

जमिनीचा भोगवटा करण्यास प्रतिबंध जीवरून होतो त्या कर्तव्यतेचा बोजा.

४०. जेव्हां एकाद्या तिसऱ्या मनुष्याला त्याची स्वतःची स्थावर मिळकत जास्त फायदेशीर रीतीनें भोगतां यावी यासाठीं, दुसऱ्या मनुष्याच्या स्थावर मिळकतींतील हितसंबंधाशीं अगर तिच्या कोणत्याही सवलतीशीं संबंध नसतां, त्या दुसऱ्या मनुष्याच्या मिळकतीच्या भोगवट्याला प्रतिबंध करण्याचा, अगर ती विवक्षित रीतीनें भोगण्यास लावण्याचा हक्क असेल, तेव्हां, अगर,

अगर मालकीस लागून असलेल्या परंतु हितसंबंधाच्या अगर सवलतीच्या बरोबरीच्या नसणाऱ्या कर्तव्यतेचा बोजा.

करारापासून उद्भवणाऱ्या आणि स्थावर मिळकतीच्या मालकीस लागून असलेल्या, परंतु त्या मिळकतींतील हितसंबंधाच्या अगर तिच्या सवलतीच्या बरोबरीची नव्हे अशा कर्तव्यतेचा फायदा मिळण्याचा एकाद्या तिसऱ्या मनुष्यास हक्क असेल तेव्हां,

अशा प्रकारचा हक्क अगर कर्तव्यता, मिळकत ज्याला तबदील करून दिलेली असून ज्या मनुष्यास त्या हक्काची अगर कर्तव्यतेची खबर असेल त्याविरुद्ध, किंवा त्या हक्काशीं अगर कर्तव्यतेशीं संबंध असलेली मिळकत ज्याला मोबदला न घेतां तबदील करून दिलेली असेल त्या मनुष्याविरुद्ध बजावण्याचा अख्त्यार आहे; परंतु, मिळकत मोबदल्यासाठीं ज्याला तबदील करून दिलेली असेल आणि ज्यास त्या हक्काची अगर कर्तव्यतेची खबर नसेल, त्याच्या विरुद्ध अगर त्याच्या हातांत असलेल्या अशा मिळकती विरुद्ध तो हक्क अगर ती कर्तव्यता बजावतां येणार नाहीं.

उदाहरण.

अ हा सुलतानपुर बला विकण्याचा करार करितो. करार अमलांत असतानांच अ हा सुलतानपुर क ला विकतो. क ला त्या कराराची खबर आहे. ब ह्याला तो करार अ विरुद्ध जितका बजावतां आला असता तितकाच तो कच्या विरुद्ध बजावण्याचा त्याला अख्त्यार आहे.

नांवापुरत्या मालकानें तबदील करून देणं.

४१. स्थावर मिळकतींत हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांच्या स्पष्ट अगर गर्भित संमतीनें कोणी मनुष्य त्या मिळकतीचा नांवापुरता मालक असून त्यानें ती मिळकत कांहीं मोबदला घेऊन दुसऱ्याला तबदील करून दिली तर, त्या तबदील करून देणाराला तो व्यवहार करण्याचा अधिकार नव्हता ह्या मुद्यावर तो व्यवहार निरर्थक करण्याजोगा आहे असें समजूं नये; मात्र इतकेंच कीं, ज्या मनुष्याला ती मिळकत तबदील करून दिली असेल, त्यानें, तबदील करून देणाराला तो व्यवहार करण्याचा अधिकार होता कीं काय ह्याबद्दल वाजवी काळजीनें आपली खात्री करून घेऊन खऱ्या भावानें वागलें असलें पाहिजे.

आधींचा तबदील करण्याचा व्यवहार रद्द करण्यास अधिकार असलेल्या मनुष्यानें तबदील करून देणें.

४२. कोणताही मनुष्य स्थावर मिळकत दुसऱ्याला तबदील करून देईल परंतु तो व्यवहार रद्द करण्याचा अधिकार आपणाकडे राखील, आणि तदनंतर ती मिळकत कांहीं मोबदला घेऊन दुसऱ्या एखाद्या मनुष्याला तबदील करून देईल, तर, हा दुसरा तबदील करून देण्याचा व्यवहार त्या दुसऱ्या मनुष्यास लाभदायक होऊन, पहिला तबदील करून देण्याचा व्यवहार त्या राखिलेल्या अधिकाराच्या प्रमाणानें रद्द होईल असें समजावें; मात्र, हा दुसरा व्यवहार, त्या अधिकार चालविण्याच्या संबंधानें जी अट घातलेली असेल, त्या अटींवरहुकुम झालेला असला पाहिजे.

### उदाहरण.

अ हा एक घर बला भाड्यानें देतो, आणि त्या घराची किंमत उतरेल अशा रीतीनें बनें त्याचा उपयोग केला आहे असें अमुक एका सर्व्हेयरानें मत दिल्यास त्या घराचा पट्टा रद्द करण्याचा अधिकार आपणाकडे राहील असें ठरवितो. नंतर, अ हा, तें घर तसें वापरण्यांत आलें असें वाटून तें कला भाड्यानें देतो. ह्या कृत्याच्या योगानें, तें घर ब ह्याजकडून त्याची किंमत उतरे अशा रीतीनें वापरण्यांत आलें असा त्या सर्व्हेयरचा अभिप्राय असल्यास, बचा पट्टा रद्द होईल.

अधिकार नसलेल्या मनुष्यानें मिळकत तबदील करून दिल्यानंतर त्याला त्या मिळकतींत हितसंबंध प्राप्त झाला, तर काय होतें.

४३. कोणी मनुष्य जर अमुक एक स्थावर मिळकत तबदील करून देण्याचा आपणास अधिकार आहे असें चुकीनें दर्शवून ती मिळकत कांहीं मोबदला घेऊन दुसऱ्याला तबदील करून देईल तर, त्या तबदील करून घेणाऱ्या मनुष्याच्या मर्जीस आल्यास त्याला, त्या तबदील करून देणाऱ्या मनुष्याला सदर्हू करार चालू राहील त्या मुदतींत कोणत्याहि वेळीं त्या मिळकतींत जो कोणताही हितसंबंध मिळेल त्यावर, त्या तबदील करून देण्याच्या व्यवहाराचा अमल करितां येईल.

अशी मुखत्यारी असल्याबद्दल खबर नसतांना ज्या मनुष्यांनीं मोबदला देऊन मिळकत तबदील करून घेतली असेल त्यांच्या हक्कास बाध येतो असें ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून होत नाहीं.

### उदाहरण.

अ हा हिंदु आपला बाप ब ह्यापासून विभक्त झालेला आहे; तो, क्ष, य, व झ हीं शेतें दुसऱ्याच्या नांवीं करण्यास आपणास अधिकार आहे असें दर्शवून तीं कला विकतो. ह्या तीन शेतांपैकीं झ हें शेत अचें नसून, तें वाटणीच्यावेळीं बनें आपल्याकडे ठेविलेलें आहे. परंतु ब मरण पावल्यावर अ ह्याला वारस ह्या नात्यानें झ शेत मिळतें. कनें विक्रीचा करार रद्द केलेला नसल्यास त्याला ब ह्यास झ शेत आपल्या हवालीं करण्यास भाग पाडण्याचा हक्क आहे.

सामाइक मालकांपैकीं एकाद्या मालकानें तबदील करून देणें.

४४. स्थावर मिळकतीच्या दोन अथवा अधिक सामाइक मालकांपैकीं जो कोणताही एक मालक त्या मिळकतींतला आपला हिसा अगर त्यांतला कोणताही हितसंबंध तबदील करून देण्यास कायदेशीर रीतीनें लायक असेल, त्यानें त्या मिळकतींतला आपला हिसा अगर त्यांतला कोणताही हितसंबंध तबदील करून दिला तर त्याला तो हिसा अगर हितसंबंध तबदील करून दिलेला असेल त्या मनुष्यास, अशा हिशाच्या अगर हितसंबंधाच्या संबंधानें आणि तो तबदील करण्याचा व्यवहार अमलांत आणण्याला जरूर असेल तितक्यापुरता, त्या मिळकतीचा सामाइक कबजा मिळण्याचा अथवा तिचा इतर सामाइक अगर अंशभूत भोगवटा मिळण्याचा व तिची वांटणी करून मागण्याचा तबदील करून देणारास असेल तेवढा हक्क, प्राप्त होईल; मात्र इतकेंच कीं, हा हक्क, याप्रमाणें तबदील करून दिलेल्या हिशाला अगर हितसंबंधाला त्या व्यवहाराच्या तारिखेस ज्या शर्ती लागू असतील, त्या शर्तींस पात्र राहील.

अविभक्तकुटुंबाच्या मालकीच्या एकाद्या राहाण्याच्या घराचा हिसा ज्याला तबदील करून दिला असेल तो मनुष्य त्या कुटुंबापैकीं नसला तर, ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून त्या मनुष्याला त्या घराचा सामाइक कबजा अगर इतर सामाइक किंवा अंशभूत भोगवटा मिळण्याचा हक्क प्राप्त होतो असें समजूं नये.

काहीं मोबदला घेऊन दोन अगर अधिक मनुष्यांस मिळून तबदील करून देणें.

४५. कोणतीही मिळकत कांहीं मोबदला घेऊन दोन अगर अधिक मनुष्यांना तबदील करून दिली जाईल, आणि तो मोबदला त्यांच्या एकाद्या सामाइक रकमेंतून दिला जाईल, तेव्हां, उलट करार नसल्यास, त्या मनुष्यांचा त्या सामाइक रकमेंत जितका जितका हितसंबंध असेल, तितका तितका हितसंबंध, होईल तितकें करून, त्या मनुष्यांस त्या मिळकतींत मिळाला पाहिजे; आणि तो मोबदला त्या मनुष्यांच्या मालकीच्या निरनिराळ्या रकमांतून दिलेला असेल तेव्हां, उलट करार नसल्यास, त्यांपैकीं प्रत्येकानें त्या मोबदल्याचा जो जो हिसा दिलेला असेल, त्या त्या हिशाच्या प्रमाणानें त्या प्रत्येकाला त्या मिळकतींतला हितसंबंध मिळाला पाहिजे.

अशा सामाइक रकमेंत त्या प्रत्येकाचा किती किती हितसंबंध आहे त्याबद्दल किंवा त्या प्रत्येकानें मोबदल्याचा कोणकोणता हिसा दिलेला आहे त्याबद्दल पुरावा नसेल तेव्हां, त्या मनुष्यांचा त्या मिळकतींत समसमान हितसंबंध आहे असें गृहीत घेतलें पाहिजे.

निरनिराळे हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांनीं मोबदला घेऊन मिळकत तबदील करून देणें.

४६. स्थावर मिळकतींत निरनिराळे हितसंबंध असणाऱ्या मनुष्यांनीं ती कांहीं मोबदला घेऊन तबदील करून दिलेली असेल तेव्हां, उलट करार नसल्यास, तबदील करून देणाऱ्या मनुष्यांचा त्या मिळकतींतील हितसंबंध सारख्या मोलाचा असेल त्या प्रसंगीं त्यांस त्या मोबदल्याचे समसमान विभाग मिळाले पाहिजेत, आणि त्या मनुष्यांचे त्या मिळकतींतील हितसंबंध सारख्या मोलाचे नसतील त्या प्रसंगीं त्या मनुष्यांस त्या मिळकतींतल्या आपापल्या हितसंबंधाच्या मोलाच्या प्रमाणानें त्या मोबदल्याचे विभाग मिळाले पाहिजेत.

### उदाहरणें.

(अ) मौजे सुलतानपुरापैकीं **अ**ची अर्ध्या हिशावर आणि **ब** व **क** ह्यांची प्रत्येकीं चौथ्या हिशावर मालकी असून, ते, त्या गांवाचा आठवा हिसा देऊन त्याच्याबदला मौजे लालपुरा गांवाचा चौथा हिसा घेतात. उलट करार नसल्याकारणानें, **अ**ला लालपुऱ्याचा आठवा हिसा मिळण्याचा हक्क आहे, आणि **ब** व **क** ह्यांना प्रत्येकीं सोळावा हिसा मिळण्याचा हक्क आहे.

(ब) मौजे अत्रालीमध्यें **अ**चा हयातीपर्यंतचा हितसंबंध असून **ब** आणि **क** यांचा उत्तराधिकार आहे, ते, सदहूं गांव १००० रुपयांना विकितात. **अ**चा हयातीपर्यंतचा हितसंबंध ६०० रुपये किंमतीचा व **ब** आणि **क** ह्यांचा उत्तराधिकार ४०० रुपये किंमतीचा आहे असें समजलें आहे. तर, विक्रीच्या पैशांतून **अ**ला ६०० रुपये आणि **ब** व **क** यांना मिळून ४०० रुपये मिळण्याचा हक्क आहे.

सामाइक मिळकतींतला हिसा सामाइक मालकांनीं तबदील करून देणें.

४७. स्थावर मिळकतीचे सामाइक मालक, तींतला एकादा हिसा तबदील करून, तो व्यवहार आपल्या हिशांपैकीं अमुक हिशाच्या अगर हिशांच्या संबंधानें अमलांत येईल असें निर्दिष्ट करणार नाहींत, तेव्हां, त्या तबदील करून देणारांच्या संबंधानें ह्मटलें ह्मणजे, तो व्यवहार, त्यांचे हिसे समसमान असतील त्याप्रसंगीं त्या हिशांच्या संबंधानें समसमान रीतीनें अमलांत येईल, आणि त्यांचे हिसे समसमान नसतील त्याप्रसंगीं त्या हिशांच्या प्रमाणानें अमलांत येईल.

### उदाहरण.

मौजे सुलतानपुरांत **अ** हा आठ आण्यांच्या हिशाचा मालक आहे, आणि **ब** व **क** हे प्रत्येकीं चार आण्यांचे मालक आहेत. ते, आपल्या निरनिराळ्या हिशांपैकीं कोणत्या हिशांतून तें न सांगतां, त्या गांवांतील दोन आण्यांचा हिसा **ड**ला तबदील करून

देतात. हा व्यवहार अमलांत आणण्यासाठीं अच्या हिशांतून एक आण्याचा हिसा घेतला जातो, आणि ब व क ह्यांच्या प्रत्येकाच्या हिशांतून अर्ध्या आण्याचा हिसा घेतला जातो

४८. कोणत्याही मनुष्यानें कोणतीही एकच स्थावर मिळकत निरनिराळ्या वेळीं तबदील करून देऊन तींत अगर तीवर एकाच वेळीं पूर्णपणें असूं न शकण्यासारखे अगर एकाच वेळीं पूर्णपणें चालवितां येणार नाहींत असे हक्क उत्पन्न केले तर, ती मिळकत ज्यांना आधीं तबदील करून दिलेली असेल त्यांस लागू असणाऱ्या विशेष कराराचे अगर अटीचे अभावीं, पाठीमागून उत्पन्न केलेला प्रत्येक हक्क त्याचे आधीं उत्पन्न केलेले हक्कांस पात्र राहून अमलांत येईल.

तबदील करून दिल्यानें उत्पन्न झालेल्या निरनिराळ्या हक्कांपैकीं कोणत्या हक्कास अग्रेसर समजावें.

४९. कोणतीही स्थावर मिळकत कांहीं मोबदला घेऊन दुसऱ्या मनुष्याला तबदील करून दिली जाईल, आणि तिचा अगर तिच्या कोणत्याही भागाचा, त्या व्यवहाराच्या तारिखेस, आगीपासून होणाऱ्या नाशासंबंधानें अगर नुकसानीसंबंधानें विमा उतरलेला असेल तेव्हां, तसा नाश अगर तसें नुकसान झाल्यास, ती मिळकत ज्याला तबदील करून दिलेली असेल त्याला, उलट करार नसला तर, मिळकत तबदील करून देणाराला पालिसीअन्वयें जो नक्की पैसा मिळेल तो सगळा अगर त्यांतला जरूर लागेल तितका अंश ती मिळकत पूर्वस्थितींत आणण्याकरितां खर्चण्यास भाग पाडण्याचा अख्त्यार आहे.

तबदील करून घेणाऱ्या मनुष्याचा विम्याच्या पालिसीअन्वयें हक्क.

५०. ज्या कोणत्याही मनुष्याकडून जो कोणताही मनुष्य कोणतीही स्थावर मिळकत इमानानें धारण करीत असेल, त्या मनुष्याला त्या धारण करणाऱ्या मनुष्यानें त्या मिळकतीचें भाडें अगर तिचें उत्पन्न इमानें इतबारें दिलें अगर हवालीं केलें तर, ज्या मनुष्याला तें भाडें अगर उत्पन्न दिलें असेल अगर हवालीं केलें असेल त्या मनुष्याला तें घेण्याचा हक्क नव्हता असें मागाहून दिसून आलें तरी, त्या दिलेल्या भाड्याबद्दल अगर उत्पन्नाबद्दल त्या धारणकरणाऱ्या मनुष्यास जबाबदार धरलें जाणार नाहीं.

अपुऱ्या हक्कानें धारण करणारास इमानें इतबारें दिलेलें भाडें.

उदाहरण.

अ हा बला एक शेत ९० रुपये भाड्यानें देतो, आणि नंतर तें कला तबदील करून देतो. बला ह्या दुसऱ्या व्यवहाराची खबर नसल्यामुळें तो तें भाडें अ ह्याला इमानें इतबारें देतो. ह्याप्रमाणें दिलेलें भाडें ब कडून दुसऱ्यानदा भाडें घेतां येणार नाहीं.

५१. कोणतीही स्थावर मिळकत ज्याला तबदील करून दिली असेल तो मनुष्य त्या मिळकतीवर आपला पूर्ण हक्क आहे असें इमानानें समजून तिच्यांत कोणतीही सुधारणा करील, आणि नंतर त्यापेक्षां जास्त हक्क असणारा कोणी मनुष्य त्याला तींतून काढून लावील, तर, ती मिळकत ज्याला तबदील करून दिली होती त्या मनुष्यास, त्या सुधारणेची किंमत ठरवून ती आपणास मिळावी किंवा आपणास मिळेल असा बंदोबस्त करावा एक, अगर त्या काढून लावणाराचा त्या मिळकतींतला हितसंबंध त्या सुधारणेची किंमत जमेस न धरितां त्याच्या बाजार किमतीनें आपणास विकत मिळावा एक, अशाबद्दल त्या काढून लावणाराला भाग पाडण्याचा अख्त्यार आहे.

अपुऱ्या हक्काच्या परंतु इमान इतबारें धारण करणाऱ्या मनुष्यानें केलेल्या सुधारणा.

अशा सुधारणेसंबंधानें द्यावयाची अगर देण्यांत येईल अशाबद्दल बंदोबस्त करावयाची रकम म्हटली म्हणजे, काढून लावण्याचे वेळीं तिची अजमासें जी किंमत होईल ती होय असें समजावें.

ती मिळकत ज्याला तबदील करून दिलेली असेल त्या मनुष्यानें, सदरीं सांगितलेल्या प्रसंगीं त्या मिळकतींत जें पीक लाविलें किंवा पेरिलें असेल तें त्याला तिच्यांतून काढून लावण्याच्या वेळीं वाढत असलें तर, तें मिळण्याचा आणि तें कापून नेण्याकरितां येण्याजाण्याची पूर्ण मोकळीक असण्याचा त्याला हक्क आहे.

मिळकतीच्या संबंधानें दावा चाललेला असतांना ती तबदील करून देणें.

९२. ब्रिटिश इंडियामध्यें अधिकार असणाऱ्या अगर गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं ब्रिटिश इंडियाच्या हद्दींबाहेर स्थापिलेल्या कोणत्याहि कोर्टांत कोणत्याहि स्थावर मिळकतीवरील कोणत्याही हक्कासंबंधानें प्रत्यक्ष आणि विशिष्टरीतीनें ज्यांत वाद असेल असा एकादा तक्रारी दावा अगर काम वस्तुतः चाललें असतांना, त्या दाव्यांतील अगर कामांतील कोणत्याही पक्षकारानें, त्या दाव्यांत अगर कामांत जो कोणताही हुकुमनामा अगर हुकुम करण्यांत येईल त्यावरून त्या मिळकतीच्या कोणत्याही इतर पक्षकाराच्या उत्पन्न होणाऱ्या हक्कांस बाध येईल अशा रीतीनें, कोर्टानें अधिकार दिल्याखेरीज आणि कोर्ट ठरवील त्या शर्तीशिवाय इतर कोणत्याही शर्तीवर, ती मिळकत तबदील करून देऊं नये अगर तिची दुसऱ्या रीतीनें विल्हेवाट लावूं नये.

दगलबाजीनें तबदील करून देणें.

९३. स्थावर मिळकत तबदील करून देण्याचा व्यवहार जेव्हां, तीच मिळकत कांहीं मोबदला घेऊन ज्या मनुष्यांना आधीं तबदील करून दिलेली असेल अगर मागाहून तबदील करण्यांत आली असेल, त्या मनुष्यांस अगर त्या मिळकतीच्या सामाइक मालकांस अगर तींत हितसंबंध असलेल्या इतर मनुष्यांस ठकविण्याच्या इराद्यानें अगर तबदील करून देणाराच्या धनकोंस बुडविण्याच्या अगर त्यांचें येणें लांबणीवर टाकण्याच्या इराद्यानें करण्यांत येईल, तेव्हां, तो व्यवहार, याप्रमाणें ठकविलेल्या, बुडविलेल्या अगर ज्याचें येणें लांबणीवर टाकिलें असेल त्या कोणत्याही मनुष्याची, तशी मर्जी असल्यास, निरर्थक होईल.

स्थावर मिळकत तबदील करून दिल्यावरून असा कोणताही मनुष्य ठकेल, बुडेल अगर त्याचें येणें लांबणीवर पडेल तेव्हां, ती मिळकत मोबदल्याशिवाय अगर फारच कमी मोबदला घेऊन तबदील करून दिलेली असल्यास, तो व्यवहार सदरीं सांगितलेल्या इराद्यानें केलेला आहे असें अनुमान करण्याचा अखत्यार आहे.

खऱ्या भावानें व मोबदला देऊन ज्या कोणत्याहि मनुष्यानें कोणतीही स्थावरमिळकत तबदील करून घेतली असेल, त्या मनुष्याच्या हक्कांस ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून बाध येणार नाहीं.

---

## बाब ३.

### स्थावरमिळकतीच्या विक्रयांविषयीं.

"विक्री" शब्दाची व्याख्या.

९४. "विक्री" ह्मणजे दिलेल्या अगर कबूल केलेल्या अगर अंशतः दिलेल्या आणि अंशतः कबूल केलेल्या किमतीच्या मोबदला मालकी तबदील करून देणें होय.

विक्री कशी करावयाची तें

शंभर रुपये व शंभर रुपयांपेक्षां जास्त किंमतीची स्पृश्य स्थावर मिळकत किंवा कोणताही उत्तराधिकार अगर इतर अस्पृश्य बाबत सदरींप्रमाणें तबदील करून देणें ती नोंदलेल्या खतावरून मात्र देतां येते.

शंभर रुपयांपेक्षां कमी किमतीची स्पृश्य स्थावर मिळकत, नोंदलेल्या दस्तऐवजावरून किंवा प्रत्यक्ष हवालीं करून तबदील करून देण्याचा अखत्यार आहे.

स्पृश्य स्थावर मिळकतीचा कबजा ती विकणारानें विकत घेणाराला अगर त्यानें सांगितलेल्या मनुष्याला दिला ह्मणजे, ती मिळकत हवालीं केली असें समजावें.

विक्रीचा करार.

स्थावर मिळकतीची विक्री करण्याचा करार ह्मणजे, उभयपक्षांमध्यें ठरलेल्या शर्तीवर त्या मिळकतीची विक्री होईल अशाविषयीं करार होय.

फक्त अशा करारावरून त्या मिळकतीमध्यें हितसंबंध अगर तीवर बोजा उत्पन्न होत नाहीं.

विकत घेणाराचे व विकत देणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

९५. उलट करार नसेल तेव्हां, स्थावर मिळकत विकत घेणाराला आणि विकत देणाराला, खालीं दिलेल्या नियमांत अगर त्यांपैकीं जे कांहीं नियम विकलेल्या मिळकतीस लागू असतील त्यांत सांगितलेल्या जबाबदाऱ्या व हक्क अनुक्रमें लागू होतील व प्राप्त होतील:—

(१) विकत देणारानें, खालीं दिलेल्या गोष्टी केल्या पाहिजेत :—

(अ) त्या मिळकतींतली जी कोणतीही महत्वाची उणीव आपणास माहीत असेल परंतु विकत घेणाराला माहीत नसेल, आणि जी साधारण सावधगिरीनें विकत घेणाराला शोधून काढतां येणार नाहीं, ती उणीव त्या विकत घेणाराला कळविली पाहिजे;

(ब) मिळकतीवरील हक्काच्या संबंधाचे आपल्या कबज्यांत अगर ताब्यांत असलेले सर्व दस्तऐवज, विकत घेणारानें पाहण्यास मागितले असतां, ते त्याकडे हजर केले पाहिजेत ;

(क) मिळकतीसंबंधाचे अगर मिळकतीवरील हक्कासंबंधाचे जे लागू प्रश्न विकत घेणारा विचारील त्या सर्वांचे जबाब आपल्यास जितकी माहिती असेल तितकी लक्षांत आणून दिले पाहिजेत ;

(ड) मिळकतीच्या किंमतीबद्दलची येणें असलेली रकम आपणास दिल्यावर अगर द्यावयास हजर केल्यावर, आपणापुढें त्या मिळकतीच्या विक्रीचें योग्य खत योग्य वेळीं व योग्य स्थळीं सहीसाक्षीकरितां विकतघेणारानें आणिलें ह्मणजे त्यावर सही घालून तें पुरें केलें पाहिजे ;

(इ) विक्रीच्या कराराची तारीख आणि मिळकत स्वाधीन करण्याची वेळ ह्यांच्या दरम्यान, त्यानें, साधारण समजुतदार मनुष्य अशा मिळकतीस व तिच्या हक्कासंबंधाच्या आपल्या कबजांत असलेल्या दस्तऐवजांस जितका जपेल, तितकें त्या मिळकतीस आणि तिच्या हक्कासंबंधाच्या आपल्या कबजांत असलेल्या सर्व दस्तऐवजांस जपलें पाहिजे ;

(फ) मिळकतीचा कबजा मागितला ह्मणजे, त्या मिळकतीच्या स्वरूपास अनुरूप असा तिचा कबजा, विकत घेणारास अगर तो सांगेल त्या मनुष्यास दिला पाहिजे;

(ग) विक्रीच्या तारिखेपर्यंत त्या मिळकतीच्या संबंधानें देणें झालेले सर्व सार्वजनिक बोजे व भाडें, आणि अशा तारिखेस अशा मिळकतीवरील सर्व बोजांवरचें देणें झालेलें व्याज दिलें पाहिजे ; आणि, मिळकतीवर बोजा कायम ठेवून ती विकली असेल तो प्रसंग खेरीजकरून इतर सर्व प्रसंगीं, त्या तारखेस त्या मिळकतीवर असलेले सर्व बोजे काढून टाकिले पाहिजेत.

(२) विकत देणारा जो हितसंबंध विकत घेणाराला तबदील करून देत असेल, तो हितसंबंध चालू असून तो दुसऱ्याच्या नांवीं करण्याचा आपणास अधिकार आहे असा करार तो विकत देणारा विकत घेणाराबरोबर करितो असें गृहीत घेतलें पाहिजे :

मात्र, अशी विक्री, कोणीं विश्वासानें दिलेल्या अधिकारानें कोणी मनुष्य करील तेव्हां मिळकतीवर बोजा पडे असें अगर मिळकत तबदील करून देण्यास विकत देणारास हरकत येई असें कोणतेंही कृत्य विकत देणारानें केलें नाहीं अशाविषयीं त्यानें करार केला आहे असें गृहीत घेतलें पाहिजे.

ह्या कलमांत सांगितलेल्या कराराचा फायदा, मिळकत ज्याला तबदील करून दिलेली असेल त्याच्या त्या नात्याच्या हितसंबंधाबरोबर जोडलेला राहील व त्या हितसंबंधाबरोबर दुसऱ्याकडे जाईल आणि ज्या कोणत्याही मनुष्यांत तो सगळा हितसंबंध अगर त्याचा कोणताही अंश वेळोवेळीं निविष्ट असेल, त्या प्रत्येक मनुष्यास तो फायदा घेण्याचा अख्त्यार आहे.

(३) विक्रीची सगळी रकम विकत देणाराला दिली ह्मणजे त्यानें ही आपल्या कबज्यांत अगर ताब्यांत असलेले त्या मिळकतीवरच्या हक्कसंबंधाचे सर्व दस्तऐवज विकत घेणाराच्या स्वाधीन केले पाहिजेत.

मात्र, (अ) विकत देणारा जेव्हां अशा दस्तऐवजांत सांगितलेल्या मिळकतीचा कांहीं अंश आपणाकडे ठेवील, तेव्हां, त्याला ते सर्व दस्तऐवज आपणाजवळ ठेवण्याचा अखत्यार आहे ; आणि (ब) ती सगळी मिळकत निरनिराळ्या विकत घेणारांस विकली असेल तेव्हां, त्या मिळकतीचा सगळ्यांत मोठ्या किंमतीचा अंश ज्यानें विकत घेतला असेल त्याला ते सर्व दस्तऐवज आपणाजवळ ठेवण्याचा अखत्यार आहे. परंतु, (अ) ह्या बाबतींत विकत देणारा आणि (ब) ह्या बाबतींत मिळकतीचा सगळ्यांत मोठ्या किमतीचा अंश विकत घेणारा, ह्यांनीं, प्रसंगाप्रमाणें, विकत घेणारा अगर इतर विकत घेणारांपैकीं कोणताही मनुष्य बाजवी रीतीनें मागेल त्या प्रत्येक प्रसंगीं, मागणाराच्या खर्चानें, ते दस्तऐवज हजर करून मागणारा सांगेल त्याप्रमाणें त्यांच्या खऱ्या नकला अगर त्यांचे खरे उतारे दिले पाहिजेत ; आणि दरम्यान, प्रसंगाप्रमाणें, विकत देणारानें किंवा सगळ्यांत मोठ्या किंमतीचा अंश विकत घेणारानें, ते दस्तऐवज सुरक्षित, रद्द न करितां, आणि विरूप न करितां ठेविले पाहिजेत ; मात्र, त्याला जर आगीमुळें अगर दुसऱ्या एकाद्या अनिवार्य अपघातामुळें तसें करितां आलें नाहीं, तर त्या प्रसंगीं सदरील नियम लागू होणार नाहीं.

(४) विकत देणाराला खालीं लिहिलेले हक्क आहेत :—

(अ) त्याला, विकत घेणारास मिळकतीचें स्वामित्व प्राप्त होईपर्यंतचें तिचें भाडें व उत्पन्न हीं मिळालीं पाहिजेत ;

(ब) विक्रीचा सगळा पैसा देण्याच्या आधीं त्या मिळकतीचें स्वामित्व विकत घेणाराच्या हातीं गेलें असेल तेव्हां, विकत देणाराला, विकत घेणाराच्या ताब्यांत असलेल्या मिळकतीवर, त्या विक्रीच्या रकमेचा अगर तिच्या देणें राहिलेल्या अंशाचा आणि अशा रकमेवरील अगर रकमेच्या अंशावरील व्याजाचा बोजा घालण्याचा हक्क आहे.

(५) विकत घेणारानें खालीं लिहिलेल्या गोष्टी केल्या पाहिजेत :—

(अ) त्या मिळकतींत विकत देणाराचा जो हितसंबंध असेल त्या हितसंबंधाच्या स्वरूपासंबंधी अगर इयत्तेसंबंधी ज्या गोष्टीमुळें त्या हितसंबंधाची किंमत विशेष वाढण्यासारखी असेल ती गोष्ट आपल्याला माहीत असून विकत देणाराला माहीत नाहीं असें वाटण्यास विकत घेणारास कारण असेल तर, ती त्यानें विकत देणारास कळविली पाहिजे ;

(ब) विक्री पुरी करण्याचेवेळीं व स्थलीं, विकत देणाराला अगर तो सांगेल त्या मनुष्याला, विक्रीचा पैसा दिला पाहिजे अगर देण्यास हजर केला पाहिजे; मात्र, मिळकत बोजांविरहित विकली जाईल तेव्हां, विकत घेणाराला, विक्रीच्या तारिखेस त्या मिळतीवर असलेल्या सर्व बोजांची रकम विक्रीच्या पैशांतून ठेवून घेण्याचा अखत्यार आहे, आणि त्यानें ह्याप्रमाणें ठेवून घेतलेली रकम, तीवर हक्क असलेल्या मनुष्यांस दिली पाहिजे;

(क) मिळकतीचें स्वामित्व आपल्याला प्राप्त झाल्यावर, मिळकतीचा नाश झाल्यामुळें अगर तिचें नुकसान झाल्यामुळें अगर तिची किंमत उतरल्यामुळें जर तोटा झाला, तर, तो होण्यास विकत देणारा कारणीभूत झालेला नसल्यास, तो आपण सोशिला पाहिजे ;

(ड) मिळकतीचें स्वामित्व आपल्याला प्राप्त झाल्यावर, त्या मिळकतीच्या संबंधानें जे जे सार्वजनिक बोजे व भार्डी देणें होतील ते बोजे व तीं भार्डी, आणि ज्या बोजांसहित मिळकत विकली असेल त्यांबद्दल देणें होतील त्या सर्व मुद्दल रकमा, व नंतरचें त्यांवर निघणारें व्याज, हें सर्व, आपण स्वतः व विकत देणारा ह्यांच्या संबंधानें ह्मटलें ह्मणजे, आपण दिलें पाहिजे.

(६) विकत घेणाराला खालीं लिहिलेले हक्क आहेत :—

(अ) मिळकतीचें स्वामित्व त्याला प्राप्त झालें ह्मणजे, ती मिळकत सुधरल्यापासून अगर तिची किंमत वाढल्यापासून होणारा फायदा आणि त्या मिळकतीचें भाडें व उत्पन्न, हीं मिळण्याचा त्याला हक्क आहे.

(ब) मिळकत स्वाधीन करून घेण्यास त्यानें गैरशिस्तपणें नाकारलें असेल तो प्रसंग खेरीजकरून इतर प्रसंगीं, मिळकत स्वाधीन करून मिळेल ह्या समजुतीवर विक्रीचा जो कांहीं पैसा त्यानें वाजवी रीतीनें दिलेला असेल त्याबद्दल व अशा दिलेल्या रकमेच्या व्याजाबद्दल, विकत देणाराचा त्या मिळकतीमध्यें हितसंबंध असेल तितक्यापुरता, त्या मिळकतीवर, विकत देणारा विरुद्ध व पैसा दिल्याची खबर असणारे जे कोणी त्याच्या वतीनें दावा सांगतील त्या सर्वांच्या विरुद्ध, त्याचा बोजा राहील ; आणि ती मिळकत स्वाधीन करून घेण्याचें वाजवी रीतीनें नाकारलें असेल तेव्हां, याशिवाय आणखी, कांहीं इसार दिलेला असल्यास त्याबद्दल, व करार विशेष रीतीनें पुरा करण्याविषयीं अगर तो रद्द करण्याविषयीं हुकुमनामा मिळण्याकरितां त्यानें केलेल्या दाव्यांत खर्च देववला असल्यास त्या खर्चाबद्दल विकत घेणाराचा त्या मिळकतीवर बोजा राहील.

ह्या कलमाच्या (१) ल्या पारिग्राफाच्या (अ) रकमेंत आणि (५) व्या पारिग्राफाच्या (अ) रकमेंत ज्या गोष्टी सांगितल्या पाहिजेत असा ठराव आहे, त्या गोष्टी सांगण्यास चुकणें ही दगलबाजी समजली जाईल.

५६. कोणत्याही दोन मिळकतींवर सामाईक एक बोजा असून त्यांपैकीं कोणतीही एक मिळकत विकली जाईल तेव्हां, उलट करार नसेल त्या बाबतींत, त्या विकत घेणाराला तो बोजा, विकत देणाराच्या विरुद्ध, त्या दुसऱ्या मिळकतींतून जितका भागवून घेतां येईल तितका भागवून घेण्यास लावण्याचा अख्त्यार आहे. सामाइक बोजा असलेल्या दोन मिळकतींपैकीं एका मिळकतीची विक्री.

## विक्रीच्या वेळीं मिळकतीला बोजांतून मुक्त करणें.

५७. (अ) कोणताही बोजा ( मग तो तात्काळ द्यावयाचा असो अगर नसो ) असलेली स्थावर मिळकत कोर्टाकडून, अगर हुकुमनाम्याच्या बजावणींत, अगर कोर्टाबाहेर विकण्यांत येईल तेव्हां, त्या विक्रीच्या कोणत्याही पक्षकाराकडून अर्ज झाला तर, त्या कोर्टास, योग्य वाटल्यास, बोजांच्यासंबंधानें कोर्टानें काय तजवीज करावी; आणि मिळकत बोजांतून मुक्त केल्यानंतर तिची विक्री.

(१) त्या मिळकतीवर एकाद्या वार्षिक अगर मासिक रकमेचा बोजा घातला असेल त्या बाबतींत अगर त्या मिळकतींतील एकाद्या संपवितां येण्यासारख्या हितसंबंधावर एकाद्या ठोकरकमेचा बोजा घातलेला असेल त्या बाबतींत, तो बोजा वाढूं देणार नाहीं इतकें अगर इतर रीतीनें त्या बोजाचा बंदोबस्त होण्याइतकें व्याज जी रकम हिंदुस्थान सरकारच्या सिक्यूरिटींच्या रूपानें ठेवली असतां उत्पन्न होईल असें कोर्टास वाटेल, ती रकम, आणि

(२) त्या मिळकतीवर एकाद्या ठोक रकमेचा बोजा असेल त्या दुसऱ्या कोणत्याही बाबतींत, तो बोजा व त्यावरचें व्याज ह्यांची फेड होण्यास पुरेशी रकम,

कोर्टांत आणून भरण्यास हुकुम करण्याचा अगर कोर्टांत भरूं देण्याचा, अख्त्यार आहे.

परंतु सदरील दोन बाबतींपैकीं कोणत्याही बाबतींत, जास्त खर्च आणि जास्त व्याज द्यावें लागल्यास आणि सरकारी सिक्यूरिटींची किंमत कमी होऊन तूट येईल ती शिवाय करून दुसरा कांहीं आकस्मिक खर्च द्यावा लागल्यास त्याचा बंदोबस्त होण्यासाठीं जी जादा रकम लागेल असें कोर्टास वाटेल, ती रकमही कोर्टांत भरली पाहिजे; मात्र ही जादा रकम, कोर्टांत मूळ भरावयाच्या रकमेच्या एक दशांशाहून जास्त असणार नाहीं; परंतु, कांहीं विशेष कारणांसाठीं ( हीं कारणें लिहून ठेविलीं पाहिजेत ) त्या जादा रकमेपेक्षां अधिक रकम मागणें कोर्टास योग्य वाटेल तेव्हां ती दिली पाहिजे.

(ब) सदरीं सांगितल्याप्रमाणें कोर्टांत पैसा भरण्यांत आल्यानंतर, कोर्टानें आपल्यास योग्य वाटल्यास, त्या मिळकतीवर ज्याचा बोजा असेल त्याला नोटीस देऊन, किंवा त्याला नोटीस देण्याचें कारण नाहीं असें कोर्टास वाटल्यास ( असें वाटण्याचीं कारणें कोर्टानें लिहून ठेविलीं पाहिजेत ) त्याला नोटीस दिल्याशिवाय, ती मिळकत त्या बोजांतून मुक्त झाली आहे असें ठरवून सांगावें आणि ती विक्री अमलांत आणण्यासाठीं खत करून देण्याबाबदचा अगर नांवीं करून देण्याबाबदचा जो कोणताही हुकुम करणें योग्य असेल, तो करावा, आणि कोर्टांत भरलेला पैसा ठेवून घेऊन, त्याच्या सरकारी सिक्यूरिटी घेण्याबद्दल हुकुम करावा.

(क) कोर्टांत आलेल्या पैक्यांत अगर फंडांत हितसंबंध असलेल्या अगर त्या पैक्यावर अगर फंडावर हक्क असलेल्या मनुष्यांवर नोटीस बजावण्यांत आल्यानंतर, कोर्टानें, तो पैका अगर फंड मिळण्याचा हक्क असलेल्या अगर ते मिळाल्याबद्दल फारखत देण्याचा हक्क असलेल्या मनुष्यांस तो देण्याबद्दल अगर तबदील करून देण्याबद्दल हुकुम करावा, आणि साधारणतः, ती मुदल रकम अगर तिजपासून होणारें उत्पन्न याचा विनियोग कसा करावा अगर तें कसें वांटून द्यावें ह्याबद्दल सांगावें.

(ड) ह्या कलमाबरहुकूम केलेला ठराव, हुकुम अगर आज्ञा, हुकुमनाम्याप्रमाणेंच, अपिलास पात्र राहील.

(इ) ह्या कलमांत "कोर्ट" ह्या शब्दाचा अर्थ (१) अवल दिवाणी हुकुमत सामान्य रीतीनें अगर विशेष रीतीनें चालविणारें हें कोर्ट, (२) मिळकत अगर तिचा कोणताही अंश ज्या डिस्ट्रिक्ट जज्जाच्या हुकुमतीच्या स्थलसीमेंत असेल त्या जज्जाचें कोर्ट, (३) ह्या कलमांत दिलेला अधिकार चालविण्यास स्थानिक सरकारानें वेळोवेळीं सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन ज्या कोणत्याही इतर कोर्टाला लायक ठरविलें असेल तें कोणतेंही इतर कोर्ट, असा समजावा.

---

## बाब ४.

### स्थावर मिळकतीच्या गहाणांबाबद व तिच्यावरील बोजांबाबद.

"गहाण," "गहाण देणारा," "गहाण घेणारा" "गहाणाची रकम" आणि "गहाणखत" ह्या संज्ञांच्या व्याख्या.

५८. (अ) गहाण ह्मणजे, कर्जी दिलेल्या अगर द्यावयाच्या पैशाची अगर विद्यमान किंवा पुढें उत्पन्न होणाऱ्या कर्जाची फेड सुरक्षित करण्याच्या कारणासाठीं अगर ज्या बोलीच्या योगानें पैक्यासंबंधी जबाबदारी उत्पन्न होत असेल ती बोली पुरी करणें सुरक्षित करण्याच्या कारणासाठीं विवक्षित स्थावर मिळकतींतला हितसंबंध तबदील करून देण्याचा व्यवहार होय.

अशा तबदील करून देणाराला गहाण देणारा ह्मणावें आणि ज्याला तो हितसंबंध तबदील करून दिला असेल त्या मनुष्याला गहाण घेणारा ह्मणावें; ज्या मुदल रकमेची व व्याजाची फेड त्या वेळेपुरती याप्रमाणें सुरक्षित केली असेल त्याला गहाणाची रकम ह्मणावें, आणि तो तबदील करून देण्याचा व्यवहार एकाद्या दस्तऐवजाअन्वयें केलेला असल्यास त्या खताला गहाणखत ह्मणावें.

(व) गहाण देणारा जेव्हां, गहाण मिळकतीचा कबजा न देतां गहाणाची रकम फेडण्याबद्दल आपण जातीनें जबाबदार राहून, आपल्या कराराप्रमाणें आपण फेड करण्यास चुकल्यास गहाणदाराला गहाण मिळकत विकण्याचा व त्या विक्रीचें उत्पन्न जरूर असेल तितकें गहाणाची रकम फेडण्याच्या कामीं लावण्याचा हक्क प्राप्त होईल असें स्पष्ट अगर गर्भित रीतीनें कबूल करतो, तेव्हां, त्या गहाणास साधें गहाण ह्मणावें आणि गहाण घेणारास साधें गहाण घेणारा ह्मणावें. साधें गहाण.

(क) गहाण देणारा खालील शर्तींपैकीं कोणत्याही शर्तीवर गहाण मिळकत उघड रीतीनें विकील, ह्मणजे— विक्रीच्या अटीचें गहाण.

गहाणाची रकम अमुक तारखेला न दिल्यास विक्री नक्की व्हावी ह्या शर्तीवर, अगर

तशी फेड केल्यावर विक्रीचा व्यवहार रद्द व्हावा ह्या शर्तीवर, अगर

तशी फेड केली असतां विकत घेणारानें विकत देणाराला ती मिळकत तबदील करून द्यावी ह्या शर्तीवर,

ती मिळकत विकील, तर, त्या व्यवहारास विक्रीच्या अटीचें गहाण ह्मणावें, आणि त्या गहाण घेणारास विक्रीच्या अटीनें गहाण घेणारा ह्मणावें.

(ड) गहाण देणारानें गहाण घेणाराच्या स्वाधीन गहाण मिळकतीचा कबजा करून त्यास जर अधिकार दिला कीं, गहाणाची रकम फिटेपर्यंत त्यानें ती मिळकत कबज्यांत ठेवून तिचें भाडें व उत्पन्न येईल तें, व्याजाऐवजीं ह्मणून अगर गहाणाच्या रकमेची फेड ह्मणून अगर अंशतः व्याजाऐवजीं व अंशतः गहाणाची फेड ह्मणून घेऊन भोगावें, तर त्या व्यवहाराला भोगवट्याचें गहाण ह्मणावें आणि त्या गहाण घेणाराला भोगवट्याचें गहाण घेणारा असें ह्मणावें. भोगवट्याचें गहाण.

(इ) गहाण देणारानें जर गहाणाची रकम अमुक तारखेस परत देईन असें कबूल करून गहाण मिळकत गहाण घेणाराला पूर्णपणें तबदील करून दिली असेल आणि गहाणाच्या रकमेची फेड ठरल्याप्रमाणें केली ह्मणजे गहाण घेणारानें ती मिळकत गहाण देणाराला परत तबदील करून दिली पाहिजे अशी अट त्या व्यवहारांत घातली असेल तर, त्या व्यवहारास इंग्रजी रीतीचें गहाण ह्मणावें. इंग्रजी रीतीचें गहाण.

५९. सुरक्षित करावयाची मुदल रकम शंभर रुपये अगर त्यांहून जास्त असेल तेव्हां, गहाणाचा व्यवहार, गहाण देणाराच्या सहीच्या आणि निदान दोन साक्षीदारांच्या साक्षी घातलेल्या अशा नोंदलेल्या दस्तऐवजावरून मात्र करितां येतो. गहाणाचा व्यवहार खतावरून केव्हां करावा तें.

सुरक्षित करावयाची मुदल रकम शंभर रुपयांहून कमी असेल तेव्हां, गहाणाचा व्यवहार, सदरीं सांगितल्याप्रमाणें सहीसाक्षी असलेल्या खतावरून अगर तो व्यवहार साध्या गहाणाचा नसेल तेव्हां मिळकत कबजांत देऊन, करितां येतो.

कलकत्ता, मद्रास, मुंबई, कराची व रंगून ह्या शहरांमध्यें, स्थावर मिळकतीवर तारण उत्पन्न करण्याच्या इरादानें त्या मिळकतीच्या हक्कसंबंधाचे दस्तऐवज कोणत्याही धनकोच्या अगर त्याच्या मुखत्याराच्या स्वाधीन करून जें गहाणाचे व्यवहार करण्यांत येतील ते ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून बेकायदेशीर आहेत असें समजूं नये.

### गहाण देणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

६०. मुदल रकम देणें होण्याची मुदत टळल्यानंतर कोणत्याही वेळीं, गहाण देणारानें गहाणाची रकम योग्य वेळीं व जागीं दिली ह्मणजे अगर द्यावयास हजर केली ह्मणजे त्याला, (अ) गहाण खत असल्यास तें गहाण घेणारास आपणास देण्यास भाग पाडण्याचा (ब) गहाण मिळकत गहाण घेणाराच्या कबज्यांत असल्यास त्याला तिचा कबजा आपणास सोडवून घेण्याचा गहाण देणाराचा हक्क.

देण्यास भाग पाडण्याचा आणि (क) आपल्या खर्चानें गहाण मिळकत पुनः आपली आपणास अगर आपण सांगूं त्या तिसऱ्या मनुष्याला पुनः तबदील करून देण्यांत यावी, किंवा आपल्या हितसंबंधास न्यूनत्व आणणारा असा गहाण घेणारास तबदील करून दिलेला हक्क नाहींसा झाला आहे असा गहाण घेणाराच्या सहीचा लेख आपणास मिळावा आणि (तें गहाण नोंदलेल्या खतानें केलेलें असेल तेव्हां) तो लेख नोंदविण्यांत यावा असें करण्यास गहाण घेणारास भाग पाडण्याचा हक्क आहे :

मात्र इतकेंच कीं, ह्या कलमांत दिलेला हक्क त्या पक्षकारांच्या कृत्यामुळें किंवा कोर्टाच्या हुकुमामुळें नाहींसा झालेला नसला पाहिजे.

ह्या कलमांत दिलेल्या हक्कास गहाण सोडविण्याचा हक्क ह्मणावें, आणि तो हक्क बजावण्यासाठीं केलेल्या दाव्यास गहाण सोडविण्याचा दावा ह्मणावें.

मुदल रकमेची फेड करण्याची ठरविलेली वेळ टळून दिली तर अगर अशी वेळ ठरविलेली नसेल तर, रकम देण्यापूर्वी किंवा रकम द्यावयास हजर करण्यापूर्वी गहाण घेणाराला वाजवी सूचना मिळण्याचा हक्क आहे अशा मजकुराची अट ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून कायद्याविरुद्ध होणार नाहीं.

गहाण मिळकतीचा कांहीं भाग सोडवून घेणें.

गहाण मिळकतीच्या कांहीं हिशांत मात्र हितसंबंध असलेल्या मनुष्यास, गहाण घेणाराला अगर (गहाण घेणारे एकाहून जास्त असल्यास) गहाण घेणारांला एकाद्या गहाण देणाराचा दरोबस्त हिसा अगर त्याचा भाग प्राप्त झाल्याखेरीज, गहाणावर येणें असलेल्या रकमेचा आपल्या हिशापुरता भाग फेडून तो हिसा सोडविण्याचा हक्क आहे असें ह्या कलमाच्या कोणत्याही ठरावावरून समजूं नये.

निरनिराळ्या वेळीं गहाण ठेविलेल्या दोन मिळकतींपैकीं एक मिळकत सोडविण्याचा हक्क.

६१. कोणतेंही एक गहाण सोडविण्याची ज्या मनुष्यास इच्छा असेल, त्या मनुष्यास, उलट करार नसला तर, त्यानें अगर तो ज्या मनुष्याच्या मार्फत हक्क सांगत असेल त्या मनुष्यानें त्या गहाणांतल्या मिळकतीव्यतिरिक्त जी इतर मिळकत स्वतंत्रपणें गहाण दिली असेल त्या दुसऱ्या गहाणाअन्वयें द्यावयाच्या रकमेपैकीं कोणतीही रकम न देतां तें पहिलें गहाण सोडविण्याचा अखत्यार आहे.

उदाहरण.

ड आणि य ह्या शेतांचा मालक अ हा ड शेत ब ह्याला १००० रुपयांना गहाण देतो. त्यानंतर, ड शेतावर आणखी बोजा घालण्याविषयीं कांहीं एक ठराव न करितां अ हा बला य शेत १००० रुपयांस गहाण देतो. अला, पाहिजे असल्यास, फक्त ड शेतावरील गहाण सोडवून घेण्याबद्दल दावा करण्याचा अखत्यार आहे.

भोगवट्यानें गहाण देणाराची मिळकत पुनः कबजांत घेण्याचा अखत्यार.

६२. भोगवट्याच्या गहाणाच्या बाबतींत—

(अ) मिळकतीचें भाडें व उत्पन्न यांतून गहाणाची रकम भागवून घ्यावी असा गहाण घेणाराला अखत्यार दिला असेल तेव्हां—ती गहाणाची रकम फिटली ह्मणजे,

(ब) असें भाडें व उत्पन्न यांतून मुदल रकमेवरचें व्याज भागवून घेण्याविषयीं गहाण घेणाराला अखत्यार दिला असेल तेव्हां—गहाणाची रकम फेडण्याबद्दल कांहीं मुदत ठरविलेली असल्यास ती संपून गहाण देणारानें गहाण घेणारास मुदल रकम दिली अगर द्यावयास काढिली अगर ती यांत पुढें ठरविल्याप्रमाणें कोर्टांत अमानत ठेविली ह्मणजे,

गहाण देणाराला ती मिळकत पुनः आपल्या कबज्यांत घेण्याचा हक्क आहे असें समजावें.

गहाण मिळकतीस भर पडणें.

६३. गहाण घेणाराचे कवजांत असलेल्या गहाण मिळकतीला, गहाण चालू असतांना कांहीं भर पडली, तर, गहाण देणारानें ती मिळकत सोडविली ह्मणजे त्याला, उलट करार नसल्यास, गहाण घेणारा विरुद्ध ती भर मिळण्याचा अख्त्यार आहे.

मालकी तबदील करून घेत ल्यामुळें प्राप्त केलेली भर.

ती भर पडण्यांत गहाण घेणाराचा पैसा खर्च झाला असेल, आणि मूळ मिळकतीची खराबी न होतां त्या भरीचा स्वतंत्र कबजा ठेवतां येण्यासारखा असेल अगर उपभोग घेतां येण्यासारखा असेल तर, गहाण देणारास ती भर घ्यावयाची असल्यास ती संपादन करण्यास लागलेला खर्च त्यानें गहाण घेणारास दिला पाहिजे. असा स्वतंत्र कबजा अगर उपभोग शक्य नसेल तर, ती भर त्या मिळकतीबरोबर हवालीं केली पाहिजे, आणि त्या मिळकतीचें नाशापासून, जप्तीपासून अगर विक्रीपासून संरक्षण होण्यास ती भर जरूर असेल तर अगर ती भर गहाण देणाराच्या संमतीनें संपादन केलेली असेल तर, तो गहाण देणारा, मुदल रकमेशिवाय आणखी, त्या भरीची योग्य किंमत मुदलाच्या व्याजाच्या दरानें देण्यास पात्र होईल.

शेवटीं सांगितलेल्या बाबतींत, त्या भरीपासून कांहीं उत्पन्न येत असल्यास तें गहाणदेणारास मुजरा दिलें पाहिजे.

तें गहाण भोगवट्याचें गहाण असून ती भर गहाण घेणाराच्या खर्चानें संपादन केलेली असली तर, उलट करार नसल्यास, त्या भरीपासून कांहीं उत्पन्न येत असल्यास त्याची, आणि येणेंप्रमाणें खर्चलेल्या रकमेवर व्याज देणें असल्यास त्याची वजावाट केली पाहिजे.

गहाण दिलेला पट्टा नवीन करून घेण्याबद्दल.

६४. गहाण मिळकत कांहीं वर्षांच्या करारानें दिलेला पट्टा असून गहाण घेणारा जर तो पट्टा आणखी नवीन करून घेईल, तर, उलट करार नसल्यास, गहाण देणारानें गहाण सोडवून घेतलें ह्मणजे त्याला त्या नव्या पट्ट्याचा फायदा मिळाला पाहिजे.

गहाण देणाराचे गर्भित करार.

६५. उलट करार नसेल तेव्हां, गहाण देणारा गहाण घेणाराशीं असा करार करितो ह्मणून समजलें पाहिजे कीं—

(अ) गहाण देणारा गहाण घेणाराला जो हितसंबंध तबदील करून देत आहे, तो हितसबंध चालू आहे, आणि तो तबदील करून देण्यास त्याला अख्त्यार आहे;

(ब) गहाण देणारा त्या मिळकतीवरील आपल्या हक्काचें संरक्षण करील, किंवा त्या मिळकतीचा कबजा गहाण घेणाराकडे असल्यास त्याला त्या हक्काचें संरक्षण करण्यास साहाय्य करील;

(क) गहाण मिळकत गहाण घेणाराच्या कबजांत नसेल तोंपर्यंत, गहाण देणारा त्या मिळकतीच्या संबंधानें निघणारे सर्व सार्वजनिक बोजे आपण देईल;

(ड) गहाण मिळकत कांहीं वर्षांच्या कराराचा पट्टा असेल त्या बाबतींत, तें गहाण सुरू होण्याच्या दिवसापर्यंत त्या पट्ट्याअन्वयें द्यावयाचें भाडें देण्यांत आलें आहे, त्या पट्ट्यांतल्या शर्ती पुऱ्या करण्यांत आल्या आहेत, आणि पट्ट्यानें घेणारानें पाळावयाचे करार पाळण्यांत आले आहेत; आणि, तारण चालू असेल तोंपर्यंत आणि गहाण मिळकत गहाण घेणाराच्या कबजांत नसेल तोंपर्यंत, तो गहाण देणारा, त्या पट्ट्यांत अगर तो पट्टा पुनः करून घेतला तर त्यांत ठरविलेलें भाडें भरील, त्यांत असलेल्या शर्ती पुऱ्या करील, आणि पट्ट्यानें घेणारानें पाळावयाच्या करारांस अनुसरून वागेल, आणि सदरहू भाडें न भरल्याकारणानें अगर शर्ती पुऱ्या न केल्या कारणानें अगर करारांस अनुसरून न वागल्यानें उत्पन्न झालेल्या सर्व मागण्यांपासून गहाण घेणाराला मुक्त करील;

(इ) आणि, तें गहाण त्या मिळकतीवरील दुसरा अगर तदनंतरचा बोजा असेल त्या बाबतींत, तो आधींच्या दरेक बोजावरील वेळोवेळीं देणें होणारें व्याज यावयाचें होईल तसतसें व तेव्हां तेव्हां फेडील आणि अशा आधींच्या बोजासंबंधीं देणें असलेली मुदल रकम योग्यवेळीं देईल.

सदरील (क) रकमेंतील व (ड) रकमेंतील कोणताही ठराव, पुढचें भाडें देण्याच्या संबंधाचा असेल तितक्यापुरता, भोगवट्याच्या गहाणाच्या बाबतींत लागू नाहीं असें समजावें.

ह्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या करारांचा फायदा, गहाण घेणाराच्या गहाण घेणारा ह्या नात्यानें असलेल्या हितसंबंधास जोडलेला राहून त्या हितसंबंधाबरोबर दुसऱ्याकडे जाईल, आणि तो सगळा हितसंबंध अगर त्याचा अंश ज्या ज्या मनुष्यामध्यें वेळोवेळीं निविष्ट होईल, त्या त्या मनुष्याला तो फायदा अमलांत आणण्याचा अख्त्यार प्राप्त होईल.

कबजा असलेल्या गहाण देणारानें मिळकत विघडूं देणें.

६६. गहाण मिळकतीचा कबजा असणारा गहाण देणारा असामी, ती मिळकत विघडूं दिल्याबद्दल गहाण घेणारास जबाबदार होणार नाहीं; परंतु तारण अपुरतें असेल, अगर मिळकतीचा नाश होई असें अगर तिला कायम रीतीनें अपकार होई असें कोणतेंही कृत्य केल्यानें तें तारण अपुरतें होण्यासारखें असेल, तर, तसें कोणतेंही कृत्य त्यानें करूं नये.

खुलासा.—गहाण मिळकतीची किंमत, गहाणावरील त्या त्या वेळीं येणें असलेल्या रकमेहून तिच्या एक तृतीयांशानें अगर गहाण मिळकत इमारती असल्यास एक द्वितीयांशानें जास्त नसेल तर, त्या गहाणाचें तारण ह्या कलमाच्या अर्थाअन्वयें अपुरतें समजावें.

### गहाण घेणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करविण्याचा अगर गहाण मिळकत विकविण्याचा हक्क.

६७ उलट करार नसल्यास, गहाण घेणाराला, गहाणाची रकम येणें झाल्यानंतर आणि गहाण मिळकत सोडवून घेण्याविषयीं हुकुमनामा करण्यांत येण्यापूर्वीं अगर गहाणाची रकम यांत पुढें ठरविल्याप्रमाणें देण्यांत येण्यापूर्वीं अगर अमानत ठेवली जाण्यापूर्वीं, कोणत्याही वेळीं, कोर्टाकडून, गहाण देणारा गहाण सोडविण्याच्या हक्कास पूर्णपणें मुकला असा अगर त्या मिळकतीची विक्री व्हावी असा हुकुम मिळविण्याचा अख्त्यार आहे.

गहाण मिळकत सोडवून घेण्याच्या हक्काला गहाण देणारा पूर्णपणें मुकला असा हुकुम होण्याकरितां केलेल्या दाव्याला गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करविण्याचा दावा ह्मणावें.

ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून,—

(अ) साधें गहाण घेणाराला, साधें गहाण घेणारा ह्या नात्यानें, गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करविण्याबद्दल दावा करण्याचा अधिकार प्राप्त होतो असें, किंवा भोगवट्याचें गहाण घेणाराला, भोगवट्याचें गहाण घेणारा ह्या नात्यानें, गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करविण्याबद्दल किंवा विक्रीबद्दल दावा करण्याचा अधिकार प्राप्त होतो असें, अगर विक्रीच्या अटीनें गहाण घेणाराला, विक्रीच्या अटीनें गहाण घेणारा ह्या नात्यानें, विक्रीचा दावा करण्याचा अधिकार प्राप्त होतो असें, समजूं नये; अगर,

(ब) गहाण घेणाराचा ट्रस्टी अगर कायदेशीर वारस ह्मणून त्याचे हक्क धारण करणाऱ्या आणि मिळकतीची विक्री करविण्यास दावा आणण्याचा अख्त्यार असलेल्या गहाण देणारास, गहाण सोडविण्याचा हक्क

रद्द करविण्याबद्दल दावा आणण्याचा अधिकार प्राप्त होतो असें समजूं नये; अगर,

(क) जी कोणतीही रेल्वे, कालवा, अगर इतर काम चालू ठेवण्यांत लोकांचा फायदा आहे, अशी कोणतीही रेल्वे, कालवा, अगर इतर काम गहाण घेणारास, गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करविण्याबद्दल अगर गहाण मिळकतीची विक्री करविण्याबद्दल दावा आणण्याचा अधिकार प्राप्त होतो असें समजूं नये; अगर

(ड) गहाण घेणारांनीं गहाण देणाराच्या संमतीनें गहाणसंबंधी आपापले हितसंबंध पृथक् पृथक् करून घेतले असतील तो प्रसंग शिवायकरून इतर कोणत्याही प्रसंगीं, गहाणाच्या रकमेच्या फक्त कांहीं अंशांत हितसंबंध असलेल्या मनुष्याला, तेवढ्यापुरत्याच गहाण मिळकतीच्या हिशाच्या संबंधानें दावा आणण्याचा अखत्यार प्राप्त होतो असें समजूं नये.

६८. गहाण घेणाराला गहाणाच्या रकमेबद्दल गहाण देणारावर खालीं दिलेल्या बाबतींत मात्र दावा करण्याचा अख़्त्यार आहे: त्या बाबती येणेंप्रमाणें:— गहाणाच्या रकमेबद्दल दावा आणण्याचा हक्क.

(अ) गहाण देणारानें ती रकम फेडण्याबद्दल आपणास बांधून घेतलें असेल तर;

(ब) गहाण देणाराच्या अन्याय्य कृत्यामुळें अगर कसुरीमुळें अगर तशा कृत्यावरून अगर कसुरीवरून गहाण घेणाराचें सगळें तारण अगर त्याचा कोणताही भाग नाहींसा झाला असेल तर;

(क) गहाण घेणाराला मिळकतीचा कबजा मिळण्याचा हक्क असून गहाण देणारा जर ती मिळकत त्याच्या हवालीं करणार नाहीं, अगर आपणाकडून किंवा दुसऱ्या कोणत्याही मनुष्याकडून उपद्रवरहित असा त्या मिळकतीचा कबजा त्याच्या स्वाधीन करण्याबद्दल बंदोबस्त करणार नाहीं, तर.

गहाण देणारानें अगर गहाण घेणारानें अन्यायाचें कृत्य किंवा कसूर न करितां दुसऱ्या एखाद्या कारणावरून, जर, सगळ्या गहाण मिळकतीचा अगर तिच्या कोणत्याही भागाचा नाश झालेला असेल अगर सासष्टाव्या कलमांत सांगितलें आहे त्या अर्थानें त्या मिळकतीचें तारण अपुरतें झालेलें असेल, तर, गहाण घेणाराला, आपल्या कर्जाबद्दल योग्य वेळाचे आंत दुसरें पुरें तारण देण्यास गहाण देणारास भाग पाडण्याचा आणि गहाण देणारानें तें तारण दिलें नाहीं तर गहाणाचे रकमेबद्दल त्यावर दावा करण्याचा अख़्त्यार आहे.

६९. गहाणाची रकम देण्यांत न आल्यास गहाण मिळकत अगर तिचा कोणताही भाग कोर्टाचे दखलबाजीशिवाय विकण्याविषयीं अगर विकण्यास संमति देण्याविषयीं गहाण घेणाराला अगर त्याच्या वतीच्या कोणत्याही मनुष्याला गहाणखतांत दिलेला अधिकार खालीं निर्दिष्ट केलेल्या बाबतींत कायदेशीर होईल: त्या बाबती येणेंप्रमाणें:— विकण्याचा अधिकार कायदेशीर केव्हां होईल.

(अ) तें गहाण इंग्रजी रीतीचें गहाण असून गहाण देणारा व गहाण घेणारा यांपैकीं कोणीही मनुष्य हिंदु, मुसलमान, अगर बौद्ध, नसेल अगर स्थानिक सरकार ह्या कलमाच्या कारणांसाठीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजुरी आणवून, स्थानिक सरकारी गॅझेटांत निर्दिष्ट करील त्या दुसऱ्या कोणत्याही कोमाचा, पंथाचा, जथ्याचा अगर वर्गाचा मनुष्य नसेल, तेव्हां;

(ब) गहाण घेणारा सेक्रेटरी आफ् स्टेट फार इंडिया इन् कौन्सिल असेल तेव्हां;

(क) गहाण मिळकत अगर तिचा कोणताही भाग, कलकत्ता, मद्रास, मुंबई, कराची अगर रंगून ह्या शहरांत असेल तेव्हां;

परंतु असा कोणताही अधिकार—

(१) मुदल रकमेची फेड करण्याबद्दलची नोटीस गहाण देणारावर अगर अनेक गहाण देणारांपैकीं एका गहाण देणारावर बजावल्याशिवाय व बजावण्यांत येई तोंपर्यंत आणि नोटीस येणेंप्रमाणें बजावण्यांत आल्यानंतर तीन महिनेपर्यंत मुद्दल रकम अगर तिचा कोणताही भाग भरण्यांत कसूर झाल्याशिवाय व होईतोंपर्यंत अगर,

(२) गहाणाअन्वयें येणें झालेलें निदान पांचशें रुपये व्याज थकलें असून तें येणें झाल्यानंतर तीन महिनेपर्यंत न दिलेलें असल्याशिवाय व न दिलेलें राही तोंपर्यंत,

चालवूं नये.

सदर्हू प्रकारचा अधिकार चालविण्यांत येत आहे असें दर्शित करून त्याअन्वयें जेव्हां विक्री करण्यांत आली असेल, तेव्हां, विक्रीचा अधिकार चालविण्याचा योग्य प्रसंग आलेला नव्हता ह्या मुद्यावर, अगर योग्य नोटिस देण्यांत आली नव्हती ह्या मुद्यावर अगर विक्री करण्याचा अधिकार अयोग्य किंवा गैरशिस्त अशा इतर रीतीनें चालविण्यांत आला ह्या मुद्यावर, विकत घेणाराच्या हक्कासंबंधानें दोषारोप करितां यावयाचा नाहीं; परंतु अख्त्यार असल्यावांचून किंवा अयोग्यरीतीनें अगर गैरशिस्त रीतीनें विक्रीचा अधिकार चालविण्यांत आल्यावरून नुकसान झालेल्या मनुष्याला, तो अधिकार चालविणाऱ्या मनुष्याकडून नुकसान भरून घेण्याचा इलाज करितां येईल.

विक्रीपासून उत्पन्न झालेल्या पैशांतून, त्या मिळकतीवर आधींचे कांहीं बोजे असल्यास आणि त्या बोजांव्यतिरिक्त ती मिळकत विकलेली असल्यास ते बोजे देऊन टाकल्यानंतर अगर कोणताही पूर्वीचा बोजा काढून टाकण्यासाठीं कलम ९७ ह्या अन्वयें कोर्टांत रकम भरल्यानंतर गहाण घेणाराच्या हातीं जी रकम येईल, ती त्यानें, उलट करार नसल्यास, जिम्यानें धारण करून, तींतून प्रथमतः त्या विक्रीबद्दल अगर जो कांहीं विक्री करण्याचा प्रयत्न केलेला असेल त्याबद्दल जो खर्च त्याला झालेला असेल तो सगळा दिला पाहिजे आणि नंतर, त्या गहाणाची रकम आणि खर्च आणि इतर रकम देणें असल्यास ती, देऊन टाकिली पाहिजे; आणि येणेंप्रमाणें मिळालेल्या पैशांतून जी रकम शिल्लक राहील, ती, गहाण मिळकतीवर हक्क असलेल्या मनुष्याला अगर त्या मिळकतीच्या विक्रीपासून होणाऱ्या उत्पन्नाबद्दल पावती देण्यास अधिकार असलेल्या मनुष्याला दिली पाहिजे.

जे अधिकार हा आक्ट अमलांत येण्यापूर्वी दिलेले असतील त्यांला ह्या कलमाच्या पूर्वभागांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

इंग्रजी रीतीच्या गहाणानें गहाण दिलेली मिळकत ब्रिटिश हिंदुस्थानांत कोणत्याही ठिकाणीं असली तरी, गहाण देणारा व गहाण घेणारा यांपैकीं कोणीही मनुष्य हिंदु, मुसलमान अगर बौद्ध नसला अगर स्थानिक सरकार ह्या कलमाच्या कारणासाठीं गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांची अगोदर मंजुरी आणवून स्थानिक सरकारी गॅझेटांत निर्दिष्ट करील त्या दुसऱ्या कोणत्याही कोमाचा, पंथाचा, जथ्याचा अगर वर्गाचा मनुष्य नसला म्हणजे, त्या इंग्रजी रीतीच्या गहाणास सन १८६६ चा ट्रस्टींच्या व गहाण घेणारांच्या अधिकाराबाबत आक्ट याच्या ६पासून १९ ह्या चौदा कलमांतले अधिकार व ठराव लागू होतील.

*गहाण मिळकतीस भर पडणें.*

७०. गहाणाच्या तारिखेनंतर गहाण मिळकतीस जर कांहीं भर पडली तर, तारणाच्या कारणांसाठीं, उलट करार नसल्यास, त्या भरीवर त्या गहाण घेणाराचा हक्क राहील.

**उदाहरणें.**

(अ) **अ** हा एका नदीच्या कांठावरचें एक शेत **ब**ला गहाण देतो. मळीनें तें शेत वाढतें. तारणाच्या कारणांसाठीं त्या वाढलेल्या भागावर **ब** ह्याचा हक्क राहील.

(ब) **अ** हा **ब** ह्याला कांहीं इमारतीची जमीन गहाण देतो, आणि नंतर त्या जमिनीवर एक घर बांधितो. तारणाच्या कारणासाठीं, **ब** ह्याचा त्या घरावरही हक्क आहे.

*गहाण दिलेला पट्टा नवीन करून घेणें.*

७१. गहाण मिळकत जर कांहीं वर्षांचा पट्टा असून गहाण देणारानें तो पट्टा नवीन करून घेतला, तर, तारणाच्या कारणांसाठीं, आणि कांहीं उलट करार नसल्यास, त्या नवीन पट्टयावर त्या गहाण घेणाराचा हक्क राहील.

*गहाण घेणाराच्या हातीं कबजा असल्यास त्याचा हक्क.*

७२. गहाण चालू असतांना गहाण घेणारानें गहाण मिळकतीचा कबजा घेतला तर, त्याला,—

(अ) त्या मिळकतीची योग्य व्यवस्था ठेवण्याकरितां आणि त्या मिळकतीचें भाडें व उत्पन्न वसूल करण्याकरितां,

(ब) तिचा नाश, जप्ती अगर विक्री न होऊं देण्याकरितां,

(क) गहाण देणाराच्या त्या मिळकतीवरील हक्क मजबुत करण्याकरितां,

(ड) गहाण देणाराविरुद्ध त्या मिळकतीवरील आपला हक्क शाबीत करण्याकरितां, आणि,

(इ) गहाण मिळकत जर पुनः चालू करतां येण्याजोगता पट्टयाखालील हक्क असेल, तर तो पट्टा नवीन करून घेण्याकरितां,

जरूर असेल तितका पैसा खर्चण्याचा अख्त्यार आहे;

आणि, उलट करार नसेल तेव्हां, त्या गहाण घेणाराला, असा खर्च केलेला पैसा मुदल रकमेंत मिळवून, त्यावर त्या मुदल रकमेवरील व्याजाच्या दरानें किंवा असा व्याजाचा दर ठरलेला नसल्यास दरसाल दरशेंकडा नऊ टक्केप्रमाणें व्याज घेण्याचा अख्त्यार आहे.

ती मिळकत स्वभावतः विमा उतरण्याजोगती असली तर, गहाण घेणाराला, उलट करार नसल्यास, त्या सगळ्या मिळकतीचा अगर तिच्या कोणत्याही भागाचा आगीनें नाश अगर खराबी झाल्यास त्याबद्दल नुकसान भरून मिळण्याकरितां विमा उतरण्याचा व तो तसाच चालू ठेवण्याचा अख्त्यार आहे; आणि अशा कोणत्याही विम्याबद्दल दिलेल्या पैशाचा, त्या गहाण मिळकतीवर, मुदल रकमेशिवाय आणखी, त्या रकमेच्या पूर्वाधिकारानिशीं आणि त्याच रकमेच्या व्याजानिशीं बोजा पडेल असें समजावें. परंतु अशी विम्याची रकम, ह्या बाबतींत गहाण खतामध्यें निर्दिष्ट केलेल्या रकमेहून किंवा तशी रकम खतामध्यें सांगितली नसल्यास, विमा उतरलेली मिळकत अगदीं नाश पावली तर तिला पूर्व स्थितीवर आणण्यास जी रकम लागेल, तिच्या दोन तृतीयांशाहून जास्त असूं नये.

गहाण मिळकतीचा विमा ज्या रकमेपर्यंत उतरण्याबद्दल गहाण घेणारास ह्या कलमांत अधिकार दिलेला आहे, त्या रकमेपर्यंतचा विमा गहाण देणारानें किंवा त्याच्या तर्फेच्या मनुष्यानें त्या मिळकतीवर चालू ठेविलेला असेल त्या बाबतींत गहाण घेणारास त्या मिळकतीचा विमा उतरण्यास अधिकार प्राप्त होतो असें ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून समजूं नये.

महसुलाबद्दल केलेल्या विक्रीच्या उत्पन्नावर बोजा.

७३. गहाण मिळकतीच्या संबंधाचा थकलेला सारा अगर भाडें न दिल्यामुळें ती मिळकत विकण्यांत येईल तेव्हां, त्या विक्रीच्या उत्पन्नांतून तो थकलेला सारा अगर भाडें दिल्यानंतर कांहीं रकम शिलक उरल्यास, तिच्यावर, गहाण घेणाराचा गहाणासंबंधी येणें असलेल्या रकमेबद्दल बोजा राहील; मात्र, गहाण घेणाराच्या हातून कांहीं कसूर झाल्यामुळें ती विक्री करण्यांत आली असली तर त्याचा त्या शिलकेवर बोजा राहाणार नाहीं.

आधींच्या गहाण घेणाराची फेड करण्याचा नंतरच्या गहाण घेणाराचा हक्क.

७४. दुसरा अगर इतर कोणी नंतरचा गहाण घेणारा झाला, आपल्या गहाणाच्या लगत आधींच्या गहाणावर देणें असलेली रकम देण्यास पात्र झाल्यावर केव्हांही, ती रकम, तें लगत आधींचें गहाण घेणाराला देण्यास हजर करण्याचा अख्त्यार आहे आणि त्या लगत आधींच्या गहाण घेणारानें ती रकम घेऊन तिच्या बद्दल पावती दिली पाहिजे; आणि (विद्यमान काळीं अमलांत असलेल्या दस्तऐवज नोंदण्याबाबतच्या कायद्याचे ठराव लागू राहून) अशी पावती त्या नंतरच्या गहाण घेणारास मिळाली ह्मणजे त्याला, त्यानें ज्या गहाण घेणाराला सदहू प्रमाणें पैसा दिला असेल, त्या गहाण घेणाराचे गहाण घेणारा ह्या नात्याचे त्या मिळकतीच्या संबंधाचे सर्व हक्क व अधिकार प्राप्त होतील असें समजावें.

मध्यंतरीच्या गहाण घेणाराचे आधींच्या व नंतरच्या गहाण घेणारांविरुद्ध हक्क.

७५. गहाण सोडवणें, गहाण सोडवून घेण्याचा हक्क रद्द करविणें, आणि गहाण मिळकतीची विक्री करविणें, ह्यासंबंधानें प्रत्येक दुसऱ्या अगर इतर नंतरच्या गहाण घेणाराला, त्याच्या गहाण देणाराला आधींच्या गहाण घेणाराविरुद्ध अगर गहाण घेणारांविरुद्ध जे हक्क असतील, तेच हक्क त्या आधींच्या गहाण घेणाराविरुद्ध अगर गहाण घेणारांविरुद्ध असतील आणि त्याला त्याच्या गहाण देणाराविरुद्ध जे हक्क असतील, तेच हक्क त्यास, नंतरचे कांहीं गहाण घेणारे असल्यास त्यांविरुद्ध असतील.

गहाण घेणाराच्या कबजांत गहाण मिळकत असेल तेव्हां त्याच्या जबाबदाऱ्या.

७६. गहाण चालू असतांना गहाण घेणारा गहाण मिळकत कबजांत घेईल तेव्हां,—

(अ) त्यानें, ती मिळकत एकाद्या साधारण समजूतदार मनुष्याची असती तर त्या मनुष्याकडून तिची जशी वहिवाट झाली असती, तशी तिची वहिवाट केली पाहिजे;

(ब) त्यानें त्या मिळकतीचें भाडें व उत्पन्न वसूल करण्यासाठीं करवेल तितका प्रयत्न केला पाहिजे;

(क) त्यानें, उलट करार नसेल तेव्हां, त्या मिळकतीच्या उत्पन्नांतून, सरकारचा महसूल, ती मिळकत कबजांत असतांना त्या मिळकतीच्या संबंधानें देणें होतील ते सार्वजनिक स्वरूपाचे सर्व इतर बोजे, आणि जी भाड्याची बाकी दिली नाहीं तर ती मिळकत एकदम विकली जाण्याचा संभव असेल ती सगळी भाड्याची बाकी, ह्या सर्व रकमा दिल्या पाहिजेत;

(ड) त्यानें, उलट करार नसल्यास, त्या मिळकतीच्या भाड्यांतून व उत्पन्नांतून रकम (क) ह्यांत निर्दिष्ट केलेला पैसा आणि मुदल रकमेवरील व्याज हीं वजा केल्यानंतर बाकी राहील त्या रकमेच्या खर्चानें करतां येईल ती त्या मिळकतीची जरूर असेल ती दुरुस्ती केली पाहिजे ;

(इ) त्यानें, ज्या कृत्यानें त्या मिळकतीचा नाश होईल अगर तिला कायमची इजा होईल, तें कोणतेंही कृत्य करतां कामा नये;

(फ) आगीपासून नाश अगर खराबी झाल्यास त्याबद्दल नुकसान भरून मिळण्याकरितां त्या मिळकतीचा अगर तिच्या कोणत्याही भागाचा त्यानें विमा उतरला असेल त्या बाबतींत त्यानें, तसा नाश अगर खराबी झाली असतां त्याला त्या विम्याच्या खताअन्वयें जी नक्की रकम

मिळेल, ती सगळी अगर तिचा जरूर लागेल तितका भाग त्या मिळकतीस पूर्वस्थितीस आणण्यासाठीं किंवा गहाण देणारा तसें सांगेल तर गहाणाची रकम कमी करण्यासाठीं अगर पूर्णपणें फेडण्यासाठीं लावला पाहिजे;

(ग) त्यानें, गहाण घेणाराच्या नात्यानें आपणांस पोंचलेल्या व आपण खर्च केलेल्या रकमांचा, चोख, तपशीलवार आणि बिनचूक असा हिशेब ठेविला पाहिजे, आणि गहाण चालू असतांना कोणत्याही वेळीं, गहाण देणारानें मागितल्यास, अशा हिशेबाच्या आणि तो हिशेब शाबीत करणाऱ्या पावत्यांच्या खऱ्या नकला, त्याकडून खर्च घेऊन, त्याला दिल्या पाहिजेत.

(ह) गहाण मिळकतीपासून आला जो पैसा पोंहोंचेल त्यांतून अगर त्या मिळकतीचा तो स्वतः भोगवटा करीत असल्यास तिच्या भोगवट्याबद्दलच्या रास्त भाड्यांतून, रकम (क) व रकम (ड) यांत सांगितलेला खर्च आणि त्यावरचं व्याज वाद केल्यानंतर शिल्लक राहील ती, गहाण रकमेवरचें व्याज वेळोवेळीं आपणास देणें होत असल्यास त्याच्या फेडीकरितां आपल्या नांवीं खर्चीं घातली पाहिजे, आणि देण्यास पात्र असलेल्या व्याजाहून अशा पोंहोंचलेल्या रकमा जास्त होतील तेव्हां अशी जास्त झालेली रकम, गहाणाची रकम उतरण्याकरितां अगर फेडण्याकरितां, आपल्या नांवीं खर्चीं घातली पाहिजे; आणि शिवाय कांहीं रकम शिलक राहिल्यास, ती गहाण देणारास दिली पाहिजे.

(ऐ) गहाण देणारा गहाणाबद्दल विद्यमान काळीं येणें असलेली रकम ह्यावयास हजर करील अगर यांत पुढें सांगितलेल्या रीतीनें अमानत ठेवील तेव्हां, गहाण घेणारानें, ह्या कलमांतील इतर रकमांत कोणतेही ठराव असले तरी, प्रसंगाप्रमाणें, सदर्हूप्रमाणें रकम हजर केल्याच्या तारखेपासून अगर गहाण घेणारास अशी रकम कोर्टांतून अगदीं पहिल्याप्रथम जेव्हां घेतां आली असती त्या तारखेपासून, त्या गहाण मिळकतीपासून जो एकंदर पैसा आपणास पोंचला असेल, त्याचा हिशेब दिला पाहिजे.

ह्या कलमांत सांगितलेल्या गहाण घेणाराच्या कर्तव्यांपैकीं कोणतेंही कर्तव्य गहाण घेणारानें केलें नाहीं तर, त्या कसुरीमुळें कांहीं नुकसान झालें असल्यास त्या नुकसानाची रकम, ह्या वाबीअन्वयें केलेल्या हुकुमनाम्याअन्वयें हिशेब घेतला जाईल तेव्हां त्याच्या नांवीं खर्चीं घालण्याचा अखत्यार आहे. त्याच्या कसुरीमुळें झालेलें नुकसान.

७७. गहाण मिळकतीपांसून पोंचलेलें उत्पन्न, ती मिळकत गहाण घेणाराच्या कबजांत असेल तेथवर, मुदल रकमेवरच्या व्याजाऐवजीं अगर असें व्याज आणि मुदल रकमेचे ठरींव भाग ह्यांऐवजीं घेत जावें असा गहाण देणारा व गहाण घेणारा ह्यांच्या दरम्यान करार असेल त्या प्रसंगीं, कलम शाहात्तर, रकमा (ब), (ड), (ग), आणि (ह) ह्यांतला कोणताही ठराव लागू होणार नाहीं. व्याजाऐवजीं उत्पन्न घेणें.

## पूर्वाधिकार.

७८. आधींच्या गहाण घेणाराच्या कपटामुळें, अगर त्यानें गैर समजाविशी केल्यामुळें, अगर त्याच्या मोठ्या कसुरीमुळें त्या गहाण मिळकतीच्या तारणावर दुसऱ्या मनुष्यानें पैसा दिला तर त्या नंतरच्या गहाण घेणाराच्या हक्काचा अमल होई तोंपर्यंत त्या आधींच्या गहाण घेणाराचा हक्क तहकूब राहील. आधींच्या गहाण घेणारास तहकूब करणें.

अनियमित रकम सुरक्षित करण्यासाठीं, कमाल रकम निर्दिष्ट करून केलेलें गहाण.

७९. पुढें द्यावयाच्या रकमा सुरक्षित करण्यासाठीं, केलेली बोली पुरी करून देण्याचें सुरक्षित करण्यासाठीं, किंवा चालू हिशेबाची बाकी सुरक्षित करण्यासाठीं केलेल्या गहाणामध्यें, त्यायोगें सुरक्षित करावयाची कमाल रकम किती तें सांगितलें असेल तर, अशा आधींच्या गहाणाची खबर असून तीच मिळकत मागाहून गहाण घेण्यांत आल्यास, सदरीं उल्लेख केलेल्या कमाल रकमेहून जास्त नसतील त्या दिलेल्या अगर नांवें खर्ची पडलेल्या सर्व रकमांच्या संबंधानें तें आधींचें गहाण अमलांत आल्यानंतर तें नंतरचें गहाण अमलांत येईल; मग त्या दिलेल्या अगर नांवें खर्ची पडलेल्या रकमा, त्या नंतरच्या गहाणाची खबर असून दिलेल्या अगर मंजुर केलेल्या असल्या तरी हरकत नाहीं.

### उदाहरण.

अ हा, ब व कंपनी ह्या आपल्या सावकारांशीं असलेल्या आपल्या चालू हिशेबाची बाकी १०००० रुपयेपर्यंत सुरक्षित करण्यासाठीं सुलतानपुरगांव त्या कंपनीस गहाण देतो. नंतर, ब व कंपनी ह्यांस दिलेल्या गहाणाची खबर असलेला क ह्याला अ हा तोच गांव १०००० रुपयांची रकम सुरक्षित करण्याकरितां गहाण देतो, आणि क त्या दुसऱ्या गहाणाची खबर ब व कंपनी ह्यांस देतो. दुसऱ्या गहाणाच्यावेळेस ब व कंपनीस देणें राहिलेली बाकी ९००० रुपयांहून जास्त नाहीं. तदनंतर ब व कंपनी हे, अ ह्याला, त्याच्या हिशेबाची त्याकडे निघणारी बाकी १०००० रुपयांपेक्षां जास्त होई इतक्या रकमा देतात. ब व कंपनी ह्यांचा, १०००० रुपयांपर्यंतच्या रकमेवर कच्या आधीं हक्क आहे.

गहाणें जोडण्याचा वहिवाट बंद केला आहे.

८०. मध्यंतरींच्या गहाणाची खबर असून अगर नसतांना जो कोणताही गहाण घेणारा कोणत्याही आधींच्या गहाणाचा पैसा फेडील, त्याला, त्यावरून, त्याच्या मूळच्या तारणाच्या संबंधानें, पूर्वाधिकार हक्क प्राप्त होतो असें समजूं नये. आणि, ७९ व्या कलमांत ज्या बाबतीबद्दल ठराव आहे ती बाबत शिवाय करून इतर प्रसंगीं, जो कोणताही गहाण घेणारा, मध्यंतरींच्या गहाणाची खबर असून अगर नसतांना गहाण देणाराला मूळच्या रकमेशिवाय आणखी रकम देईल, त्याला अशा नंतरच्या रकमेबद्दलच्या तारणासंबंधानें पूर्वाधिकार प्राप्त होतो असें समजूं नये.

### व्यवस्था व हिस्सेरसी.

तारणांची व्यवस्था.

८१. दोन मिळकतींचा मालक त्या दोन्ही मिळकती कोणत्याही एका मनुष्यास गहाण देऊन नंतर त्यांपैकीं एक मिळकत, अशा गहाणाची खबर नसलेल्या दुसऱ्या कोणत्याही मनुष्यास गहाण देईल तर, त्या दुसऱ्या गहाण घेणाराला, उलट करार नसल्यास, पहिल्या गहाण घेणाराचें कर्ज दुसऱ्या गहाण घेणारास गहाण न दिलेल्या मिळकतींतून तिच्या मगदुराप्रमाणें भागवून घेवविण्याचा अख्त्यार आहे; परंतु त्याला पहिल्या गहाण घेणाराच्या हक्कांस अगर त्या दोन मिळकतींपैकीं कोणत्याही मिळकतींत ज्या कोणत्याही इतर मनुष्यानें किमतीमोबदला देऊन हितसंबंध संपादन केलेला असेल त्याच्या हक्कांस बाध येईल अशा रीतीनें तें कर्ज भागवून घेवविण्याचा अख्त्यार नाहीं.

गहाणाच्या कर्जाची हिस्सेरसी.

८२. एका अगर अनेक मालकांच्या अनेक मिळकती कोणतेंही एक कर्ज सुरक्षित करण्यासाठीं गहाण दिलेल्या असतील तर, त्या, उलट करार नसल्यास, प्रत्येक मिळकतीच्या किमतींतून त्या मिळकतीवर गहाणाच्या तारिखेस जो कोणताही दुसरा बोजा असेल तो वजा केल्यानंतर, हिस्सेरसीप्रमाणें तें कर्ज फेडण्यास पात्र होतील.

एकाच मालकाच्या दोन मिळकतींपैकीं कोणतीही एक मिळकत कोणतेंही एक कर्ज सुरक्षित करण्यासाठीं गहाण देण्यांत येईल आणि नंतर त्या दोन्ही मिळकती दुसरें एकादें कर्ज सुरक्षित करण्यासाठीं गहाण देण्यांत येतील, आणि पहिलें कर्ज त्या पहिल्या मिळकतींतून फेडण्यांत येईल, तर, उलट करार नसल्यास, ज्या मिळकतींतून पहिलें कर्ज फेडलें

असेल त्या मिळकतीच्या किमतींतून त्या कर्जाची रकम बाद केल्यानंतर त्या दुसऱ्या कर्जाची फेड त्या प्रत्येक मिळकतींतून हिसेरसीनें झाली पाहिजे.

कलम ८१ ह्याअन्वयें दुसऱ्या गहाण घेणाराच्या मागणीस पात्र असणाऱ्या मिळकतीस ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

**कोर्टांत अमानत ठेवणें.**

८३. मुदल रकम देण्यास पात्र झाल्यानंतर आणि गहाण मिळकत सोडवून घेण्याच्या दाव्याची मुदत टळण्यापूर्वीं, पाहिजे तेव्हां, गहाण देणाराला अगर असा दावा आणण्याचा हक्क असलेल्या दुसऱ्या कोणत्याही मनुष्याला, ज्या कोर्टांत असा दावा करितां आला असता अशा कोणत्याही कोर्टांत, गहाण घेणाराच्या नांवीं, गहाणाबद्दलची जी रकम बाकी राहिली असेल ती अमानत ठेवण्याचा अख़्त्यार आहे.

गहाणाबद्दल देणें असलेला पैसा कोर्टांत अमानत ठेवण्याचा अधिकार.

अशी रकम अमानत ठवण्यांत आल्यानंतर त्या कोर्टानें, पैसा अमानत ठेवण्यांत आल्याबद्दलची लेखी नोटीस गहाण घेणारावर बजावविली पाहिजे, आणि त्या गहाण घेणाराला, त्या वेळेस गहाणाबद्दल किती रकम येणें आहे तें आणि सदर्हूप्रमाणें अमानत ठेविलेला पैसा त्या रकमेच्या पूर्ण भरपाईदाखल स्वीकारण्यास आपण राजी आहों असें ज्यांत लिहिलेलें आहे आणि कायद्याअन्वयें फिर्यादअर्जीवर जसा प्रतिज्ञालेख लागतो तसा प्रतिज्ञालेख ज्यावर आहे असा एक अर्ज रुजू करून, आणि गहाणखत त्या वेळीं आपल्या कबजांत अगर ताब्यांत असल्यास तें त्या कोर्टांत ठेवून, तो पैसा मागण्याचा व घेण्याचा अखत्यार आहे; आणि मग याप्रमाणें ठेविलेलें गहाणखत गहाण देणाराच्या अगर सदरीं सांगितलेल्या इतर मनुष्याच्या स्वाधीन केलें पाहिजे.

गहाण देणारानें ठेविलेला पैसा मिळण्याचा हक्क.

८४. गहाण देणारानें अगर सदरीं सांगितलेल्या इतर मनुष्यानें गहाणाबद्दल देणें राहिलेली रकम द्यावयास हजर केली अगर कलम ८३ ह्या अन्वयें ती कोर्टांत अमानत ठेविली ह्मणजे, प्रसंगाप्रमाणें, अशी रकम द्यावयास हजर केल्याच्या तारखेपासून, अगर गहाण घेणाराला अशी रकम कोर्टाचे बाहेर काढून नेतां येण्यासाठीं जें काय गहाण देणारानें अगर सदरीं सांगितलेल्या इतर मनुष्यानें करणें भाग असेल तें सगळें त्यानें केल्याबरोबर, मुदल रकमेवरचें व्याज बंद होईल.

व्याज बंद होणें.

गहाणाची रकम देण्यापूर्वीं अगर देण्यास हजर करण्यापूर्वीं गहाण घेणाराला वाजवी सूचना मिळण्याचा हक्क आहे असा करार असेल त्या प्रसंगीं, व्याज मिळण्याचा गहाण घेणाराचा हक्क ह्या कलमांतील अगर ८३ व्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून नाहींसा होतो असें समजूं नये.

**गहाण सोडवून घेण्याचा हक्क रद्द करविण्याबद्दल, विक्रीबद्दल अगर गहाण सोडवून घेण्याबद्दल दावे.**

८५. सिव्हिल प्रोसीजर कोड, कलम ४३७, यांतील ठराव लागू राहून, गहाण मिळकतींत हितसंबंध असणारे सर्व असामी, ह्या बाबीअन्वयें करावयाच्या अशा गहाणासंबंधीच्या दाव्यांत, पक्षकार ह्मणून दाखल केले पाहिजेत; मात्र, वादीला अशा हितसंबंधाची खबर असली पाहिजे.

गहाण सोडवून घेण्याचा हक्क रद्द करविण्याबद्दल, विक्रीबद्दल अगर गहाण सोडवून घेण्याबद्दल दाव्यांतील पक्षकार.

**सोडवण्याचा हक्क रद्द करणें आणि विक्री करणें.**

८६. गहाण सोडवण्याचा हक्क रद्द करविण्याविषयींच्या दाव्यांत वादीच्या तर्फे निवाडा झाल्यास, कोर्टानें हुकुमनामा करून त्यांत, यांत लगत खालीं उल्लेख केलेल्या दिवशीं गहाणासंबंधीं मुदल व व्याज यांबद्दल व दाव्याचा खर्च वादीस देवविला असल्यास त्याबद्दल त्याला किती रकम देणें होईल याचा हिशेब

गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करविण्याच्या दाव्यांतील हुकुमनामा.

करावा असें फर्माविलें पाहिजे, किंवा त्या हुकुमनाम्याचे तारिखेस याप्रमाणें निघणारी रकम ठरवून सांगितली पाहिजे;

आणि त्या हुकुमनाम्यांत असें फर्माविलें पाहिजे कीं, सदर्हूप्रमाणें देणें निघालेली रकम कोर्टांत ठरवून सांगितल्या तारिखेपासून साहा महिन्यांच्या आंतली जी तारीख कोर्ट ठरवील त्या तारिखेस ती रकम प्रतिवादीनें वादीला दिली अगर कोर्टांत भरली ह्मणजे, वादीनें, आपल्या कबज्यांत अगर आपल्या अधिकारांत असलेले त्या गहाण मिळकतीच्या संबंधींचे सर्व दस्तऐवज प्रतिवादीच्या अगर प्रतिवादी नेमील त्या मनुष्याच्या स्वाधीन केले पाहिजेत, आणि, ती मिळकत, तिच्यावर वादीनें किंवा वादीच्या संबंधानें दावा सांगणारानें किंवा दुसऱ्यापासून निघालेल्या हक्कावरून वादी दावा सांगत असेल तेव्हां ज्याच्या वतीनें तो दावा सांगत असेल त्या मनुष्यांनीं जे बोजे उत्पन्न केले असतील त्या बोजांविरहित प्रतिवादीला तबदील करून दिली पाहिजे, आणि गहाण मिळकत प्रतिवादीच्या कबजांत देणें जरूर असल्यास ती मिळकत त्याच्या कबजांत दिली पाहिजे; परंतु त्या हुकुमनाम्यांत असें फर्माविलेलें असलें पाहिजे कीं,

कोर्टानें नेमावयाच्या दिवशीं अगर त्याच्या आधीं प्रतिवादीकडून अशी रकम भरण्यांत न आल्यास ती मिळकत सोडवण्याच्या सर्व प्रकारच्या हक्कास प्रतिवादी पूर्णपणें मुकेल.

**देण्यास पात्र झालेली रकम दिल्यावर काय करावें.**

८७. सदर्हू प्रकारची रकम व ९४ व्या कलमांत सांगितलेल्या मागाहून झालेल्या खर्चाची रकम भरण्यांत आली ह्मणजे, ती गहाण मिळकत प्रतिवादीच्या कबजांत देणें जरूर असल्यास, ती मिळकत त्याच्या कबजांत दिली पाहिजे.

**गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करण्याबाबत पक्का हुकुम.**

अशी रकम अशा रीतीनें भरण्यांत आली नाहीं तर गहाण मिळकत सोडविण्याच्या सर्व हक्कांस प्रतिवादी व त्याच्या मार्फत किंवा त्याच्या संबंधानें दावा सांगणारे सर्व मनुष्य पूर्णपणें मुकले आहेत ह्मणून हुकुम करण्याबद्दल कोर्टाला अर्ज करण्यास वादीस अधिकार प्राप्त होईल, आणि असा अर्ज करण्यांत न आला तर कोर्टानें तसा हुकुम केला पाहिजे आणि, गहाण मिळकत वादीच्या कबजांत देणें जरूर असल्यास ती त्याच्या कबजांत देण्यास कोर्टाला अख्त्यार आहे.

**मुदत वाढविण्याचा अधिकार.**

मात्र, चांगलें कारण दाखविण्यांत आलें असतां, कोर्टाला, कांहीं शर्ती घालणें योग्य वाटल्यास त्या घालून, वेळोवेळीं, ती रकम भरण्यासाठीं नेमिलेला दिवस तहकूब करण्याचा अख्त्यार आहे.

ह्या कलमाच्या दुसऱ्या पारिग्राफाअन्वयें हुकुम करण्यांत आला ह्मणजे, त्या गहाणानें सुरक्षित केलेलें कर्ज फिटलें आहे असें समजलें पाहिजे.

सिव्हिल प्रोसीजर कोड, परिशिष्ट ४ थें, नंबर १२९, ह्यांत, "अखेर हुकुमनामा" ह्या शब्दांच्या ऐवजीं "पक्का हुकुमनामा" हे शब्द दाखल करावे.

**विक्रीविषयीं हुकुमनामा.**

८८. विक्री कराविण्याच्या दाव्यांत वादीतर्फे निवाडा झाल्यास, कोर्टानें, ८६ व्या कलमाच्या पहिल्या व दुसऱ्या पारिग्राफांत सांगितलेल्या मतलबाचा हुकुमनामा करून, त्यांत, असा हुकुम केला पाहिजे कीं, प्रतिवादी जर त्या हुकुमनाम्यांत सांगितल्याप्रमाणें रकम भरण्यास चुकेल, तर गहाण मिळकत अगर तिचा पुरेसा भाग विकून विक्रीचा पैसा (त्यांतून विक्रीचा खर्च वाद करून) कोर्टांत भरावा आणि तो सदर्हूप्रमाणें वादीचें येणें निघत असेल त्याच्या फेडीस लावून कांहीं रकम शिल्लक उरल्यास ती प्रतिवादीस अगर ती घेण्याचा हक्क असलेल्या इतर असामीस द्यावी.

**गहाण सोडविण्याचा हक्क रद्द कराविण्याच्या दाव्यांत विक्रीचा हुकुमनामा करण्याचा अधिकार.**

गहाण सोडविण्याचा हक्क रद्द कराविण्याबद्दलच्या दाव्यांत, गहाण विक्रीच्या अटीचें नसून वादीतर्फे निवाडा झाला तर, वादीचे अगर गहाणाच्या रकमेंत किंवा गहाण सोडविण्याच्या हक्कांत हितसंबंध असलेल्या मनुष्याचे सांगण्यावरून, कोर्टाला, योग्य वाटल्यास,

गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करण्याबद्दल हुकुमनामा करण्याच्या ऐवजीं, सदर्हू प्रकारचा हुकुमनामा करून त्यांत, योग्य वाटल्यास, विक्रीचा खर्च भागण्यासाठीं आणि अटी पुऱ्या करणें सुरक्षित करण्यासाठीं कोर्ट ठरवील ती रकम कोर्टांत अमानत ठेवण्याबद्दल हुकुम करण्याचा अखत्यार आहे.

दंणें असलेली रकम प्रतिवादीनें दिली तर काय करावें.

८९. कलम ८८ ह्याखालीं येणाऱ्या कोणत्याही बाबतींत प्रतिवादी जर, गहाणाची येणें असलेली रकम, वादीला कांहीं खर्च देवविण्याचा ठराव झालेला असल्यास तो खर्च, आणि ९४ व्या कलमांत सांगितलेला मागाहून झालेला खर्च, वादीला अगर कोर्टामध्यें सदर्हूप्रमाणें ठरविलेल्या दिवशीं देईल, तर, ती गहाण मिळकत प्रतिवादीच्या कबजांत देणें जरूर असल्यास, ती त्याच्या कबजांत दिली पाहिजे; परंतु अशी रकम याप्रमाणें देण्यांत न आली तर, प्रसंगाप्रमाणें वादीला अगर प्रतिवादीला, त्या गहाण मिळकतीच्या विक्रीबद्दल पक्का हुकुम व्हावा ह्मणून कोर्टाला अर्ज करण्याचा अखत्यार आहे; आणि असा अर्ज करण्यांत आला ह्मणजे, ती मिळकत अगर तिचा पुरेसा भाग विकून त्या विक्रीच्या उत्पन्नाची व्यवस्था ८८ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें करण्याविषयीं कोर्टानें हुकुम केला पाहिजे; मग, गहाण सोडविण्याचा प्रतिवादीचा हक्क आणि त्या गहाणाचें तारण हीं दोन्ही नाहींतशीं होतील.

गहाणासंबंधी येणें असलेली बाकी वसूल करणें.

९०. अशा कोणत्याही विक्रीचें नक्की उत्पन्न विद्यमान काळीं येणें असलेली गहाणासंबंधी रकम फिटण्यापुरें नसेल तेव्हां, बाकीची रकम विकलेल्या मिळकतींतून न घेतां इतर मार्गानें प्रतिवादीकडून कायदेशीरपणें वसूल करण्यासारखी असल्यास, कोर्टाला त्या बाकी रकमेबद्दल हुकुमनामा करण्याचा अखत्यार आहे.

**गहाण सोडवणें.**

गहाण सोडविण्याबद्दल दावा करण्याचा अखत्यार कोणास आहे.

९१. गहाण देणाराशिवाय खालीं निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही मनुष्यांसही, गहाण मिळकत सोडविण्याचा अगर ती सोडविण्याकरितां दावा करण्याचा अखत्यार आहे:—

(अ) सोडवायाचा हितसंबंध ज्यानें गहाण घेतलेला असेल त्या मनुष्याव्यतिरिक्त ज्या कोणत्याही इतर मनुष्याचा त्या मिळकतींत कोणताही हितसंबंध असेल अगर तिच्यावर बोजा असेल तो मनुष्य;

(ब) ती मिळकत सोडविण्याच्या हक्कांत हितसंबंध असलेला अगर त्या हक्कावर बोजा असलेला कोणताही मनुष्य;

(क) गहाणाचें कर्ज अगर त्याचा कोणताही भाग फेडण्याबद्दल जामीन असलेला कोणताही मनुष्य;

(ड) अल्पवयी गहाण देणाराच्या मिळकतीचा पालन करणारा, अशा अल्पवयी मनुष्याच्या तर्फे;

(इ) गहाण देणाऱ्या वेड्या अगर खुळ्या असामीवर नेमिलेली मंडळी अगर इतर कायदेशीर संरक्षक, अशा वेड्याच्या अगर खुळ्याच्या तर्फे;

(फ) गहाण देणाऱ्या असामीच्या फैसल्यांतील धनकोनें त्या मिळकतींतल्या गहाण देणाराच्या हितसंबंधाची जप्तीनें बजावणी केलेली असेल तेव्हां, तो फैसल्यांतील धनको;

(ग) गहाण देणाराच्या ज्या धनकोनें गहाण देणाराच्या मिळकतीची वहिवाट करण्याविषयींच्या दाव्यांत त्या गहाण मिळकतीची विक्री करण्याविषयीं हुकुमनामा मिळविला असेल, तो धनको.

गहाण सोडविण्याच्या दाव्यांत हुकुमनामा.

९२. गहाण सोडविण्याविषयींच्या दाव्यांत वादी तर्फे निवाडा झाल्यास, कोर्टानें हुकुमनामा करून त्यांत,—

गहाणासंबंधीच्या रकमेबद्दल व दाव्याचा खर्च प्रतिवादीला देवविला असल्यास त्याबद्दल त्याला यांत लगत खालीं उल्लेख केलेल्या दिवशीं किती रकम देणें होईल ह्याचा हिशेब करण्याविषयीं हुकुम केला पाहिजे, किंवा त्या हुकुमनाम्याच्या तारिखेस याप्रमाणें किती रकम देणें निघते, तें ठरवून सांगितलें पाहिजे;

देणें निघालेली रकम कोर्टांत ठरवून सांगितल्या तारिखेपासून साहा महिन्यांच्या आंतली जी तारिख कोर्ट ठरवील त्या तारखेस ती रकम वादीनें प्रतिवादीला अगर कोर्टांत दिली ह्मणजे प्रतिवादीनें गहाण मिळकतीसंबंधीं आपल्या जवळ अगर ताब्यांत असलेले सर्व दस्तऐवज वादीच्या अगर वादी नेमील त्या मनुष्याच्या स्वाधीन करण्याबद्दल, आणि गहाण मिळकत, गहाणाविरहित अशी आणि प्रतिवादीनें अगर त्याच्या वतीनें दावा सांगणाऱ्या कोणीं असामीनें किंवा प्रतिवादी दुसऱ्यापासून निघालेल्या हक्कावरून दावा सांगत असेल तेव्हां ज्यांच्या वतीनें तो दावा सांगत असेल त्यांनीं त्या मिळकतीवर जे बोजे घातलेले असतील त्या सर्व बोजांविरहित अशी प्रतिवादीनें वादीला परत तबदील करून देण्याबद्दल, आणि गहाण मिळकत वादीच्या कबजांत देणें ज़रूर असल्यास ती त्याच्या कबजांत देण्याबद्दल, हुकुम केला पाहिजे ; आणि

अशी रकम, कोर्ट नेमील त्या दिवशीं अगर त्यापूर्वीं न भरल्यास, वादी, हा, (गहाण साधें अगर भोगवट्याचें नसल्यास) ती मिळकत सोडविण्याच्या सर्व प्रकारच्या हक्कास निखालस मुकेल असें फर्माविलें पाहिजे अगर, (तें गहाण विक्रीच्या अटीचें नसेल तर) ती मिळकत विकण्याचा हुकुम केला पाहिजे.

गहाण सोडविल्यास, गहाण मिळकत कबजांत दिली पाहिजे.

९३. सदहू रकम व ९४च्या कलमांत सांगितलेला मागाहून झालेला खर्च भरण्यांत आला ह्मणजे, गहाण मिळकत वादीच्या कबज्यांत देणें जरूर असल्यास, ती त्याच्या कबजांत दिली पाहिजे.

गहाण सोडविलें नाहीं तर गहाण सोडविण्याचा हक्क रद्द केला पाहिजे. अगर मिळकतीची विक्री केली पाहिजे.

अशी रकम अशा रीतीनें भरण्यांत न आल्यास, (गहाण साधें अगर भोगवट्याचें नसेल तर,) वादी व त्याच्या मार्फत किंवा त्याच्या संबंधानें, दावा सांगणारे सर्व मनुष्य गहाण सोडविण्याच्या सर्व हक्कांस पूर्णपणें मुकले आहेत ह्मणून हुकुम करण्याबद्दल किंवा (गहाण विक्रीच्या अटीचें नसेल तर) गहाण मिळकत विकावी ह्मणून हुकुम करण्याबद्दल कोर्टाला अर्जी करण्यास प्रतिवादीला अख़्त्यार आहे.

प्रतिवादीनें पहिल्या प्रकारचा हुकुम होण्याबद्दल अर्जी केली तर, कोर्टानें, वादी व त्याच्या मार्फत अगर संबंधानें दावा सांगणारे सर्व असामी तें गहाण सोडविण्याच्या सर्व प्रकारच्या हक्कास पूर्णपणें मुकल्याचा हुकुम केला पाहिजे, आणि त्या कोर्टाला, प्रतिवादीस मिळकतीचा कबजा देणें जरूर असल्यास तो देण्याचा अखत्यार आहे.

प्रतिवादीनें जर दुसऱ्या प्रकारचा हुकुम होण्याबद्दल अर्जी केली, तर कोर्टानें सदहू मिळकत अगर तिचा पुरेसा भाग विकण्याबद्दल आणि विक्रीच्या पैशांतून विक्रीसंबंधी झालेला खर्च वाद करून बाकी राहील तो पैसा, प्रतिवादीची येणें ह्मणून निघालेली रकम फेडण्याकडे लावण्याबद्दल आणि त्यांतून शिलक राहील ती वादीला अगर ती मिळण्याचा हक्क असणाऱ्या इतर असामीला देण्याबद्दल, हुकुम केला पाहिजे.

ह्या कलमाअन्वयें कोणताही हुकुम झाला ह्मणजे, ज्या मिळकतीच्या बाबतींत तो हुकुम केलेला असेल, त्या मिळकतीच्या संबंधानें गहाण सोडवण्याचा वादीचा हक्क व तारण हीं दोन्हीं, नाहींतशीं होतील.

वेळ वाढविण्याचा अधिकार.

मात्र, देणें निघत असलेली रकम भरण्यासाठीं ९२च्या कलमाअन्वयें नेमिलेला दिवस, चांगलें कारण दाखविलें असतां, कोर्टास कांहीं अटी घालण्यास योग्य वाटल्यास त्या अटींवर वेळोवेळीं, तहकूब करण्याचा अख़्त्यार आहे.

९४. ह्या बाबीअन्वयें गहाण सोडवून घेतल्याच्या अगर कोर्टानें विक्री केल्याच्या बाबतींत गहाण घेणाराला द्यावयाची रकम अखेर ठरवितांना, कोर्टानें, गहाण सोडविण्याचा हक्क रद्द करण्याबद्दल, गहाण सोडवून घेण्याबद्दल, अगर विक्रीबद्दल हुकुमनामा झाल्यापासून, रकम प्रत्यक्ष देण्यांत येईपर्यंत गहाण घेणाराला दाव्याचा योग्य रीतीनें आलेला सर्व खर्च, गहाणाच्या रकमेंत मिळविला पाहिजे; मात्र, असा खर्च मिळण्याचा आपला हक्क नाहींसा होईल अशा रीतीनें तो गहाण घेणारा वागला असला तर, त्याला तो खर्च मिळणार नाहीं. गहाण घेणाराचा हुकुमनाम्या-नंतरचा खर्च.

९५. अनेक गहाण देणारांपैकीं कोणताही एक मनुष्य गहाण मिळकत सोडवून तिचा कबजा मिळवील तर, त्याचा, त्या मिळकतीच्या इतर सामाइक गहाण देणारांपैकीं प्रत्येकाच्या हिशावर, सदरीं सांगितल्याप्रमाणें गहाण सोडविण्याच्या कामीं व त्याचा कबजा मिळविण्याच्या कामीं योग्य रीतीनें झालेल्या खर्चांत त्या प्रत्येकाचा जितका भाग निघेल, तितका बोजा राहील. अनेक सामाइक गहाण देणारांपैकीं एकजण सोडवील, तेव्हां त्याचा बोजा.

## आधींच्या गहाणास पात्र असलेल्या मिळकतीची विक्री.

९६. ज्या मिळकतीची विक्री करण्यास ह्या बाबीअन्वयें हुकुम झालेला असेल, त्या मिळकतीवर पूर्वींचें एकादें गहाण असल्यास, कोर्टाला, त्या आधींच्या गहाण घेणाराच्या अनुमतानें, ती मिळकत त्या गहाणाविरहित विकावी असा हुकुम करण्याचा अख्त्यार आहे; मात्र, अशा आधींच्या गहाण घेणाराचा त्या विकलेल्या मिळकतींत जो हितसंबंध असेल, तोच हितसंबंध त्याला त्या विक्रीच्या उत्पन्नांत दिला पाहिजे. आधींच्या गहाणास पात्र असलेल्या मिळकतीची विक्री.

९७. अशा प्रकारच्या विक्रीचें उत्पन्न कोर्टामध्यें ठेवून त्याचा विनियोग खालीं सांगितल्याप्रमाणें केला पाहिजे:— विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग कसा करावा तें.

प्रथमतः त्यांतून, त्या विक्रीच्या संबंधाचा झालेला सगळा खर्च अगर विकण्याचा जो प्रयत्न केलेला असेल त्याबद्दल योग्य रीतीनें झालेला सगळा खर्च भागविला पाहिजे;

नंतर, कोणत्याही आधींच्या गहाणाविरहित ती मिळकत विकली असेल तर अशा गहाणासंबंधानें जें कांहीं देणें निघत असेल त्याची फेड केली पाहिजे;

नंतर, ज्या गहाणावरून विक्रीचा हुकुम झालेला असेल त्या गहाणाचें सगळें व्याज चुकतें करून, ज्या दाव्यांत तो विक्रीविषयींचा हुकुमनामा झालेला असेल त्या दाव्याचा खर्च भागविला पाहिजे;

नंतर, त्या गहाणासंबंधी देणें असलेल्या मुदल रकमेची फेड केली पाहिजे; आणि

शेवटीं, कांहीं शिलक राहिल्यास, ती, विकलेल्या मिळकतींत आपला हितसंबंध आहे असें शाबीत करणाऱ्या असामीस अगर, असे असामी एकाहून जास्त असल्यास, त्यांच्या त्या मिळकतींतील हितसंबंधाच्या प्रमाणानें किंवा त्या सर्वांची मिळून एक पावती घेऊन त्यांस, दिली पाहिजे.

## असाधारण गहाणें.

९८. एकादें गहाण जेव्हां साधें गहाण, विक्रीच्या अटीचें गहाण, भोगवट्याचें गहाण अगर इंग्रजी रीतीचें गहाण नसेल किंवा सदरील पद्धतींपैकीं पहिल्या व तिसऱ्या पद्धतींच्या मिश्र प्रकारचें अगर दुसऱ्या व तिसऱ्या पद्धतींच्या मिश्र प्रकारचें गहाण नसेल, तेव्हां, त्यांतील पक्षकारांच्या हक्कांचा व जबाबदाऱ्यांचा निर्णय, गहाणखतावरून शाबीत होणाऱ्या कराराप्रमाणें, आणि असा करार लागू नसेल त्या गोष्टींत स्थानिक रिवाजाप्रमाणें, करण्यांत आला पाहिजे. ५८ व्या कलमाच्या (ब), (क), (ड) व (इ) रकमांमध्यें सांगितलेलें नाहीं अशा प्रकारचें गहाण.

## गहाण मिळकतीची जप्ती.

९९. जो कोणताही गहाण घेणारा कोणत्याही दाव्याच्या (मग तो दावा गहाणावरून उत्पन्न झालेला असो अगर नसो) भरपाईकरितां मिळविलेल्या हुकुमनाम्याच्या गहाण मिळकतीची जप्ती.

बजावणीमध्यें गहाण मिळकत जप्त करील, त्याला, ६७व्या कलमाअन्वयें दावा आणण्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ती मिळकत विकण्यास काढण्याचा हक्क नाहीं; आणि असा दावा आणणें तो, सिव्हिल प्रोसीजर कोड, कलम ४३, ह्यांत कोणताही ठराव असला तरी, त्याला आणण्याचा अख्त्यार आहे.

बोजे.

बोजे. १००. पक्षकारांच्या कृत्यावरून अगर कायद्यावरून एका मनुष्याची स्थावर मिळकत दुसऱ्या एकाद्या मनुष्याला पैशाच्या फेडीबद्दल तारणादाखल देण्यांत आलेली असून तो व्यवहार गहाणादाखल होत नसेल तेव्हां, त्या दुसऱ्या मनुष्याचा त्या मिळकतीवर बोजा आहे असें ह्मणावें; आणि गहाण देणाराच्या संबंधाचे ह्या आक्टांत पूर्वी आलेले सर्व ठराव, शक्य असतील तेथवर, त्या मिळकतीच्या मालकास लागू होतील; आणि ८१ व ८२ ह्या कलमांतले ठराव, व गहाण घेणारानें गहाण मिळकतीच्या विक्रीसाठीं दावा करण्याच्या संबंधाचे ह्या आक्टांत पूर्वी आलेले सर्व ठराव, शक्य असतील तेथवर, असा बोजा असणाऱ्या मनुष्यास लागू होतील.

कोणत्याही ट्रस्टीनें आपला ट्रस्ट बजावण्यांत योग्य रीतीनें केलेल्या खर्चाबद्दल त्या ट्रस्ट मिळकतीवर जो त्याचा बोजा उत्पन्न होतो त्याला ह्या कलमांतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं.

बोजे नाहींसे होणें. १०१. स्थावर मिळकतीवरील कोणत्याही बोजाचा अगर इतर देण्याचा मालक त्या मिळकतीचा पूर्ण हक्कदार असेल अगर होईल तर, तो बोजा अगर तें देणें चालू ठेवण्याबद्दल तो स्पष्टपणें अगर अवश्य गर्भितार्थानें दर्शित करील तो प्रसंग खेरीजकरून इतर प्रसंगीं, अगर तो बोजा किंवा तें देणें चालू ठेवणें त्याला हितावह असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, तो बोजा अगर तें इतर देणें नाहींसें होईल असें समजावें.

नोटीस देणें व पैसा हजर करणें.

नोटीस मुखत्यारावर बजावणें किंवा पैसा मुखत्यारास द्यावयास हजर करणें. १०२. ह्या बाबीअन्वयें ज्या मनुष्यावर एकादी नोटीस बजवायाची असेल अगर ज्या मनुष्याकडे पैसा हजर करावयाचा असेल, तो मनुष्य, गहाण मिळकत अगर तिचा कोणताही भाग ज्या जिल्ह्यांत असेल त्या जिल्ह्यांत राहात नसेल तर, अशा मनुष्याकडून साधारण मुखत्यारनामा धारण करणाऱ्या अगर अशा प्रकारच्या नोटिशीची बजावणी किंवा अशा प्रकारची हजर केलेली रकम स्वीकारण्याबद्दल इतर रीतीनें यथायोग्यपणें अधिकार दिलेल्या मुखत्यारावर ती नोटीस बजावली असतां अगर त्याकडे ती रकम हजर केली असतां बस होईल असें समजावें.

ज्या मनुष्यावर अगर मुखत्यारावर अशी नोटीस बजवायाची असेल तो मनुष्य अगर मुखत्यार सदरीं सांगितलेल्या जिल्ह्यांत सांपडत नसेल अगर ती नोटीस बजावण्यास हुकुम केलेल्या इसमाला माहीत नसेल, तर, ती गहाण मिळकत सोडविण्याबद्दल ज्या कोर्टांत दावा आणतां येईल अशा कोर्टाला अर्ज करण्यास तो नोटीस बजावणारा इसम मुखत्यार आहे; आणि अशी अर्जी करण्यांत आली ह्मणजे, ती नोटीस कशी बजाविली पाहिजे त्याबद्दल तें कोर्ट फर्मावील आणि कोणतीही नोटीस अशा हुकुमाप्रमाणें बजावण्यांत आली ह्मणजे बस होईल असें समजावें.

ज्या मनुष्याकडे अगर मुखत्याराकडे सदहूप्रमाणें रकम हजर करावयाची असेल, तो मनुष्य अगर मुखत्यार सदरीं सांगितलेल्या जिल्ह्यांत सांपडत नसेल, अगर ती रकम हजर करण्यास इच्छिणाऱ्या मनुष्याला माहीत नसेल, तर, त्या पैसा हजर करण्यास इच्छिणाऱ्या मनुष्याला ती हजर करावयाची रकम सदरीं शेवटीं सांगितलेल्या कोर्टामध्यें अमानत ठेवण्याचा अख्त्यार आहे, आणि ती रकम ह्याप्रमाणें अमानत ठेविली ह्मणजे, त्या व्यवहाराचा, ती रकम हजर केल्याप्रमाणें अमल होईल.

करार करण्याविषयीं नालायक असणाऱ्या मनुष्याला अगर मनुष्याकडून नोटीस वगैरे.

१०३. ह्या बाबीच्या ठरावांअन्वयें ज्या मनुष्यावर अगर मनुष्यानें नोटीस बजवायाची तो, किंवा ज्या मनुष्यानें रकम हजर करावयाची अगर कोर्टांत अमानत ठेवावयाची अगर अशी हजर केलेली अगर अमानत ठेविलेली रकम स्वीकारावयाची अगर कोर्टांतून काढून न्यावयाची तो, करार करण्यास नालायक असेल तेव्हां, अशा मनुष्याच्या मिळकतीच्या कायदेशीर संरक्षकाला, ती नोटीस बजावण्याचा, किंवा तशी रकम द्यावयास हजर करण्याचा अगर कोर्टांत अमानत ठेवण्याचा अगर तशी हजर केलेली रकम अगर कोर्टांत अमानत ठेविलेली रकम स्वीकारण्याचा अगर कोर्टांतून नेण्याचा अख़्त्यार आहे; परंतु अशा प्रकारचा संरक्षक नसेल आणि त्या मनुष्याच्या हितासाठीं ह्या बाबीच्या ठरावांस अनुसरून नोटीस बजावणें अगर रकम द्यावयास हजर करणें अगर रकम अमानत ठेवणें जरूरीचें अगर इष्ट असेल तेव्हां, ती गहाण मिळकत सोडविण्याचा दावा ज्या कोर्टांत आणितां येईल त्या कोर्टाकडे, अशी नोटीस बजावण्याच्या अगर स्वीकारण्याच्या कारणासाठीं अगर याप्रमाणें रकम हजर करण्याच्या अगर हजर केलेली रकम स्वीकारण्याच्या कारणासाठीं, अगर अशी रकम अमानत ठेवण्याच्या अगर अमानत ठेविलेली रकम कोर्टांतून नेण्याच्या कारणासाठीं आणि तो मनुष्य करार करण्यास लायक असता तर तो जीं सदरील व्यवहारांपासून उत्पन्न होणारीं जीं कृत्यें करूं शकला असतां अगर त्यानें केलीं पाहिजे होतीं, तीं करण्यासाठीं, दाव्याच्या संबंधानें एक पालन करणारा नेमावा ह्मणून अर्ज करण्याचा अख़्त्यार आहे, आणि अशा अर्जाला, व त्यांतील पक्षकारांला, व त्यावरून नेमिलेल्या पालन करणाराला. सिव्हिल प्रोसीजर कोडच्या ३१ व्या बाबींतील ठराव, संभवतील तेथवर, लागू होतील.

कानू करण्याचा अधिकार.

१०४. ह्या बाबींतील ठराव हाय कोर्टांत आणि हाय कोर्टाच्या देखरेखीखालीं असलेल्या दिवाणी न्यायाच्या कोर्टांत अमलांत आणण्यासाठीं ह्या आक्टास अनुसरून वेळोवेळीं कानू करण्याचा हाय कोर्टास अधिकार आहे.

---

## बाब ५.

### स्थावर मिळकतीच्या पट्ट्यांविषयीं.

पट्ट्याची व्याख्या.

१०५. स्पष्ट अगर गर्भित रीतीनें निर्दिष्ट केलेल्या मुदतीपर्यंत अगर निरंतरपर्यंत स्थावर मिळकत भोगण्याचा हक्क ज्या व्यवहाराअन्वयें तबदील करून देण्यांत येतो, त्या व्यवहाराला त्या स्थावर मिळकतीचा पट्टा ह्मणावें. ह्या व्यवहारांत त्या हक्काच्या मोबदला कांहीं किंमत दिलेली अगर कबूल केलेली असते, किंवा तो हक्क ज्याला तबदील करून दिलेला असेल आणि ज्यानें सदई व्यवहार ह्या कलमांतील शर्तींवर कबूल केला असेल त्यानें तो हक्क तबदील करून देणारास मुदती मुदतीनें अगर विवक्षित वेळीं त्या हक्काच्या मोबदला कांहीं पैसा द्यावा, किंवा पिकांचा भाग द्यावा, किंवा त्याची कांहीं नोकरी करावी किंवा दुसरी कोणतीही किंमती वस्तु त्याला द्यावी, असा करार असतो.

पट्ट्यानें देणारा, पट्ट्यानें घेणारा, उक्ती रकम, आणि भाडें ह्यांच्या व्याख्या.

सदरींप्रमाणें तबदील करून देणारास पट्ट्यानें देणारा ह्मणावें, ज्याला तो हक्क तबदील करून दिला आहे त्याला पट्ट्यानें घेणारा ह्मणावें, दिलेल्या किंवा द्यावयाच्या किंमतीस उक्ती रकम ह्मणावें, आणि सदरींप्रमाणें मुदती मुदतीनें अगर विवक्षितकाळीं द्यावयाच्या पैशास, पिकाच्या भागास, करावयाच्या नोकरीस अगर द्यावयाच्या इतर कोणत्याही वस्तूस भाडें ह्मणावें.

लेखी करार अगर स्थानिक रिवाज ह्यांच्या अभावीं विवक्षित पट्टे कितीवेळ चालतील.

१०६. कांहीं करार अगर स्थानिक कायदा अगर रिवाज उलट नसेल तेव्हां, शेतकीच्या अगर कारखान्यांच्या कामाकरितां स्थावर मिळकतीचा पट्टा ह्मटला ह्मणजे, तो वर्षावर्षाचा पट्टा आहे असें समजावें आणि पट्ट्यानें देणारा आणि पट्ट्यानें घेणारा यांतून एकाकडून, पट्ट्याच्या कोणत्याही वर्षाअखेर संपणारी साहा महिन्यांची नोटीस

मिळाली ह्मणजे त्या वर्षाच्या अखेर तो पट्टा संपेल; आणि इतर कोणत्याही कामाकरितां स्थावरमिळकतीचा पट्टा झटला ह्मणजे, तो महिन्यामहिन्याचा पट्टा आहे असें समजावें, आणि पट्टयानें देणारा व पट्टयानें घेणारा ह्यांपैकीं एकाकडून पट्टयाच्या महिनाअखेर संपणारी पंधरा दिवसांची नोटीस मिळाली ह्मणजे तो पट्टा संपेल.

ह्या कलमाखालीं द्यावयाची प्रत्येक नोटीस लेखी असून, तीवर ती देणाराची अगर त्याच्या वतीच्या मनुष्याची सही असली पाहिजे, आणि ती, तिचा अम्मल ज्या मनुष्यावर व्हावा असा इरादा असेल, त्याला अगर त्याच्या राहात्या घरांतील त्याच्या कुटुंबापैकीं अगर नोकरांपैकीं कोणालाही द्यावयास हजर केली पाहिजे किंवा दिली पाहिजे, किंवा सदरीं प्रमाणें द्यावयास हजर करणें अगर देणें अशक्य असेल तेव्हां, ती त्या मिळकतीवर सर्वांच्या दृष्टीस पडेल अशा जागीं लाविली पाहिजे.

पट्टा कसा करावा ते.

१०७. वर्षावर्षाचा अगर एका वर्षाहून कोणत्याही जास्त मुदतीपर्यंत चालावयाचा अगर ज्यांत वार्षिक भाडें ठरविलें आहे असा स्थावर मिळकतीचा पट्टा नोंदलेल्या खतानें मात्र करितां येतो.

स्थावर मिळकतीचे इतर सर्व पट्टे खतानें अगर तोंडच्या करारानें करण्याचा अख्त्यार आहे.

पट्टयानें देणारा व पट्टयानें घेणारा ह्यांचे हक्क व जबाबदाऱ्या.

१०८. कोणताही करार अगर कोणताही स्थानिक रिवाज उलट नसेल तेव्हां, स्थावर मिळकत पट्टयानें देणारा व ती पट्टयानें घेणारा, ह्यांस, अनुक्रमें, परस्परांच्या संबंधानें, खालील कानूंतले सर्व अगर त्यांपैकीं त्या पट्टयानें दिलेल्या मिळकतीस लागू असतील तितके हक्क व जबाबदाऱ्या प्राप्त होतील:—

### अ.— पट्टयानें देणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

(अ) त्या मिळकतीचा जो उपयोग करावयाचा असेल त्या उपयोगास नडेल अशी त्या मिळकतींतील जी कोणतीही महत्वाची उणीव पट्टयानें देणारास माहीत असेल परंतु पट्टयानें घेणारास माहीत नसून त्याला साधारण काळजीनें समजण्यासारखी नसेल, ती त्या पट्टयानें देणारानें त्या पट्टयानें घेणारास कळविली पाहिजे;

(ब) पट्टयानें घेणारानें सांगितलें ह्मणजे त्याला पट्टयानें देणारानें त्या मिळकतीचा कबजा दिला पाहिजे;

(क) पट्टयांत ठरविलेलें भाडें पट्टयानें घेणारानें दिलें ह्मणजे व त्यास लागू असलेले करार त्यानें पुरे केले ह्मणजे, पट्टयांत सांगितलेल्या मुदतीपर्यंत त्यानें ती मिळकत बिनहरकत धारण करावी, असा करार त्या पट्टयानें देणारानें त्या पट्टयानें घेणाराशीं केला आहे असें समजलें पाहिजे.

अशा कराराचा फायदा, त्या पट्टयानें घेणाराच्या त्या नात्याच्या हितसंबंधास जोडला जाऊन त्याबरोबर दुसरीकडे जाईल; आणि तो हितसंबंध अगर त्याचा कोणताही भाग वेळोवेळीं ज्या कोणत्याही मनुष्यामध्यें निविष्ट होईल त्या मनुष्याला तो फायदा आपणास मिळे असा अमल करण्याचा अख्त्यार आहे.

### ब.—पट्टयानें घेणाराचे हक्क व जबाबदाऱ्या.

(ड) पट्टा चालू असतांना त्या मिळकतीस जर कोणतीही भर पडली, तर, मळईच्या संबंधाचा त्या वेळीं अमलांत असलेला कायदा लागू राहून, त्या भरीचा त्या पट्टयांत समावेश झालेला आहे असें समजलें पाहिजे;

(इ) आगीमुळें, वादळामुळें अगर पुरामुळें किंवा एकाद्या सैन्यानें अगर लोकांच्या अव्यवस्थित जमावानें दंगा केल्यावरून किंवा दुसऱ्या कोणत्याही अनिवार्य शक्तीमुळें त्या मिळकतीचा कोणताही महत्वाचा भाग अगदीं नाश पावेल अगर ती मिळकत ज्या कारणासाठीं दिलेली होती त्या कारणासाठीं तत्त्वतः व निरंतर निरूपयोगी होईल तर, पट्टयानें घेणाराच्या मर्जीस आल्यास तो पट्टा निरूपयोगी समजण्यांत येईल;

मात्र, सदरील नुकसान जर पट्टयानें घेणाराच्या अन्यायाच्या कृत्यामुळें अगर कसुरीमुळें घडून आलें, तर, त्याला सदरील ठरावाचा फायदा मिळण्याचा हक्क राहणार नाहीं:

(फ) पट्टयानें देणाराला त्या मिळकतीची जी डागडुजी करणें भाग आहे ती डागडुजी त्यानें नोटीस मिळाल्यानंतर वाजवी वेळाच्या आंत करण्याची हयगय केली तर, पट्टयानें घेणाराला ती डागडुजी स्वतः करून तिचा सव्याज खर्च भाड्यांतून कापून घेण्याचा अगर पट्टयानें देणाराकडून इतर रीतीनें वसूल करण्याचा अख्त्यार आहे;

(ग) पट्टयानें देणारानें जी रकम भरली पाहिजे व जी त्यानें न भरल्यास पट्टयानें घेणाराकडून अगर पट्टयानें दिलेल्या मिळकतींतून वसूल केली जाण्यास पात्र असेल, ती रकम त्या पट्टयानें देणारानें भरली नाहीं तर, पट्टयानें घेणाराला, ती रकम स्वतः भरून ती, सव्याज, भाड्यांतून कापून घेण्याचा अगर पट्टयानें देणाराकडून इतर रीतीनें वसूल करण्याचा अख्त्यार आहे;

(ह) पट्टयानें घेणाराला, पट्टा चालू असे तोंपर्यंत कोणत्याही वेळीं, आपण जमिनीस लाविलेल्या सर्व वस्तु काढून नेण्याचा अख्त्यार आहे; मात्र त्याच्या हातीं ती मिळकत ज्या स्थितींत आली, त्याच स्थितींत त्यानें ती परत दिली पाहिजे;

(ऐ) अनिश्चित मुदतीचा पट्टा, पट्टयानें घेणाराची चुकी शिवाय करून इतर कारणानें संपेल तेव्हां, पट्टयानें दिलेल्या मिळकतींत पट्टयानें घेणारानें लावलेल्या अगर पेरलेल्या आणि पट्टा संपण्याच्या वेळीं वाढत असलेल्या सर्व पिकांवर पट्टयानें घेणाराचा अगर त्याच्या कायदेशीर वारसाचा हक्क राहील, आणि तीं कापून नेण्याकरितां त्या मिळकतींतून जाण्यायेण्याचाही हक्क त्याला राहील;

(ज) पट्टयानें घेणाराला, पट्टयानें घेतलेल्या मिळकतींतील आपला सगळा हितसंबंध अगर त्याचा कोणताही अंश पूर्णपणें अगर गहाणानें अगर पोट-गहाणानें तवदील करून देण्याचा अख्त्यार आहे; आणि असा हितसंबंध ज्याला तवदील करून दिलेला असेल त्यालाही तो तिसऱ्यास तवदील करुन देण्याचा अख्त्यार आहे, परंतु, पट्टयानें घेणारानें सदरींप्रमाणें हितसंबंध तवदील करून दिल्यावरून तो त्या पट्टयासंबंधी जवाबदाऱ्यांतून मुक्त होतो असें समजूं नयेः

तवदील करून देतां येत नाहीं असा भोगवट्याचा हक्क असणारें कूळ, जिच्या संबंधानें महसूल देण्याची कसूर झालेली आहे अशा कोणत्याही एस्टेटीचा मक्तेदार, अगर कोर्ट आफ् वार्डस्च्या व्यवस्थेखालीं असलेली एस्टेट पट्टयानें घेणारा, यांतून कोणालाही, आपापल्या नात्यानें आपआपला हितसंबंध दुसऱ्याला लावून देण्याचा अख्त्यार मिळतो, असें ह्या रकमेंतील कोणत्याही ठरावावरून समजूं नये.

(के) जो कोणताही मनुष्य कोणताही हितसंबंध पट्ट्यानें घेण्याच्या विचारांत असेल त्याला, तो हितसंबंध कोणत्या प्रकारचा आहे व किती आहे ह्याबद्दल पट्ट्यानें देणारास माहीत नसलेली व जिच्या योगानें त्या मिळकतीचें मोल तत्वतः वाढण्यासारखें आहे अशी जी कोणतीही गोष्ट माहीत असेल, ती गोष्ट त्यानें पट्ट्यानें देणारास कळविली पाहिजे;

(ळ) पट्ट्यानें घेणारानें पट्ट्यानें देणाराला अगर त्यानें ह्या बाबतींत नेमिलेल्या मुखत्याराला ठरलेली उक्ती रकम अगर ठरलेलें भाडें योग्य वेळीं व योग्य स्थळीं दिलें पाहिजे अगर द्यावयास हजर केलें पाहिजे;

(म) पट्ट्यानें घेणारानें, ती मिळकत, तिचा कबजा आपणास मिळतेवेळीं ती ज्या स्थितींत होती तशाच स्थितींत, (वाजवी तोडमोडीमुळें अगर कांहीं अनिवार्य शक्तीमुळें तींत जो कांहीं फेरफार झालेला असेल तेवढा सोडून देऊन) राखिली पाहिजे, आणि पट्ट्याची मुदत संपली ह्मणजे ती तशाच स्थितींत परत दिली पाहिजे, आणि पट्ट्याची मुदत चालू असे तोंपर्यंत पट्ट्यानें देणाराला व त्याच्या मुखत्यारांला त्या मिळकतींत कोणत्याही वाजवी वेळीं येऊं दिलें पाहिजे, तिची स्थिति तपासूं दिली पाहिजे, आणि त्या स्थितींत कांहीं उणीव असल्याची नोटीस देऊं दिली अगर ठेवूं दिली पाहिजे; आणि अशी उणीव जेव्हां पट्ट्यानें घेणाराच्या, त्याच्या नोकरांच्या, अगर त्याच्या मुखत्यारांच्या कृत्यामुळें अगर कसुरीमुळें उत्पन्न झालेली असेल तेव्हां, त्या पट्ट्यानें घेणारानें, ती उणीव, सदर्हू प्रकारची नोटीस दिल्याच्या अगर ठेवून गेल्याच्या तारिखेपासून तीन महिन्यांच्या आंत काढून टाकिली पाहिजे;

(न) पट्ट्यानें दिलेली मिळकत अगर तिचा कोणताही हिसा परत घेण्याबद्दल काम चालल्याची अगर अशा मिळकतींतल्या पट्ट्यानें देणाराच्या हक्कांचें अतिक्रमण करण्यांत आल्याची अगर तशा हक्कांस प्रतिबंध करण्यांत आल्याची माहिती पट्ट्यानें घेणारास लागल्यास त्यानें त्याबद्दल पट्ट्यानें देणाराला वाजवी तत्परतेनें खबर दिली पाहिजे;

(ओ) ती मिळकत व तिचें कांहीं उत्पन्न येत असल्यास तें, हीं जर एकाद्या साधारण विचारी मनुष्याचीं असतीं तर त्यानें त्यांचा जसा उपयोग केला असता तसा त्यांचा उपयोग करण्याचा पट्ट्यानें घेणाराला अख्त्यार आहे; परंतु, ज्या कारणाकरितां ती मिळकत पट्ट्यानें दिलेली असेल, त्या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणाकरितां तिचा उपयोग त्यानें करितां कामा नये अगर दुसऱ्यास करूं देतां कामा नये किंवा त्यानें सुतारकामी लांकडें तोडतां कामा नये, घरें पाडतां अगर त्यांची कांहीं नुकसानी करितां कामा नये, पट्टा देण्याचे वेळीं चालू नसलेल्या धातूच्या अगर दगडाच्या खाणी पाडून चालवितां कामा नये अगर ज्या कोणत्याही इतर कृत्यापासून त्या मिळकतीचा नाश होण्यासारखा असेल अगर तिची कायमची नुकसानी होण्याचा संभव असेल, तें कोणतेंही कृत्य करतां कामा नये;

(प) त्यानें, पट्टा देणाराच्या संमतीशिवाय, शेतकीचें कारण खेरीजकरून इतर कोणत्याही कारणासाठीं त्या मिळकतीवर कोणताही कायमचा इमला बांधूं नये;

(क) त्यानें, पट्टयाची मुदत संपली ह्मणजे ती मिळकत पट्टयानें देणाराच्या स्वाधीन केली पाहिजे.

पट्टयानें देणारा मिळकत ज्याला तबदील करून देईल त्याचे हक्क.

१०९. पट्टयानें देणारा जर, पट्टयानें दिलेली मिळकत अगर तिचा कोणताही भाग अगर त्या मिळकतींतल्या आपल्या हितसंबंधाचा कोणताही अंश तबदील करून देईल, तर, उलट करार नसल्यास, ज्याला ती मिळकत अगर तो हितसंबंध तबदील करून दिलेला असेल त्याला त्या तबदील करून दिलेल्या मिळकतीच्या अगर तिच्या त्या अंशाच्या संबंधाचे सर्व हक्क, व पट्टयानें घेणारा पत्करील तर त्या संबंधाच्या पट्टयानें देणाराच्या सर्व जबाबदाऱ्या, तो त्या मिळकतीचा अगर तिच्या त्या अंशाचा मालक असे तोंपर्यंत, प्राप्त होतील; परंतु ती मिळकत अगर तो हितसंबंध तबदील करून दिलेला आहे एवढ्याचवरून, पट्टयानें देणारा हा, ज्याला ती मिळकत अगर तिचा अंश तबदील करून दिलेला असेल तो आपणास जबाबदार आहे असें पट्टयानें घेणारानें पत्करिल्याखेरीज, आपणावर पट्टयाअन्वयें असलेल्या जबाबदाऱ्यांतून मुक्त होणार नाहीं:

मात्र, अशी मिळकत अगर हितसंबंध ज्याला तबदील करून दिलेला असेल त्याचा त्या तबदील करून देण्याच्या व्यवहारापूर्वींच्या देणें झालेल्या भाड्यावर हक्क असणार नाहीं, आणि असा तबदील करून देण्याचा व्यवहार झाला आहे असें वाटण्यास कारण नसून पट्टयानें घेणारा त्या पट्टयानें देणाराला भाडें देईल तर, तें भाडें त्या पट्टयानें घेणाराला त्या तबदील करून घेणाऱ्या मनुष्यास आणखी द्यावें लागणार नाहीं.

पट्टयांत ठरविलेल्या उक्त्या रकमेचा अगर भाड्याचा किती अंश सदहूप्रमाणें तबदील करून दिलेल्या मिळकतीच्या अंशाबद्दल द्यावयाचा ह्याबद्दल, पट्टयानें देणारा मनुष्य, ती मिळकत अगर हितसंबंध तबदील करून घेणारा मनुष्य आणि पट्टयानें घेणारा मनुष्य ह्यांस निर्णय करण्याचा अखत्यार आहे, परंतु त्यासंबंधानें त्यांमध्यें मतभेद पडला तर, पट्टयानें दिलेल्या मिळकतीच्या कबजाबद्दलच्या दाव्याचा निवाडा करण्यास ज्या कोर्टास हुकुमत असेल, त्या कोर्टाला तो निर्णय करण्याचा अखत्यार आहे.

मुदत सुरू होते तो दिवस सोडून देणें.

११०. स्थावर मिळकतीच्या पट्टयांत ठरविलेली मुदत अमुक दिवसापासून सुरू होत आहे असें स्पष्ट निर्दिष्ट केलेलें असेल तर, ती मुदत मोजतांना तो दिवस सोडून दिला पाहिजे. सुरू होण्याचा दिवस मुळींच सांगितलेला नसेल तेव्हां, पट्टा दिल्यापासून सदहू मुदत सुरू होते असें समजावें.

वर्षाच्या पट्टयाचा अमल कोठपर्यंत चालतो.

पट्टयांत ठरविलेली मुदत एका वर्षाची अगर अनेक वर्षांची असेल तर, स्पष्ट उलट करार नसल्यास, ज्या दिवसापासून अशी मुदत सुरू होत असेल, त्या दिवसाचा वार्षिक दिवस सगळा भरून जाईपर्यंत त्या पट्टयाचा अमल चालेल.

पट्टा संपला ह्मणण्याची मुखत्यारी.

पट्टयांत ठरविलेली मुदत खलास होण्यापूर्वींच ती संपवितां येईल असें त्या पट्टयांत स्पष्ट सांगितलें असून ती संपविणें कोणाचे मर्जीवर आहे तें त्यामध्यें सांगितलेलें नसेल तेव्हां, ती संपविणें पट्टयानें देणाराच्या मर्जीवर न राहतां, पट्टयानें घेणाराचे मर्जीवर राहील.

पट्टा केव्हां संपतो.

१११. स्थावर मिळकतीचा पट्टा खालीं निर्दिष्ट केलेल्या गोष्टींच्या योगानें संपतो: त्या गोष्टी येणेंप्रमाणें:—

(अ) त्यांत ठरविलेली मुदत भरली ह्मणजे;

(ब) कोणतीही गोष्ट घडण्याच्या शर्तीवर ती मुदत मर्यादित केलेली असेल तेव्हां, ती गोष्ट घडली ह्मणजे;

(क) पट्टयानें देणाराचा त्या मिळकतींतला हितसंबंध कोणतीही विवक्षित गोष्ट घडली ह्मणजे संपावयाचा असेल, अगर अशा हितसंबंधाची

विल्हेवाट करण्याचा त्याचा अधिकार कोणतीही विवक्षित गोष्ट घडे तोंपर्यंत पोंचत असेल, तेव्हां, ती गोष्ट घडली ह्मणजे;

(ड) त्या सगळ्या मिळकतींतला पट्टयानें देणाराचा व पट्टयानें घेणाराचा हितसंबंध एकाच वेळीं एकाच मनुष्यांत आणि एकाच हक्कानें निविष्ट होईल, तर;

(इ) स्पष्ट रीतीनें सोडून दिल्यानें; ह्मणजे, पट्टयानें देणारा व पट्टयानें घेणारा ह्यांचा आपआपसांत करार होऊन पट्टयानें घेणारा त्या पट्टयाखालील आपला हितसंबंध पट्टयानें देणारास देऊन टाकील तेव्हां;

(फ) गर्भित रीतीनें सोडून दिल्यानें;

(ग) पट्टा रद्द झाल्यानें; म्हणजे (१) ज्या अटीमध्यें, ती मोडली तर पट्टयानें देणाराला मिळकतीचा कबजा परत घेण्याचा अख्त्यार आहे असा अगर पट्टा रद्द व्हावा असा स्पष्ट ठराव असेल, ती अट पट्टयानें घेणारा मोडील, किंवा (२) पट्टयानें घेणारा तिसऱ्या असामीला हक्कदार उभा करून अगर त्या मिळकतीवर आपला हक्क आहे असा दावा करून आपलें पट्टयानें घेणाराचें नातें सोडून देईल, व यांपैकीं कोणत्याही प्रसंगीं पट्टयानें घेणारा अगर त्यानें हितसंबंध ज्याला तबदील करून दिलेला असेल तो, पट्टा संपविण्याचा हेतु दर्शविणारें कोणतेंही कृत्य करील, तेव्हां,

(ह) पट्टा संपावा अशी अगर ती पट्टयानें दिलेली मिळकत सोडून दिली पाहिजे अशी अगर सोडून देण्याचा इरादा आहे अशी नोटीस एका पक्षकारानें दुसऱ्या पक्षकारास दिलेली असून तिची मुदत संपली, ह्मणजे.

**(फ) रकमेचें उदाहरण.**

अ हा आपल्या पट्टयानें देणाराकडून, पट्टयानें दिलेल्या मिळकतीबद्दल, विद्यमान पट्टा चालू असतांना सुरू होण्याकरितां म्हणून एक नवीन पट्टा घेतो. असा नवीन पट्टा घेणें म्हणजे पूर्वींचा पट्टा सोडून देणें होय; आणि तसा नवीन पट्टा घेतला म्हणजे तो पूर्वींचा पट्टा संपतो.

**पट्टा रद्द करण्याचा हक्क सोडून देणें.**

११२. कलम १११, रकम (ग), ह्या अन्वयें पट्टा रद्द होण्यास पात्र झाल्यानंतर येणें निघत असलेलें भाडें त्या पट्टयानें देणारानें स्वीकारलें असतां अगर अशा भाड्याकरितां माल अटकावला असतां, अगर पट्टा चालू आहे असें मानण्याचा इरादा ज्या कृत्यावरून दिसून येईल असें कोणतेंही कृत्य त्याकडून घडून आलें असतां, त्यानें तो पट्टा रद्द करण्याचा हक्क सोडून दिला असें समजलें जाईल;

मात्र, पट्टा रद्द होण्यास पात्र झाला आहे ही गोष्ट पट्टयानें देणारास माहीत असली पाहिजे;

आणि पट्टा रद्द झाल्याच्या मुद्यावर पट्टयानें घेणारास मिळकतींतून काढून टाकण्याचा दावा केल्यानंतर भाडें स्वीकारलें असल्यास, तसें केल्यानें पट्टा रद्द करण्याचा हक्क सोडून दिला असें होत नाहीं.

**सोडून देण्याबद्दलची नोटीस अमलांत आणण्याचा हक्क सोडून देणें.**

११३. कलम १११, रकम (ह), ह्याअन्वयें दिलेली नोटीस अमलांत आणण्याचा हक्क, पट्टा चालू आहे असें मानण्याचा इरादा ज्या कृत्यावरून दिसेल असें कोणतेंही कृत्य ती नोटीस देणाराकडून घडून आलें असतां, आणि ती ज्याला दिलेली असेल त्याची स्पष्ट अगर गर्भित संमति असली ह्मणजे, सोडून दिला आहे असें समजलें जाईल.

**उदाहरणें.**

(अ) पट्टयानें देणारा अ हा पट्टयानें घेणारा ब ह्याला पट्टयानें दिलेली मिळकत सोडून देण्याविषयीं नोटीस देतो. नोटिशीची मुदत संपते.

नोटिशीची मुदत संपल्यानंतरचें त्या मिळकतीच्या संबंधानें देणें झालेलें भाडें ब देण्यास हजर करितो आणि अ तें घेतो. तर त्यानें ती नोटीस अमलांत आणण्याचा हक्क सोडून दिला असें समजावें.

(ब) पट्ट्यानें देणारा अ हा पट्ट्यानें घेणारा ब ह्याला पट्ट्यानें दिलेली मिळकत सोडून देण्याविषयीं नोटीस देतो. त्या नोटिशीची मुदत संपते तरी ब मिळकत आपल्या कबजांत ठेवितो. अ हा ब ह्याला पट्ट्यानें घेणाराच्या नात्यानें ती मिळकत सोडण्याबद्दल दुसरी नोटीस देतो. तर पहिली नोटीस अमलांत आणण्याचा हक्क त्यानें सोडून दिला असें समजावें.

भाडें न दिल्याबद्दल पट्टा रद्द न होण्याकरितां इलाज.

११४. भाडें न दिल्यावरून स्थावर मिळकतीचा पट्टा रद्द होऊन संपल्यानंतर पट्ट्यानें देणारा पट्ट्यानें घेणारास त्या मिळकतींतून काढून टाकण्याबद्दल दावा करील तेव्हां, त्या दाव्याची सुनावणी चालली असतांना पट्ट्यानें घेणारा जर ती भाड्याची बाकी, तीवरचें व्याज व पट्ट्यानें देणाराचा दाव्यासंबंधी भरपूर खर्च त्याला देईल अगर देण्यास हजर करील किंवा अशी रकम पंधरा दिवसांच्या आंत देण्याबद्दल कोर्टास बस वाटेल तसें तारण देईल, तर, त्या कोर्टाला, त्या पट्ट्यानें घेणारास त्या मिळकतींतून काढून टाकण्याबद्दलचा हुकुमनामा करण्याऐवजीं, त्याचा तो पट्टा रद्द न होऊं देण्याबद्दल हुकुम करण्याचा अखत्यार आहे; आणि असा हुकुम करण्यांत आला ह्मणजे, पट्टा रद्द झाला नाहीं असें समजून त्या पट्ट्यानें घेणाराला ती मिळकत धारण करण्याचा अखत्यार प्राप्त होईल.

पट्टा सोडून दिल्याचा आणि रद्द झाल्याचा पोटपट्ट्यांवर परिणाम.

११५. स्थावर मिळकतीचा पट्टा स्पष्ट अगर गर्भित रीतीनें सोडून दिल्यावरून, पट्ट्यानें घेणारानें तो पट्टा सोडून देण्याच्या आधीं (भाड्याची रकम शिवाय करून) तत्वतः त्या पट्ट्याच्या इतर शर्तींवर व अटींवर दिलेल्या त्याच मिळकतीच्या अगर तिच्या कोणत्याही भागाच्या पोटपट्ट्यास न्यूनत्व येत नाहीं; परंतु नवीन पट्टा करून घेण्यासाठीं पट्टा सोडलेला असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, पोट-पट्ट्यानें घेणारानें द्यावयाचें भाडें पट्ट्यानें देणारास दिलें पाहिजे, आणि त्यानें पूर्ण करावयाचे करार पट्ट्यानें देणारास पुरे करून घ्यावयाचा अखत्यार आहे.

पोट-पट्ट्यानें घेणारास ठकविण्याकरितां पट्ट्यानें देणारा पट्टा रद्दबातल करण्याचें जमवून आणील तो प्रसंग अगर कलम ११४ ह्याअन्वयें पट्टा रद्द न होऊं दिल्याचा प्रसंग खेरीज करून इतर सर्व प्रसंगीं, सदर्हू प्रकारचा पट्टा रद्द झाल्यानें सदर्हू प्रकारचे सर्व पोटपट्टे रद्द होतात.

पट्ट्याच्या मुदतीनंतर धारण करण्याचा परिणाम.

११६. मिळकत पट्ट्यानें अगर पोट-पट्ट्यानें घेणारा मनुष्य, पट्ट्यानें घेणारास दिलेल्या पट्ट्याची मुदत संपल्यावर ती मिळकत आपल्या कबजांत ठेवील आणि पट्ट्यानें देणारा अगर त्याचा कायदेशीर वारसा त्या पट्ट्यानें घेणाराकडून अगर पोटपट्ट्यानें घेणाराकडून भाडें स्वीकारील अगर त्याच्याकडे कबजा राहण्याविषयीं इतर रीतीनें रुकार देईल, तर, उलट करार नसेल तेव्हां, ज्या कारणाकरितां ती मिळकत पट्ट्यानें दिलेली असेल त्या कारणास अनुसरून १०६ व्या कलमांत सांगितल्याबरहुकुम तो पट्टा पुनः वर्षावर्षांचे अगर महिन्यामहिन्याचे मुदतीनें चालू होईल असें समजावें.

### उदाहरणें.

(अ) अ हा ब ला एक घर पांच वर्षांच्या करारानें भाड्यानें देतो. ब तें घर दरमाहा १०० रुपये भाडें घेण्याच्या करारावर क ह्याला पोटभाड्यानें देतो. तीं पांच वर्षें भरून जातात, परंतु क सदर्हू घराचा कबजा न सोडितां अला तें भाडें भरीत जातो. कचा पट्टा महिन्यामहिन्याचे मुदतीनें पुनः पुनः चालू होतो.

(व) अ हा ब ह्याला क च्या हयातीपर्यंत एक शेत भाड्यानें देतो. क मरतो, परंतु ब हा अच्या रुकारानें मिळकत आपल्या कबजांत राहूं देतो. ब चा पट्टा वर्षावर्षाच्या मुदतीनें पुनः चालू होतो.

शेतकीच्या कामाबद्दलच्या पट्ट्यांस ह्या बाबींतील ठराव लागू नाहींत.

११७. शेतकीच्या कामाबद्दलच्या पट्टयांना ह्या बाबींतील कोणताही ठराव लागू होणार नाहीं; मात्र, स्थानिक सरकारास, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजुरी आणवून, ह्या बाबींतील सर्व अगर विवक्षित ठराव, त्यावेळीं एकादा स्थानिक कायदा अमलांत असल्यास त्याच्या ठरावांबरोबर अगर त्या ठरावांस पात्र राहून शेतकीबद्दलच्या पट्टयांना लागू करण्याबद्दल स्थानिक सरकारी गॅझेटांत जाहिरनामा देऊन ठरविण्याचा अखत्यार आहे.

असा जाहिरनामा, तो प्रसिद्ध केल्याच्या तारिखेपासून साहा महिने भरून जात तोंपर्यंत, अमलांत येणार नाहीं.

---

## बाब ६.

### अदलाबदलीविषयीं.

"अदलाबदल" ह्या शब्दाची व्याख्या.

११८. दोन असामी जेव्हां एकमेकांस एका वस्तूची मालकी दुसऱ्या वस्तूच्या मालकीच्या बदला तबदील करून देतात, आणि त्यांपैकीं कोणतीच वस्तु केवळ पैका नसते अगर दोन्ही वस्तु केवळ पैका असतात, तेव्हां त्या व्यवहारास 'अदलाबदल' ह्मणावें.

अदलाबदल पुरी करण्यासाठीं मिळकत तबदील करून देणें ती, तशी मिळकत विक्रीनें तबदील करून देण्याविषयीं ठरविलेल्या रीतीबरहुकुम मात्र करून देतां येईल.

कोणत्याही मनुष्यास बदली मिळालेली वस्तु काढून घेण्यांत आली असतां त्या मनुष्याचा हक्क.

११९. एका पक्षकारास बदली मिळालेली वस्तु अगर तिचा कोणताही भाग दुसऱ्या पक्षकाराच्या हक्कांत कांहीं उणीव असल्याकारणानें त्या पहिल्या पक्षकाराकडून काढून घेण्यांत आली तर, उलट करार नसल्यास, त्या पहिल्या पक्षकारास, त्याच्या मर्जीप्रमाणें, नुकसान भरून मिळण्याचा अगर आपण तबदील करून दिलेली वस्तु परत मिळण्याचा हक्क आहे.

पक्षकारांचे हक्क व जबाबदाऱ्या.

१२०. ह्या बाबींत उलट ठराव असेल तो प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, प्रत्येक पक्षकारास, आपण दिलेल्या वस्तूच्या संबंधानें विकणाराचे हक्क आणि जबाबदाऱ्या असतील आणि आपण घेतलेल्या वस्तूच्या संबंधानें विकत घेणाराचे हक्क आणि जबाबदाऱ्या असतील.

पैक्याची अदलाबदल.

१२१. पैक्याची अदलाबदल केली ह्मणजे त्या व्यवहाराच्या योगानें प्रत्येक पक्षकार आपण दिलेला पैका खरा असल्याची हमी देतों असें समजावें.

---

## बाब ७.

### देणग्यांविषयीं.

"देणगी"ची व्याख्या.

१२२. "देणगी" ह्मणजे, कोणत्याही मनुष्यानें स्वसंतोषानें व मोबदला घेतल्यावांचून कोणतीही विवक्षित अस्तित्वांत असलेली स्थावर अगर जंगम मिळकत कोणत्याही दुसऱ्या मनुष्याला तबदील करून देण्याचा केलेला व्यवहार होय: मात्र तो व्यवहार त्या दुसऱ्या मनुष्यानें अगर त्याच्या वतीच्या मनुष्यानें स्वीकारला पाहिजे. ह्या व्यवहारांतील पहिल्या मनुष्याला देणगी देणारा आणि दुसऱ्याला देणगी घेणारा ह्मणावें.

स्वीकार केव्हां केला पाहिजे.

सदरीं प्रमाणें दिलेली मिळकत, देणगी देणारा जीवंत असतांना व तो ती द्यावयास समर्थ असतांना स्वीकारली पाहिजे.

देणगी घेणारा मनुष्य जर ती स्वीकारण्यापूर्वी मरण पावला, तर ती देणगी निरुपयोगी होते.

तबदील करून देण्याचा व्यवहार कसा करावा तें.

१२३. स्थावर मिळकतीची देणगी देण्याच्या कारणासाठीं तबदील करून देण्याचा व्यवहार करणें तो, देणगी देणारानें अगर त्याच्या वतीच्या मनुष्यानें सही केलेल्या आणि निदान दोन साक्षीदारांच्या साक्षी असलेल्या खताच्या योगानें केला पाहिजे.

जंगम मिळकतीची देणगी देण्याच्या कारणासाठीं, तबदील करून देण्याचा व्यवहार करणें तो, सदरीं सांगितल्याप्रमाणें नोंदलेल्या व सही केलेल्या खताच्या योगानें अगर मिळकत स्वाधीन करून, करण्याचा अखत्यार आहे.

विकलेला माल ज्याप्रमाणें स्वाधीन करून देतां येतो, त्याचप्रमाणें सदरीं सांगितलेली मिळकत स्वाधीन करण्याचा अखत्यार आहे.

विद्यमान आणि पुढें उत्पन्न होणाऱ्या मिळकतींची देणगी.

१२४. ज्या कोणत्याही देणगींत विद्यमान आणि पुढें उत्पन्न होणारी अशी दोन्ही प्रकारची मिळकत दिलेली असेल, ती देणगी त्या दुसऱ्या प्रकारच्या मिळकतीच्या संबंधानें निरुपयोगी आहे असें समजावें.

अनेक मनुष्यांस दिलेली देणगी त्यांपैकीं एकानें स्वीकारिली नाहीं तर काय होतें तें.

१२५ कोणत्याही वस्तूची देणगी दोन अगर अधिक मनुष्यांस दिलेली असून त्यांपैकीं एकानें ती स्वीकारिली नाहीं तर, ती, त्या मनुष्यानें ती स्वीकारिली असती तर त्याला जो हितसंबंध मिळाला असता त्या हितसंबंधाच्या पुरती निरुपयोगी होईल.

देणगी केव्हां तहकूब करतां अगर रद्द करितां येते.

१२६. देणगी देणारा आणि देणगी घेणारा मनुष्य ह्यांना, परस्परांमध्यें, देणगी देणाराच्या इच्छेवर अवलंबून नसणारी अमुक एक गोष्ट घडली असतां ती देणगी तहकूब होईल अगर रद्द करतां येईल असा करार करण्याचा अखत्यार आहे; परंतु जी देणगी, देणगी देणाराच्या केवळ इच्छेस येईल तेव्हां पूर्णपणें अगर अंशतः रद्द व्हावी असा त्या पक्षकारामध्यें करार असेल, ती देणगी, प्रसंगाप्रमाणें, पूर्णपणें अगर अंशतः निरुपयोगी होईल.

करार ज्या बाबतींत रद्द करितां येतो, त्या बाबतींपैकीं मोबदला नसण्याची अगर मोबदल देण्यास चुकण्याची बाबत खेरीज करून इतर सर्व बाबतींत देणगी रद्द करण्याचा अखत्यार आहे.

सदरीं सांगितलेलीं कारणें खेरीज करून इतर कोणत्याही कारणावरून देणगी रद्द करितां येत नाहीं.

देणगी दिलेली मिळकत कोणा मनुष्यास मोबदला घेऊन तबदील करून दिलेली असेल, व त्यास देणगी रद्द होण्याबद्दलची सदरील प्रकारची अट असल्याची खबर नसेल तर अशा मनुष्याच्या हक्कांस ह्या कलमांतील कोणत्याही ठरावावरून बाध येणार नाहीं असें समजावें.

### उदाहरणें.

(अ) **अ** हा **ब** ह्याला एक शेत देतो, आणि **ब** व त्याचे वंशज **अ**च्या आधीं मरण पावले तर तें शेत परत घेण्याचा हक्क **ब**च्या संमतीनिशीं आपणाकडे ठेवितो. **ब** हा **अ**च्या हयातींत व पाठीमागें कोणी वंशज न राहतां मरतो. **अ**ला तें शेत परत घेण्याचा अखत्यार आहे.

(ब) **अ** हा **ब**ला एक लाख रुपये देतो, आणि **ब**च्या संमतीनिशीं, त्यांपैकीं १०००० रुपये मर्जीस येईल तेव्हां परत घेण्याचा हक्क आपणाकडे ठेवितो. ती देणगी ९०००० रुपयांपुरती कायम राहून त्या १०००० रुपयांच्यासंबंधानें निरुपयोगी होईल. त्या १०००० रुपयांची मालकी **अ**कडेसच राहील.

बोजा असलेल्या देणग्या.

१२७. तबदील करून देण्याच्या एकाच व्यवहारानें कोणत्याही एकाच मनुष्याला देणगी दिलेल्या अनेक वस्तूंपैकीं कोणत्याही एका वस्तूवर कर्तव्यतेचा बोजा असून बाकी-च्यांवर तसा बोजा नसेल त्या बाबतींत, जर देणगी घेणारानें ती देणगी पूर्णपणें स्वीकारली नाहीं तर त्याला त्या देणगीवरून कांहींही मिळणार नाहीं.

तबदील करून देण्याच्या दोन अगर अधिक निरनिराळ्या व स्वतंत्र व्यवहारांच्या योगानें अनेक वस्तु एकाच मनुष्यास देणगी दिलेल्या असतील तेव्हां, त्यांपैकीं एक व्यवहार फायदेशीर असून बाकीचे बोजाचे असले तरी, त्या देणगी घेणाऱ्या मनुष्याला तो फायद्याचा व्यवहार स्वीकारून ते बोजाचे व्यवहार नाकारण्याचा अखत्यार आहे.

नालायक मनुष्यास बोजा असलेली देणगी देणें.

करार करण्यास नालायक अशा मनुष्यानें कोणताही कर्तव्यतेचा बोजा असलेली मिळकत स्वीकारली तरी त्या स्वीकाराचा त्यावर अमल होणार नाहीं. परंतु करार करण्यास लायक झाल्यानंतर आणि त्या कर्तव्यतेची माहिती असतां त्यानें ती दिलेली मिळकत आपणाकडे राहूं दिली, तर त्यावर त्या स्वीकाराचा अमल होईल.

**उदाहरणें**

(अ) क्ष ह्या भरभराटींत असलेल्या जाइंट स्टाक कंपनींत **अ** ह्याचे कांहीं शेर आहेत, आणि य ह्या दुसऱ्या एका बुडत असलेल्या कंपनींतही त्याचे कांहीं शेर आहेत. **य** कंपनींतल्या शेरांसंबंधानें मोठाल्या मागण्या येण्याचा संभव आहे. **अ** हा ब ला जाइंटस्टाक कंपन्यांतले आपले सर्व शेर देतो व हा **य** कंपनींतले शेर घेण्यास नाकारतो. तर त्याला **क्ष** कंपनींतले शेर मिळणार नाहींत.

(ब) **अ** ह्याकडे एक घर कांहीं वर्षांच्या पट्ट्यानें आहे. परंतु त्या मुदतीपर्यंत त्याला व त्याच्या वारसांस त्या घराबद्दल जें भाडें दिलें पाहिजे, तें, तें घर भाड्यानें दिलें असतां जें भाडें येईल त्यापेक्षां जास्त आहे. **अ** हा **ब** ह्याला तो पट्टा देतो, आणि निराळा व स्वतंत्र व्यवहार ह्मणून पैशाची एक रकम देतो. **ब** तो पट्टा घेण्यास इनकार करतो. अशा इनकार करण्याच्या योगानें तो त्या पैशाच्या रकमेस मुकत नाहीं.

सगळी मिळकत देणगीनें ज्याला दिली आहे तो.

१२८. देणगींत जर ती देणाराची सगळी मिळकत दिलेली असली, तर, कलम १२७ ह्याचे ठराव लागू राहून, देणगीच्या वेळीं त्या देणगी देणाराला जें कांहीं कर्ज असेल तें सर्व कर्ज, त्या देणगींत जितकी मिळकत येत असेल तितक्या मिळकतीपुरतें, देणगी घेणारा मनुष्य जातीनें फेडण्याबद्दल जबाबदार होईल.

मुसलमानी कायदा आणि अंतकाळ जवळ आला असतांना केलेल्या देणग्या ह्यांचा बचाव.

१२९. ह्या बाबींतील कोणताही ठराव, अंतकाळ जवळ आला अशा समजुतीनें दिलेल्या जंगम मिळकतीच्या देणगीस लागू नाहीं, अगर अशा कोणत्याही ठरावावरून मुसलमानी कायद्याच्या कोणत्याही नियमास अगर कलम १२३ ह्यांत सांगितलेले प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं हिंदू अगर बौद्ध कायद्यांतील कोणत्याही नियमास बाध येणार नाहीं असें समजावें.

---

## बाब ८.

### व्यवहार्य हक्क तबदील करून देण्याविषयीं.

व्यवहार्य हक्क.

१३०. ज्या कोणत्याही हक्काच्या संबंधानें न्याय मिळण्याचा अधिकार असल्याबद्दल दिवाणी कोर्टाची कबुली आहे, त्या हक्कास व्यवहार्य हक्क म्हणावें: मग तो हक्क अमलांत आणण्याचा दावा प्रत्यक्ष चालू असो किंवा नसो अगर तसा दावा आणणें जरूर होण्यासारखें असो अगर नसो.

कर्ज तबदील करून देणें.

१३१. कोणतेंही कर्ज अगर स्थावर मिळकतींतील कोणताही फायद्याचा हितसंबंध तबदील करून दिल्याबद्दल त्या कर्जासंबंधाच्या रिणकोस अगर ती मिळकत ज्याच्या नांवावर असेल त्या मनुष्यास स्पष्ट नोटीस देण्यांत येई तोंपर्यंत त्या व्यवहाराचा त्या रिणकोवर अगर

ती मिळकत नांवावर असलेल्या मनुष्यावर अमल होणार नाहीं; मात्र, तो रिणको अगर मिळकत ज्याच्या नांवावर असेल तो मनुष्य त्या तबदील करण्याच्या व्यवहारामध्यें पक्षकार असला अगर त्याला तो व्यवहार इतर रीतीनें माहीत असला तर त्यावर तशी नोटीस न देता त्या व्यवहाराचा अमल होईल; आणि, जो कोणताही असा रिणको अगर मनुष्य अशा तबदील करण्याच्या व्यवहारांत पक्षकार नसेल अगर ज्याला तो व्यवहार इतर रीतीनें माहीत झालेला नसेल, आणि ज्याला त्या व्यवहाराबद्दल स्पष्ट नोटीस मिळालेली नसेल तो रिणको अगर मनुष्य त्या कर्जाच्या अगर मिळकतीच्या संबंधानें जो कोणताही व्यवहार करील, तो, त्या तबदील करण्याच्या व्यवहाराविरुद्ध कायदेशीर समजला जाईल.

### उदाहरण.

अला बचें कांहीं कर्ज आहे. ब हा तें कर्ज क ह्याला तबदील करून देतो. नंतर ब हा तें कर्ज अकडून परत मागतो आणि अ, सदरील तबदील करण्याच्या व्यवहाराची खबर नसल्यामुळें तें कर्ज बला देऊन टाकतो. ती फेड कायदेशीर होईल, आणि क ह्याला त्या कर्जाबद्दल अवर दावा करतां येणार नाहीं.

१३२. अशी प्रत्येक नोटीस लेखी असून तिजवर त्या तबदील करून देणाऱ्या मनुष्याची अगर त्या मनुष्यानें ह्या बाबतींत योग्य रीतीनें अधिकार दिलेल्या गुमास्त्याची सही असली पाहिजे. *नोटीस लेखी असून तिजवर सही असली पाहिजे.*

१३३. अशी नोटीस मिळाली ह्मणजे रिणकोनें अगर ती मिळकत ज्या मनुष्याच्या नांवावर असेल त्या मनुष्यानें, त्या तबदील करून देण्याच्या व्यवहारास अनुसरलें पाहिजे; मात्र, रिणको परमुलुखांत राहात असेल अगर मिळकत परमुलुखांत असेल आणि ज्याला तें कर्ज अगर मिळकतींतला हितसंबंध तबदील करून दिलेला असेल त्याचा हक्क त्या मुलुखाच्या कायद्याप्रमाणें पुरता नसेल, तेव्हां सदरील ठराव लागू नाहीं असें समजावें. *रिणकोनें तबदील करण्याचा व्यवहार अमलांत आणिला पाहिजे.*

१३४. कर्ज तबदील करून देणारानें रिणकोच्या दारपणाबद्दल हमी दिली असली तर, उलट करार नसल्यास, ती हमी त्या तबदील करून देण्याच्या वेळेचा मात्र त्याच्या दारपणास लागू आहे असें समजावें; आणि तें कर्ज कांहीं मोबदला घेऊन तबदील करून दिलेलें असेल तेव्हां, ती हमी त्या मोबदल्याच्या रकमेपुरतीच अगर किंमतीपुरतीच आहे असें समजावें. *रिणकोच्या दारपणाबद्दल हमी.*

१३५. एखादा व्यवहार्य हक्क विकण्यांत आला तर, तो हक्क ज्याच्या विरुद्ध असेल त्यानें, त्या विकत घेणारास त्या हक्काची किंमत व त्या विक्रीच्या संबंधाचा खर्च आणि त्या विकत घेणारानें ती किंमत दिल्या दिवसापासूनचें त्या किंमतीवरील व्याज दिलें ह्मणजे, तो पूर्णपणें मोकळा होईल. *ज्या मनुष्याविरुद्ध असलेला हक्क विकण्यांत येईल, त्याची सुटका.*

ह्या कलमाच्या पहिल्या भागांतील कोणताही ठराव—

(अ) असा व्यवहार्य हक्क त्याच्या समाइक वारसास अगर समाईक मालकास विकलेला असेल त्या बाबतींत,

(ब) असा हक्क धनकोच्या देण्याच्या फेडीबद्दल ह्मणून त्या धनकोला विकलेला असेल त्या बाबतींत,

(क) असा हक्क लागू असलेल्या मिळकतीच्या कबजेवाल्यास तो विकलेला असेल त्या बाबतींत,

(ड) असा हक्क खरा असल्याबद्दल योग्य कोर्टानें फैसला दिलेला असेल त्या बाबतींत अगर असा हक्क पुराव्यानें स्पष्ट केला जाऊन फैसल्यासाठीं तयार असेल त्या बाबतींत,

लागू होणार नाहीं.

न्यायाच्या कोर्टाशीं संबंध असलेल्या अमलदारांनीं काय करूं नये.

१३६. कोणत्याही जज्जानें, वकीलानें, मुखत्यारानें, क्लार्कानें, बेलिफानें अगर न्यायाच्या कोर्टाशीं संबंध असलेल्या इतर कोणत्याही अमलदारानें, ज्या कोर्टामध्यें तो आपलें काम चालवीत असेल त्या कोर्टाच्या हुकुमतीखालीं येणारा कोणताही व्यवहार्य हक्क विकत घेतां कामा नये.

कर्ज ज्याला तबदील करून दिलें असेल त्याची जबाबदारी.

१३७. ज्या मनुष्याला कोणतेंही कर्ज अगर बोजा तबदील करून दिलेला असेल त्यानें, तबदील करून देणारा तबदील करून देण्याच्या तारिखेस त्या कर्जाच्या अगर बोजाच्या संबंधानें ज्या जबाबदाऱ्यांस पात्र असेल, त्या सर्व जबाबदाऱ्यांसहित तें कर्ज अगर तो बोजा पत्करिला पाहिजे.

**उदाहरण.**

एका सार्वजनिक कंपनीशीं दगलबाजी करून **अ**ला एक डिबेंचर करून दिलें आहे. **अ** हा तें डिबेंचर **ब**ला विकून तबदील करून देतो. **ब**ला त्या दगलबाजीची खबर नाहीं. तें डिबेंचर **ब**च्या हातांमध्यें कायदेशीर होणार नाहीं.

गहाण दिलेलें कर्ज.

१३८ कोणतेंही विद्यमान अगर पुढें होणारें कर्ज सुरक्षित करण्यासाठीं जेव्हां एकादें कर्ज तबदील करून दिलें जाईल, तेव्हां, तें तबदील करून दिलेलें कर्ज त्या तबदील करून देणारानें अगर तें ज्याला तबदील करून दिलें असेल त्यानें वसूल केलें तर, तें, प्रथमतः अशा वसुलीचा खर्च भागवण्याकडे लाविलें पाहिजे, नंतर, तें कर्ज तबदील करून जी रकम त्या वेळीं सुरक्षित केलेली असेल त्या रकमेच्या भरपाईंत अगर भरपाईकडे खर्चिलें पाहिजे, आणि कांहीं शिल्लक राहिल्यास ती, त्या तबदील करून देणाऱ्या मनुष्याला मिळाली पाहिजे.

बेचनी दस्तऐवजांचा बचाव.

१३९. ह्या बाबींतील कोणताही ठराव बेचनी दस्तऐवजांस लागू होणार नाहीं

---

## परिशिष्ट.

### (अ) स्टाट्यूट.

| वर्ष व चाप्टर. | विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| ८व्या हेन्री राजाच्या कारकीर्दीच्या २७व्या वर्षाचा चाप्टर १० वा. | भोगवट्याबद्दल. | सगळा. |
| एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीच्या १३व्या वर्षाचा चाप्टर ५ वा. | मिळकत दगलबाजीनें परहस्तगत करण्याबद्दल. | सगळा. |
| एलिझाबेथ राणीच्या कारकीर्दीच्या २७व्या वर्षाचा चाप्टर ४ था. | मिळकत दगलबाजीनें परहस्तगत करण्याबद्दल. | सगळा. |
| विल्यम व मेरी ह्यांच्या कारकीर्दीच्या ४थ्या वर्षाचा चाप्टर १६ वा. | गुप्त गहाणांबद्दल. | सगळा. |

## (ब) गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचे आक्ट.

| वर्ष व नंबर. | विषय. | किती रद्द केला तें. |
|---|---|---|
| सन १८४२ चा ११ वा ... ... | पट्टा व फारखत यांविषयीं ... ... | सगळा. |
| सन १८५४ चा ३१ वा ... ... | जमीन परहस्तगत करण्याच्या रीतींबाबद... | कलम १७. |
| सन १८५९ चा ११ वा ... ... | मध्यंतरींचें उत्पन्न व सुधारणा ... ... | कलम १ आणि सरनाम्यांतले कांहीं शब्द [आक्टाचा तरजुमा झालेला नसल्यामुळें ते शब्द निर्दिष्ट करतां येत नाहींत.] |
| सन १८६६ चा ... ... | हिंदुस्तानचा ट्रस्टींबाबद आक्ट ... ... | कलम ३१. |
| सन १८७२ चा ४ था ... ... | [मुंबई इलाक्यास लागू नाहीं] ... ... | |
| सन १८७५ चा २० वा ... ... | [मुंबई इलाक्यास लागू नाहीं] ... ... | |
| सन १८७६ चा १८ वा ... ... | [मुंबई इलाक्यास लागू नाहीं] ... ... | |
| सन १८७७ चा १ ला ... ... | विशेष न्यायाचा आक्ट ... ... | कलम ३५ व ३६ ह्यांतला "लेखी" हा शब्द. |

**(क) रेग्युलेशन.** [ह्यांत बंगाल्याकडचे दोन व मुंबईचा एक असे तीन रेग्युलेशन दिले आहेत ह्यांचा तरजुमा झालेला नाहीं.]

(True Translation.)

Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.

# Act No. VI of 1893.

---

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांचा खालीं लिहिलेला आक्ट आलीजनाब गव्हर्नर जनरल यांनीं तारीख ९ माहे मार्च सन १८९३ रोजीं मंजूर केला तो सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं यावरून प्रसिद्ध केला असे :—

---

## सन १८९३ चा आक्ट ६ वा.

---

मलिका मुअज्जमा महाराणी व्हिक्टोरिया, हल्लींच्या राणी साहेब, यांनीं सर दिनशा माणेकजी पेटिट यांना, त्यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतीपर्यंत व त्या मुदतींत धारण करण्यासाठीं, आणि त्यांच्या मरणापासून व त्यांच्या मरणोत्तर लगेच त्यांचे द्वितीय पुत्र फ्रामजी दिनशा पेटिट, एस्क्वायर, यांनीं व त्यांच्या औरस पुरुष वारसांनीं धारण करण्यासाठीं, आणि अशी औरस संतति न राहिल्यास, जो शेषाधिकार राहील तो सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या औरस पुरुष वारसांनीं धारण करण्यासाठीं, नुक्ताच दिलेला बारोनेटचा किताब व पदवी हीं जोंपर्यंत चालू राहतील तोंपर्यंत सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट, बारोनेट, यांची मिळकत, म्हणजे, एक लक्ष पंचवीस हजार रुपयांच्या सालीना उत्पन्नाचे मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनचे बॉण्ड आणि मुंबई बेटांतील "पेटिट हाल" या नांवाचें म्यानशन-हौस व जमीनजुमला हीं चालू राहून त्यांच्या आधारावर तो किताब व पदवी हीं चालावीं या हेतूनें सदर्हू बॉण्ड वगैरे मिळकत नियुक्त करण्यासाठीं व तत्संबंधी इतर कारणासाठीं आक्ट.

ज्या अर्थीं मलिका मुअज्जमा महाराणी व्हिक्टोरिया, परमेश्वराच्या कृपेनें ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या राणीसाहेब व डिफेन्डर ऑफ् धि फेथ, यांनीं आपल्या राज्यकारकीर्दीच्या चौपन्नाव्या वर्षाच्या सेप्टेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस किंवा त्या तारखेच्या सुमारास वेस्टमिन्स्टर मुक्कामीं बादशाही सनद देऊन आणि आपल्या स्वदस्तुरचें वारंट देऊन असें जाहीर केलें आहे कीं आम्ही आमच्या विशेष कृपेस्तव, विशेष परिज्ञानामुळें व केवळ स्वइच्छेनें, आमच्या विश्वासांतील व विशेष लोभांतील सर दिनशा माणेकजी पेटिट, नैट, राहणार मुंबई बेटांतील "पेटिट हाल," यांस बारोनेटच्या पदवीस, स्थितीस व दरजास चढविलें आहे, नेमिलें आहे व आणिलें आहे, आणि त्यांस म्हणजे सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांस आम्ही आमच्यातर्फे, आमच्या वारसांतर्फे व स्थानापन्नातर्फे सदर्हू बादशाही सनदेवरून ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याचे बारोनेट, त्यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतीपर्यंत व त्या

मुदतींत, केलें, नेमिलें व बनविलें असून हा बारोनेटचा किताब त्यानीं, व त्यांच्या मरणापासून व मरणोत्तर लगेच त्यांचे ह्मणजे सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचे द्वितीय पुत्र फ्रामजी दिनशा पेटिट, एस्क्वायर, यांनीं व त्यांच्या असलेल्या व होतील त्या औरस पुरुष वारसांनीं धारण करावयाचा आहे, आणि अशी संतति न राहिल्यास, जो शेषाधिकार राहील तो सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या असलेल्या व होतील त्या औरस पुरुष वारसांनीं धारण करावयाचा आहे;

आणि ज्या अर्थी मलिका मोआझमांच्या सरकाराशीं त्या बाबतींत केलेला करार पुरा करण्यासाठीं सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांची अशी इच्छा आहे कीं आपल्याला, आणि सदर्हू बारोनेटची पदवी ज्यांना प्राप्त होईल ते सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट आणि अनुक्रमें आपले व सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांचे औरस पुरुष वारस यांना सदरीं सांगितल्याप्रमाणें देण्यांत आलेल्या किताबाची पदवी जिच्या आधारावर चालू राहील अशी बाजवी मिळकत आपल्या स्वतःच्या आणि सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट वगैरे सदरीं सांगितल्या प्रकारच्या वारसांच्या संबंधानें निरंतरची नियुक्त करावी;

आणि ज्या अर्थी सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचें मुंबई पेटांत "पेटिट हाल" या नांवाचें म्यान्शन-हौस व जमीनजुमला असून त्यांत त्यांचा वंशपरंपरागत अप्रतिबंध हक्कसंबंध आहे, आणि त्यांची अशी इच्छा आहे कीं सदरीं सांगितलेला करार पुरा करण्यासाठीं अनुक्रमें एक लक्ष पंचवीस हजार रुपयांच्या सालीना उत्पन्नाचे मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनचे बॉण्ड किंवा डिबेन्चर आणि सदर्हू म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांच्या संबंधानें जे उपयोग, जे जिम्मे व जीं कारणें या आक्टांत पुढें परिमित केलीं आहेत व ठरविलीं आहेत त्या उपयोगांप्रीत्यर्थ, त्या जिम्म्यांवर व त्या कारणांसाठीं ते बॉण्ड किंवा डिबेन्चर आणि सदर्हू म्यान्शन-हौस व जमीनजुमला हीं नियुक्त करावीं;

आणि ज्या अर्थी सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांची अशीहि इच्छा आहे कीं, सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट व त्यांचे औरस पुरुष वारस आणि तसेच सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचे औरस पुरुष वारस यांच्यांतून ज्यांना ज्यांना सदर्हू बारोनेटचा किताब व पदवी हीं प्राप्त होतील त्यांनीं त्यांनीं, सदर्हू किताब व पदवी हीं त्यांना प्राप्त होतील त्या वेळीं, सदर्हू किताब व पदवी त्यांना प्राप्त होतेवेळीं जें जें कोणतेंहि नांव किंवा जीं जीं कोणतींहि नांवें ते धारण करीत असतील त्या त्या नांवाच्या किंवा नांवांच्या ऐवजीं "दिनशा माणेकजी पेटिट" हें नांव घ्यावें व धारण करावें; व ज्या अर्थीं त्यांची अशीहि इच्छा आहे कीं मुंबईचे आकौंटंट जनरल, मुंबईचे कलेक्टर, आणि मुंबईचे चीफ़ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेट, या सर्वांनीं विवक्षित काळीं, सदरीं सांगितलेल्या म्युनिसिपल बॉण्डांच्या आणि म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांच्या संबंधानें ट्रस्टी होऊन, त्याच प्रकारें त्या सिक्यूरिटींच्या संबंधाचे व तें म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांच्याहि संबंधाचे या आक्टाचे साधारण हेतु सिद्धीस नेण्यासाठीं व या आक्टावरून दिलेले अधिकार बजाविण्यासाठींहि ट्रस्टी व्हावें;

आणि ज्या अर्थीं सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांची अशी इच्छा आहे कीं, आपण, सदर्हू बारोनेटच्या किताबाची पदवी चालू राहण्याच्या कारणासाठीं, सदर्हू बॉण्ड आणि सदर्हू म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांच्या संबंधानें जे उपयोग, जे जिम्मे व जीं कारणें या आक्टांत पुढें परिमित केलीं आहेत व ठरविलीं आहेत त्या उपयोगांप्रीत्यर्थ, त्या जिम्म्यांवर व त्या कारणांसाठीं ते बॉण्ड व तें म्यान्शन-हौस व जमीनजुमला हीं सदर्हूप्रमाणें नियुक्त करण्याचें कबूल केल्याप्रमाणें नियुक्त करावीं;

आणि ज्या अर्थीं सदर्हू हेतु गव्हर्नर जनरल यांच्या कायदे व कानू करणाऱ्या कौन्सिलाच्या आक्टाच्या द्वारें सिद्धीस नेणें योग्य आहे;

त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे :—

ट्रस्टींची संस्थापना.

१. आर्थर फ्रेडरिक कॉक्स, एस्क्वायर, मुंबईचे अकौण्टण्ट जनरल, जेम्स माकनाव् काम्पबेल, एस्क्वायर, मुंबईचे कलेक्टर, व चार्लस फिलिप कूपर, एस्क्वायर, मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेट, आणि त्यांचे त्यांचे स्थानापन्न, ह्मणजे, जे जे कोणी विवक्षित काळीं मुंबईचे अकौण्टण्ट जनरल, मुंबईचे कलेक्टर व मुंबईचे चीफ प्रेसिडेन्सी म्याजिस्ट्रेट असतील त्या सर्वांची "धि ट्रस्टीझ ऑफ धि दिनशा माणेकजी पेटिट बारोनेटसी" या नांवाची व हुद्याची एक संस्थापित मंडळी असेल व त्यांना या आक्टावरून सदर्हू नांवाची व हुद्याची संस्थापित मंडळी ह्मणून नेमिलें आहे, आणि त्यांना निरंतरचें स्थानापन्नत्व व सामायिक शिक्का हीं असतील; आणि सदर्हू आर्थर फ्रेडरिक कॉक्स, जेम्स माकनाव् काम्पबेल व चार्लस फिलिप कूपर, आणि त्यांचे त्यांचे सदर्हू स्थानापन्न (ज्यांना या आक्टांत पुढें "संस्थापित मंडळी" असें ह्मटलें आहे) हे, अशी संस्थापित मंडळी या नात्यानें या आक्टावरून दिलेले अधिकार बजाविण्यासाठीं व या आक्टाचे हेतु सिद्धीस नेण्यासाठीं ट्रस्टी असतील व त्यांना या आक्टावरून तसे ट्रस्टी नेमिलें आहे.

सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या वारसांनीं त्यांचें नांव घेणें.

२. सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट व त्यांचे औरस पुरुष वारस आणि सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचे इतर सर्व औरस पुरुष वारस यांच्यांतून, सदर्हू पदवी देण्यांत आलेल्या सनदेंतील अटींअन्वयें ज्याला ज्याला सदर्हू किताब व पदवी हीं प्राप्त होतील त्यानें त्यानें इतर कोणत्याहि नांवाच्या किंवा नांवांच्या ऐवजी व बदला "दिनशा माणेकजी पेटिट" हें नांव आपल्याला घेतलें पाहिजे; आणि सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट व तसेच त्यांचे सदर्हू प्रकारचे औरस पुरुष वारस आणि सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचे सदर्हू प्रकारचे इतर सर्व औरस पुरुष वारस यांना व्यक्तितः व परंपरेनें "दिनशा माणेकजी पेटिट" हें नांव दिलें पाहिजे व त्यांनीं हरेक प्रसंगीं दिनशा माणेकजी पेटिट " हें नांव अनुक्रमें आपलें आहे असें सांगितलें पाहिजे, आपल्याला घेतलें पाहिजे व त्या नांवानें आपली सही केली पाहिजे.

नियुक्त केलेल्या मिळकतीचें उत्पन्न नांवावर करून देणें व त्याचा विनियोग करणें.

३. हा आक्ट ठरल्यापासून व ठरल्यानंतर लगेच, एक लक्ष पंचवीस हजार रुपयांहून कमी नाहीं इतक्या सालीना उत्पन्नाचे मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनचे बॉण्ड सदर्हू संस्थापित मंडळीच्या नांवावर करून दिले पाहिजेत; आणि त्या बॉण्डांच्या संबंधानें यांत पुढें निर्दिष्ट केलेल्या जिम्म्यांवर व कारणांसाठीं सदर्हू संस्थापित मंडळीनें ते धारण केले पाहिजेत, (ह्मणजे) सदर्हू संस्थापित मंडळीनें, सदर्हू बॉण्डांच्या ऐवजाची मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनकडून फेड होईपर्यंत किंवा ते विकावे असें सदर्हू ट्रस्टींच्या नजरेस येऊन त्यांजकडून ते विकले जात तोंपर्यंत, ते जिम्म्यांवर धारण करण्याचें चालू ठेवून, सदर्हूप्रमाणें फेड किंवा विक्री झाली असतां त्या फेडीच्या किंवा विक्रीच्या वेळीं जी रकम येईल ती, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या सरकारचे किंवा हिंदुस्तान सरकारचे, अगर त्यांपैकीं कोणत्याहि एका सरकारानें ज्यांच्या मुदलाची अगर व्याजाची हमी दिलेली असेल तसे कोणतेहि स्टॉक, फण्ड, अगर सिक्युरिटी घेण्याच्या कामीं लाविली पाहिजे, व त्याच रीतीनें, जरूर पडेल त्याप्रमाणें वारंवार, असे स्टॉक, फंड किंवा सिक्युरिटी, तशाच किंवा त्यासारख्याच प्रकारच्या दुसऱ्या स्टॉकांच्या, फंडांच्या किंवा सिक्युरिटींच्या ऐवजीं बदलण्याचें, फिरविण्याचें व पालटण्याचें चालू ठेविलें पाहिजे; आणि याशिवाय सदर्हू संस्थापित मंडळीनें वेळोवेळीं जिम्म्यांवर, सदर्हू बाण्डांचें, स्टॉकांचें, फंडांचें व सिक्युरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज व सालीना उत्पन्न हीं सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या नैसर्गिक आयुर्मयादेच्या मुदतींत त्यांच्या फायद्याकडे व फायद्यासाठीं; आणि सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या मरणोत्तर सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट हे जिवंत राहिल्यास, सदर्हू दिनशा माणेकजी पेटिट यांच्या मरणापासून व मरणोत्तर लगेच सदर्हू फ्रामजी दिनशा

पेटिट यांच्या नैसार्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतींत त्यांच्या फायद्यासाठीं; आणि त्यांच्यांतून ह्मणजे सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट व फ्रामजी दिनशा पेटिट यांच्यातून जो कोणी मागें जिवंत राहील त्याच्या मरणापासून व मरणोत्तर लगेच, कायद्याचा कोणताहि नियम किंवा न्यायनीति तसें होण्यास विरुद्ध असली तथापि, प्रसंगानुसार सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांचा किंवा सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस यानात्यानें, सदर्हू बादशाही सनदेवरून सदरीं सांगितल्याप्रमाणें दिलेला किताब विवक्षित काळीं प्राप्त होऊन त्या किताबाचा उपभोग घेत असलेल्या मनुष्याच्या फायद्यासाठीं दिलीं पाहिजेत व लाविलीं पाहिजेत; आणि सदर्हू संस्थापित मंडळीनें, सदर्हू बारोनेटचा किताब व पदवी हीं ज्यास प्राप्त व्हावयाचीं असा कोणी सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांचा किंवा सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस नसल्यास व नाहींसा झाल्यास सदर्हू बॉण्ड सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट, त्यांचे वहिवाटदार, आडमिनिस्ट्रेटर व असैनी यांसाठीं जिम्म्यावर धारण केले पाहिजेत; आणि शेवटचा शेषाधिकार किंवा उत्तराधिकार, सदर्हू बारोनेटचा किताब व पदवी हा चालू राहातील त्या मुदतींत व सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस सदरीं सांगितल्याप्रमाणें आतां कोणी नाहीं असें होइ तोंपर्यंत कोणत्याहि वेळीं सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट, त्यांचे वहिवाटदार, आडमिनिस्ट्रेटर व असैनी हे, लेख किंवा मृत्युपत्र किंवा इतर अभयपत्र अगर अभयपत्रें करून कायदेशीर रीतीनें लावून देण्यास, नांवावर करून देण्यास, देण्यास व त्याची व्यवस्था करण्यास मुखत्यार आहेत.

अल्पवयाच्या मुदतींत उत्पन्नाचा विनियोग.

४. सदर्हू बादशाही सनदेच्या अटींअन्वयें विवक्षित काळीं सदर्हू बारोनेटच्या पदवीवर हक्क असून त्या पदवीचा उपभोग घेत असलेला कोणताहि मनुष्य अल्पवयी असल्यास त्याच्या अल्पवयाच्या मुदतींत सदर्हू संस्थापित मंडळीस आपल्या नजरेप्रमाणें योग्य वाटेल तेवढाच सदर्हू ट्रस्ट फंडाच्या सालीना व्याजाचा, डिव्हिडण्डाचा व उत्पन्नाचा आणि सदर्हू ठिकाणांच्या उत्पन्नाचा भाग अशा बारोनेटच्या सदरीं सांगितल्या प्रकारच्या अल्पवयाच्या मुदतींतील प्रत्येक वर्षीं त्याचें पाळणपोषण, विद्याभ्यास व फायदा यांसाठीं व यांप्रीत्यर्थ सदर्हू संस्थापित मंडळीनें दिला व लाविला पाहिजे; आणि त्या मंडळीनें वेळोवेळीं, सदर्हू ट्रस्ट फंडाच्या सदर्हू सालीना डिव्हिडण्डांचा, व्याजाचा व उत्पन्नाचा व सदर्हू ठिकाणांच्या उत्पन्नाचा बाकी राहील तो भाग, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या सरकारचे किंवा हिंदुस्तान सरकारचे, अथवा त्यांपैकीं कोणत्याहि एका सरकारानें ज्यांच्या मुदलाची अगर व्याजाची हमी दिलेली असेल तसे, स्टॉक, फण्ड व सिक्यूरिटी घेण्यांत लाविला पाहिजे, आणि असा बारोनेट वयांत आला ह्मणजे सदर्हूप्रमाणें लाविलेला पैसा व तत्संबंधी सांचलेली सर्व रकम हीं त्याला, किंवा तो फर्मावील त्याप्रमाणें, व निखालस त्याच्याच फायद्यासाठीं दिलीं पाहिजेत, नांवावर करून दिलीं पाहिजेत व लावून दिलीं पाहिजेत.

म्यान्शन हौस जो कोणी विवक्षित काळीं बारोनेट असेल त्याच्याच उपयोगास लावणें.

५. सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांनीं आपणासाठीं व आपल्या वारसांसाठीं ह्मणून धारण केलेलें मुंबइ "बेटांतील पेटिट हाल" या नांवाचें म्यान्शन-हौस व जमीनजुमला हीं तत्संबंधी हक्कांसहित, अंगांसहित व उपांगांसहित, यांत पुढें ठरविलेल्या जिम्म्यांवर, हा आक्ट ठरल्यापासून व ठरल्यानंतर लगेच, ह्या आक्टाच्या अमलबजावणीवरून सदर्हू संस्थापित मंडळीच्या उपयोगांत व उपयोगासाठीं राहिलीं पाहिजेत, (ह्मणजे) जिम्म्यावर, सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या नैसर्गिक आयुमर्यादेच्या मुदतीपर्यंत व त्या मुदतींत त्यांच्यासाठीं; आणि सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या मरणोत्तर सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट हे जिवंत राहिल्यास, सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या मरणापासून व मरणोत्तर लगेच, जिम्म्यावर, सदर्हू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतीपर्यंत व त्या मुदतींत त्यां-

ह्यासाठीं; आणि त्यांच्यांतून ह्मणजे सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट व फ्रामजी दिनशा पेटिट यांच्यांतून जो कोणी मागें जिवंत राहील त्याच्या मरणापासून व मरणोत्तर लगेच जिम्म्यावर, सदहू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या ज्या औरस पुरुष वारसांस सदहू बादशाही सनदेवरून दिलेला बारोनेटचा किताब सदरीं सांगितल्याप्रमाणें प्राप्त होईल त्यांच्यासाठीं; आणि सदहू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या ज्या औरस पुरुष वारसांस सदहू बारोनेटचा किताव व पदवी हीं सदरीं सांगितल्याप्रमाणें प्राप्त व्हावयाचीं असे कोणी वारस नसल्यास व नाहींसे झाल्यास, जिम्म्यावर, सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या ज्या औरस पुरुष वारसांस सदहू किताव प्राप्त होईल त्यांच्यासाठीं; आणि असे शेवटीं सांगितल्याप्रकारचे कोणी औरस पुरुष वारस नसल्यास व नाहींसे झाल्यास, निरंतर रीतीनें सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट आणि त्यांचे वारस व असैनी यांच्यासाठीं सदहूप्रमाणें राहिलीं पाहिजेत; आणि शेवटचा शेषाधिकार किंवा उत्तराधिकार, सदहू बारोनेटचा किताव व पदवी हीं चालू राहतील त्या मुदतींत व सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस सदरीं सांगितल्याप्रमाणें आतां कोणी नाहीं असें होई तोंपर्यंत कोणत्याहि वेळीं सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट आणि त्यांचे वारस व असैनी हे, जेणेंकरून तो शेषाधिकार किंवा उत्तराधिकार ब्रिटिश इंडियाचे रहिवाशी असलेल्या पारशी लोकांस कायद्याप्रमाणें हस्तगत करतां येईल किंवा त्याची त्यांना कायद्याप्रमाणें व्यवस्था करतां येईल, असा लेख किंवा मृत्युपत्र किंवा दुसरें कोणतेंहि अभयपत्र अगर दुसरीं कोणतींहि अभयपत्रें करून, देण्यास, परहस्तगत करण्यास, व त्यांची व्यवस्था करण्यास मुखत्यार आहेत.

फायदा घेणारा मनुष्य दिनशा माणेकजी पेटिट या नांवाचा उपयोग करण्यास नाकारील, हयगय करील किंवा तसा उपयोग करण्याचें बंद करील तेव्हां हितसंबंध कोणाला प्राप्त होतो.

६. मात्र असें ठरविलें आहे कीं हमेश, ज्या कोणत्याहि मनुष्यास विवक्षित काळीं सदहू बारोनेटची पदवी प्राप्त झाली असेल त्या मनुष्यास सदहू स्टॉकांचें, फण्डांचें व सिक्यूरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज व उत्पन्न घेण्याचा किंवा सदहू जमीनजुमला कबज्यांत ठेवण्याचा अगर त्याचीं भाडीं व फायदे घेण्याचा या आक्टापरत्वें हक्क प्राप्त झाल्यानंतर सगळ्या एका वर्षाच्या मुदतीपर्यंत, किंवा सदहू पदवी प्राप्त झाली त्यावेळीं तो मनुष्य अल्पवयी असल्यास तो एकवीस वर्षांच्या वयाचा झाल्यानंतर सगळ्या एका वर्षाच्या मुदतीपर्यंत, तो मनुष्य यांत पूर्वीं ठरविल्याप्रमाणें "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा उपयोग करण्यास नाकारील किंवा हयगय करील तर, किंवा, अशा कोणत्याहि मनुष्यानें त्या नांवाचा सदहूप्रमाणें उपयोग केला असून तो मनुष्य आपल्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतींत लागोपाठ साहा क्यालेंडर महिन्यांच्या मुदतीपर्यंत त्या नांवाचा सदहूप्रमाणें उपयोग करण्याचें बंद करील तर, सदहू कोणत्याहि एका किंवा दोन्ही प्रसंगीं सदहू "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा उपयोग करण्यास सदहूप्रमाणें नाकारणाऱ्या किंवा हयगय करणाऱ्या, अगर त्या नांवाचा उपयोग केला असून त्याचा उपयोग करण्याचें सदहूप्रमाणें बंद करणाऱ्या मनुष्याचा सदहू ट्रस्ट फंडांतील व ठिकाणांतील हक्कसंबंध किंवा हितसंबंध त्याच्या बाकी राहिलेल्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतींत तहकूब केला जाईल; आणि याप्रमाणें तहकूब केल्याच्या कोणत्याहि व प्रत्येक मुदतींत, सदहू स्टॉकांचें, फंडांचें व सिक्यूरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज व उत्पन्न हीं, आणि सदहू जमीनजुमल्याचा कबजा व त्याचा वस्तुतः भोगवटा आणि तसेंच त्याचीं भाडीं व फायदे हीं, सदहू "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा उपयोग करण्यास सदहूप्रमाणें नाकारणारा किंवा हयगय करणारा अगर उपयोग करण्याचें बंद करणारा मनुष्य मरण पावला असतां ज्या मनुष्यास, प्रसंगानुसार सदहू फ्रामजी दिनशा पेटिट किंवा सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचा औरस पुरुष वारस या नात्यानें, सदहू बादशाही सनदेवरून दिलेली बारोनेटची पदवी व तिचा उपभोग हीं प्राप्त व्हावयाचीं, त्या मनुष्यास प्राप्त होऊन त्यांचीं होतील असें समजावें;

मात्र त्या वेळीं असा पुरुष वारस कोणी नसेल तर, सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट यांचें पुरुष संतान आतां कोणी राहिलेलें नाहीं असें झालें असतां ज्या मनुष्यास किंवा मनुष्यांस तीं प्राप्त होण्याचा हक्क असेल त्यास किंवा त्यांस तीं प्राप्त होऊन त्याचीं किंवा त्यांचीं होतील असें समजावें.

भर्तृदत्तविधवावेतनाबदलचा खर्च नियुक्त केलेल्या मिळकतीवर घालण्याचा अधिकार.

७. सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट व फ्रामजी दिनशा पेटिट आणि ज्या ज्या कोणत्याहि मनुष्यास सदर्हू बारोनेटचा किताब वेळोवेळीं प्राप्त होईल तो प्रत्येक मनुष्य यांच्यांतून जो कोणी सदर्हू "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा, त्या संबंधानें या आक्टांत सदरीं सांगितलेल्या मुदतीपर्यंत, या आक्टांत सदरीं ठरविल्याप्रमाणें उपयोग करण्यास नाकारणार नाहीं, हयगय करणार नाहीं किंवा तसा उपयोग करण्याचें बंद करणार नाहीं तो सदर्हू पदवीचा वस्तुतः उपभोग घेत असल्या मुदतींत, त्यास, कोणत्याहि स्त्रीशीं किंवा स्त्रियांशीं त्याचा विवाह होण्यापूर्वीं किंवा झाल्यानंतर, कोणताहि दस्तऐवज किंवा लेख अगर कोणतेहि दस्तऐवज किंवा लेख करून त्यांवरून ज्या कोणत्याहि स्त्रीशीं किंवा स्त्रियांशीं त्याचा विवाह होईल त्या स्त्रीस किंवा स्त्रियांस तिच्या किंवा त्यांच्या आयुर्मर्यादेपर्यंत, आणि वैधव्यजीवनांशाच्या किंवा इतर कायदेशीर अगर यथापद्धति हक्कांच्याबदला द्यावयाच्या तिच्या किंवा त्यांच्या भर्तृदत्तविधवावेतनाबदल, दाहा हजार रुपयांच्या रकमेहून अधिक नाहीं इतकी कोणतीहि सालियाना नेमणूक किंवा वार्षिक रकम ठरवून किंवा नेमून देण्याचा अधिकार आहे. सदर्हू दस्तऐवज किंवा लेख रद्द करण्याचा अधिकार त्यानें आपलेकडे ठेवून किंवा न ठेवितां, दोन किंवा अधिक विश्वसनीय साक्षिदारांच्या समक्ष त्यानें त्यांवर मोहर करून ते स्वाधीन केले पाहिजेत, आणि ते या हल्लींच्या अधिकाराअन्वयें व त्यावरहुकुम केलेल्या कोणत्याहि नेमणुकीपरत्वें जी कोणतीहि सालियाना नेमणूक किंवा कोणत्याहि सालियाना नेमणुकी त्या वेळीं चालत असून देण्यांत येत असतील त्या सालियाना नेमणुकीस किंवा सालियाना नेमणुकींस पात्र असून बाधक नसले पाहिजेत; आणि सदरीं सांगितलेल्या सालियाना नेमणुकीवर किंवा वार्षिक रकमेवर कोणत्याच प्रकारच्या करांचा व खर्चाचा बोजा असूं नये, व त्यांतून कोणतीहि रकम बाद होतां नये, आणि ती सालियाना नेमणूक किंवा वार्षिक रकम ठरवून किंवा नेमून देणाऱ्या मनुष्याच्या मरणोत्तर लगेच ती सुरू झाली पाहिजे व अमलांत आली पाहिजे; आणि ती सदर्हू स्टॉकांचें, फंडांचें व सिक्यूरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज व सालीना उत्पन्न यांतून प्रतिवर्षीं जून महिन्याच्या तिसाव्या तारखेरोजीं एक, व डिसेंबर महिन्याच्या एकतिसाव्या तारखेरोजीं एक, अशा दोन साहामाही सारख्या हप्तयांनीं देत गेलें पाहिजे व देण्याजोगी असेल; आणि सदर्हू साहामाही हप्तयांपैकीं प्रथमचा हप्ता देणें तो, अशी सालियाना नेमणूक किंवा वार्षिक रकम नेमून देणाऱ्या मनुष्याच्या मरणोत्तर सदर्हू साहामाही दोन तारखांपैकीं जी तारीख पहिल्यानें येईल त्या तारखेरोजीं दिला पाहिजे; मात्र असें ठरविलें आहे कीं हमेश, ज्या कोणत्याहि मनुष्यास सदर्हू किताब प्राप्त होईल त्या मनुष्यानें "दिनशा माणेकजी पेटिट", या नांवाचा उपयोग करण्यास नाकारलें असल्यास किंवा हयगय केली असल्यास अगर त्यानें आपल्या आयुर्मर्यादेच्या मुदतींत लागोपाठ साहा क्यालेंडर महिनेपर्यंत त्या नांवाचा उपयोग करण्याचें बंद केल्यास, सदर्हू प्रत्येक ठराव व नेमणूक,—तीं मग त्यानें पूर्वीं केलेलीं असोत अगर मागाहून केलेलीं असोत,—रद्द व निष्फळ होतील, आणि तसा कोणताहि ठराव किंवा नेमणूक अस्तित्वांत असली तथापि त्याअन्वयें उपस्थित झालेली किंवा नेमून दिलेली सदर्हू प्रकारची कोणतीहि सालियाना नेमणूक अमलांत येणार नाहीं, किंवा तिची रकम सदर्हू स्टॉक, फंड, व सिक्यूरिटी यांच्यांतून दिली जाणार नाहीं, किंवा तिचा त्यांच्यावर बोजा घातला जाणार नाहीं.

भर्तृदत्तविधवावेतनांच्या रकमेची इयत्ता.

८. मात्र असें ठरविलें आहे कीं हमेश, सदर्हू स्टॉकांचें, फंडांचें व सिक्यूरिटींचें सदर्हू डिव्हिडण्ड व्याज व सालीना उत्पन्न हीं, या आक्टांत सदरीं दिलेल्या अधिकारा-

बरहुकूम जें कोणतेंहि भर्तृदत्तविधवावेतन करून देण्यांत येईल किंवा तशीं कोणतींहि वेतनें करून देण्यांत येतील त्याच्या किंवा त्यांच्या बदल अगर त्याच्या किंवा त्यांच्या संबंधानें वीस हजार रुपयांच्या वार्षिक रकमेहून अधिक रकम त्यांतून दिली जाण्यास एकाच वेळीं पात्र होणार नाहींत, ह्मणजे, त्या अधिकाराच्या परत्वें किंवा अन्वयें सदहू डिव्हिडण्ड, व्याज व सालीना उत्पन्न यांच्यावर, हा ठराव येथें दाखल केला नाहीं तर, भर्तृदत्तविधवावेतनांच्या संबंधानें एकंदरीनें वीस हजार रुपयांहून अधिक अशा ज्या वार्षिक रकमेचा कोणत्याहि एकाच वेळीं बोजा पडण्याचा संभव आहे तसा बोजा त्यांच्यावर पडल्यास, ज्या वार्षिक रकमेच्या किंवा तिच्या ज्या भागाच्या योगानें सदहूप्रमाणें अधिक रकम होईल ती वार्षिक रकम किंवा तो तिचा भाग वाद करण्यांत येईल व दिला जाणार नाहीं.

लग्नाच्या बायकांचा म्यान्शन-हौसांत हितसंबंध नाहीं.

९. "पेटिट हॉल" या नांवाचें सदहू म्यान्शन-हौस व जमीनजुमला आणि त्यांतील हक्क, त्यांचीं अंगें व उपांगें हीं, सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या किंवा सदहू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या लग्नाच्या बायकोस, अगर तीं प्राप्त होण्याचा क्रमशः हक्क असलेल्या मनुष्यांपैकीं कोणत्याहि मनुष्यांच्या लग्नाच्या बायकांस, पारसी लोकांचा कोणताहि रिवाज किंवा कायदा याअन्वयें किंवा इतर कोणत्याहि प्रकारें, सदहू म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांत जो कोणताहि हक्क, हितसंबंध, किंवा हक्कसंबंध असेल किंवा असल्याचा त्या दावा सांगतील त्या हक्कास, हितसंबंधास, किंवा हक्कसंबंधास पात्र होणार नाहींत असें समजावें.

नांवावर करून देणाराच्या हयातीपर्यंतच नांवावर करून देणें.

१०. जो शेवटचा शेषाधिकार किंवा उत्तराधिकार अनुक्रमें सर दिनशा माणेकजी पेटिट, त्यांचे वारस, वहिवाट करणारे, आडमिनिस्ट्रेटर व असैनी यांसाठीं या आक्टांत सदरीं सांगितल्याप्रमाणें जिम्म्यावर ठेवण्याचें ठरविलें आहे त्याशिवाय इतर बावतींत असा ठराव करण्यांत येत आहे कीं सदहू बारोनेटचा किताब व पदवी हीं चालू राहतील तोंपर्यंत, आणि सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या ज्या औरस पुरुष वारसांना सदहू बारोनेटचा किताब व पदवी हीं सदहू पदवी देण्यांत आलेल्या सनदेंतील अटींअन्वयें प्राप्त व्हावयाचीं तसे कोणी वारस आतां राहिले नाहींत असें होईपर्यंत, ज्यांच्या तर्फे सदहू बॉण्डांचें, स्टॉकांचें, फंडांचें, व सिक्यूरिटींचें डिव्हिडण्ड, व्याज, व सालीना उत्पन्न, अगर "पेटिट हॉल" या नांवाचें सदहू म्यान्शन-हौस व जमीनजुमला यांच्या संबंधानें या आक्टावरून जिम्मे ठरविले आहेत त्या सदहू सर दिनशा माणेकजी पेटिट यांनीं व सदहू फ्रामजी दिनशा पेटिट यांनीं आणि अनुक्रमें त्यांचा त्यांचा कोणताहि औरस पुरुष वारस यानें, सदहू बॉण्ड, स्टॉक, फण्ड, व सिक्यूरिटी किंवा त्यांचा कोणताहि भाग, अगर त्यांचें डिव्हिडण्ड, व्याज व सालीना उत्पन्न किंवा त्यांचा कोणताहि भाग अगर सदहू म्यान्शन-हौस किंवा जमीनजुमला किंवा त्याचा कोणताहि भाग हीं, त्यांच्या त्यांच्या नैसर्गिक आयुर्मर्यादेच्या मुदतींत जो त्यांना हक्कसंबंध किंवा हितसंबंध असेल त्याहून अधिक हक्कसंबंधासाठीं किंवा हितसंबंधासाठीं किंवा त्या आयुर्मर्यादेहून अधिक मुदतीसाठीं आणि "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा ते सदहू आयुर्मर्यादेच्या जेवढ्या मुदतींत उपयोग करण्याचें चालू ठेवितील तेवढ्या मुदतीहून अधिक मुदतीसाठीं नांवावर करून देतां नये, त्यांची व्यवस्था करतां नये, तीं परहस्तगत करतां नये, तीं दानपत्रानें देतां नये किंवा त्यांजवर बोजा घालतां नये; आणि सदरीं सांगितलेल्या प्रकारच्या कोणत्याहि मनुष्यास, एकट्यालाच, किंवा सदहूपैकीं कोणत्याहि एका अगर अधिक मनुष्यांशीं मिळून किंवा इतर कोणत्याहि मनुष्याशीं अगर मनुष्यांशीं मिळून, अनुक्रमें सदहू फ्रामजी दिनशा पेटिट यांच्या व सर दिनशा माणेकजी पेटिट यांच्या किंवा त्यांच्यांतून कोणाहि एकाच्या औरस पुरुष वारसांसाठीं या आक्टांत सदरीं जिम्म्यांवर परिमित केलेले सदहू हक्कसंबंध, अथवा सदहू बॉण्डांच्या, स्टॉकांच्या,

फंडांच्या व सिक्यूरिटींच्या डिव्हिडंडाचे, व्याजाचे व सालीना उत्पन्नाचे, किंवा सदर्हू मान्शन-हौस व जमीनजुमला यांचे व तत्संबंधी भाड्यांचे व फायद्यांचे या आक्टावरून ज्या कोणत्याहि मनुष्याच्या किंवा मनुष्यांच्या फायद्यासाठीं जिम्मे ठरविले असतील त्या कोणत्याहि मनुष्याच्या किंवा मनुष्यांच्या फायद्यासाठीं यावरून किंवा यांत उपस्थित केलेला किंवा जिम्म्यावर ठरविलेला कोणताहि हक्कसंबंध किंवा हितसंबंध चालू ठेवण्याचें बंद करण्याचा अगर त्यास प्रतिबंध करण्याचा, अथवा या आक्टांत सदरीं लिहिलेल्या ठरावांच्या खऱ्या उद्देशाप्रमाणें सदर्हू ठिकाणें प्राप्त होण्याच्या, तीं धारण करण्याच्या किंवा तीं उपभोगण्याच्या अगर त्यांचा स्वीकार करण्याच्या किंवा तीं घेण्याच्या संबंधानें अशा कोणत्याहि मनुष्याला अगर मनुष्यांला मनाई करण्याचा कोणताहि अधिकार नाहीं असें समजावें; व सदर्हू ठिकाणांमध्यें किंवा त्यांतून कोणत्याहि ठिकाणांत सदरीं सांगितल्याप्रकारच्या कोणत्याहि मनुष्यास, त्याचे हयातींत किंवा त्या हयातीच्या ज्या मुदतींत तो "दिनशा माणेकजी पेटिट" या नांवाचा उपयोग करण्याचें चालू ठेवील तेवढ्याच मुदतींत त्याला असलेल्या हक्कसंबंधाहून किंवा हितसंबंधाहून अधिक हक्कसंबंध किंवा हितसंबंध आहे असें कोणत्याहि कायद्याच्या किंवा न्यायनीतीच्या कोर्टानें समजूं नये; आणि या आक्टाच्या उद्देशाविरुद्ध कोणतेंहि दानपत्र, नेमणूकपत्र किंवा अभयपत्र करून देण्याचा प्रयत्न केल्यास तसा प्रत्येक प्रयत्न निष्फळ होईल व त्याप्रमाणें या कलमावरून फर्माविण्यांत व ठरविण्यांत येत आहे.

**स्टॉक, फंड किंवा सिक्यूरिटी ज्यास्त घालून नियुक्त केलेली मिळकत वाढविणें.**

११. यापुढें कोणत्याहि वेळीं किंवा वेळांमध्यें सदर्हू सर दिनशा माणेकजी पेटिट हे किंवा इतर कोणताहि पुरुष अगर स्त्री किंवा कोणतेहि पुरुष अगर स्त्रिया हीं या आक्टाच्या जिम्म्यांस विवक्षित काळीं पात्र असलेले फंड व सिक्यूरिटी वाढविण्यास इच्छीत असून त्या कारणासाठीं व त्या उद्देशानें आपल्या स्वतःच्या खर्चानें, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याच्या सरकारचें किंवा हिंदुस्तान सरकारचें अगर त्यांतून कोणत्याहि एका सरकारानें ज्यांच्या मुदलाची किंवा व्याजाची हमी दिलेली असेल असे, कोणतेंहि स्टॉक, फंड किंवा सिक्यूरिटी सदर्हू संस्थापित मंडळीच्या नांवावर करून देतील व तिच्या स्वाधीन करतील तर त्या वेळीं, व याप्रमाणें गोष्ट घडेल त्या प्रत्येक प्रसंगीं, सदर्हू संस्थापित मंडळी, मुंबईचे गव्हर्नर यांचें पूर्वी अनुमत घेऊन, असे स्टॉक, फंड व सिक्यूरिटी स्वीकारण्यास मुखत्यार आहे; आणि मग पुढें असे स्टॉक, फंड व सिक्यूरिटी हीं सदर्हू संस्थापित मंडळीनें मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनच्या सदर्हू बॉण्डांच्या संबंधानें या आक्टावरून जे जिम्मे ठरविले आहेत त्याच जिम्म्यांवर, किंवा त्या जिम्म्यांपैकीं जे कोणतेहि त्या त्या वेळीं चालू असून अमलांत असण्याजोगे असतील त्या जिम्म्यांवर धारण केलीं पाहिजेत: मात्र हमेश असें ठरविलें आहे कीं या आक्टाच्या जिम्म्यांस विवक्षित काळीं पात्र असणाऱ्या स्टाकांची, फंडांची व सिक्यूरिटींची एकंदर रकम कोणत्याहि वेळीं पन्नास लक्ष रुपयांहून अधिक असूं नये.

**म्यानूशन-हौसचा विमा, व विम्याच्या संबंधानें मिळालेल्या पैशाचा विनियोग.**

१२. सदर्हू संस्थापित मंडळीनें "पेटिट हाल" या नांवाच्या म्यानूशन-हौसचा, व तत्संबंधी सर्व उपगृहांचा व ऑफिसांचा, आणि तसेंच वेळोवेळीं त्यांस ज्यास्त जोडलेल्या किंवा त्यांच्या बदला योजलेल्या किंवा यापुढें या आक्टाच्या कोणत्याहि जिम्म्यांस पात्र होणाऱ्या इतर सर्व घरवाड्यांचा व इमारतींचा आग लागून नाश किंवा तोटा होऊं नये म्हणून त्यांचा आपल्या नांवें, किंवा सदर्हू संस्थापित मंडळींत विवक्षित काळीं जे मनुष्य असतील त्यांच्या नावें, योग्य विमा उतरून ठेविला पाहिजे; आणि या आक्टाच्या जिम्म्यांस विवक्षित काळीं पात्र असलेल्या फंडांच्या उत्पन्नाचा कोणताहि भाग त्या कारणासाठीं लावण्यास सदर्हू संस्थापित मंडळी मुखत्यार आहे; आणि याप्रमाणें विमा उतरलेल्या सदर्हू जमीनजुमल्यांचा व ठिकाणांचा किंवा त्यांच्या कोणत्याहि भागाचा आग लागून नाश किंवा तोटा झाल्यास त्यावेळीं सदर्हूप्रमाणें उतरलेल्या विम्याच्या संबंधानें जो पैसा येईल तो, सदर्हूप्रमाणें आग लागून नाश किंवा

तोटा झालेला जमीनजुमला व ठिकाण पुनः बांधण्याच्या किंवा पुनः स्थापन करण्याच्या कामीं सदर्हू संस्थापित मंडळीच्या हुकुमाअन्वयें खर्च केला पाहिजे, अगर तो, विवक्षित काळीं सदर्हू बारोनेटच्या किताबावर हक्क असून त्याचा उपभोग घेत असलेल्या मनुष्यानें अर्जी केली असतां मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांचें अनुमत घेऊन—हें अनुमत मुंबई सरकारानें ठराव करून जाहीर केलें पाहिजे—सदर्हू किताबाची योग्यता चालू राहण्यास योग्य असा मुंबई इलाक्यांत इतर जमीनजुमला विकत घेण्याच्या कामीं खर्च करण्याचा अधिकार आहे ; व याप्रमाणें नवीन जमीनजुमला विकत घेण्यांत येईल त्या प्रसंगीं तो, तत्संबंधी खरेदीचें काम पुरें झाल्यापासून व त्यानंतर लगेच, या आक्टांत ठरविलेल्या उपयोगांस व जिम्म्यांस, किंवा त्यांतून त्या वेळीं जे कोणतेहि चालू असून अमलांत असण्याजोगे असतील त्या उपयोगांस व जिम्म्यांस, तो जमीनजुमला या आक्टाच्या पांचव्या कलमांत स्पष्टपणें दाखल केला असता तर ज्या रीतीनें व जितका पात्र असता व पात्र झाला असता त्याच रीतीनें व तितकाच पात्र असेल व पात्र होईल. सदर्हूप्रमाणें विम्याच्या संबंधानें आलेला पैसा सदर्हूप्रमाणें खर्च करण्यांत येई तोंपर्यंत तो किंवा त्याचा कोणताहि भाग १६व्या कलमांत निर्दिष्ट केलेल्या सरकारी सिक्यूरिटींतून कोणत्याहि सिक्यूरिटी घेण्याच्या कामीं लावण्यास सदर्हू संस्थापित मंडळी मुख्त्यार आहे.

१३. "पेटिट हाल" या नांवाचें सदर्हू म्यानूशन-हौस व ठिकाण आणि त्यांत जें कांहीं ज्यास्त वाढविण्यांत येईल तें सर्व, आणि तसेंच या आक्टावरून ठरविलेल्या सदर्हू म्यानूशन-हौस व ठिकाण यांच्या संबंधाच्या जिम्म्यांस वेळोवेळीं पात्र असतील किंवा होतील त्या सर्व इतर घरवाड्या व जमीनजुमले हीं सदर्हू बादशाही सनदेवरून दिलेल्या बारोनेटच्या किताबाचा विवक्षित काळीं उपभोग घेणाऱ्या मनुष्यानें आपल्या खर्चानें चांगलीं दुरुस्त, व्यवस्थेशीर व चांगल्या स्थितींत ठेविलीं पाहिजेत; आणि अशा कोणत्याहि मनुष्यानें, सदर्हू म्यानूशन-हौस, जमीनजुमला व ठिकाणें किंवा त्यांतून कोणतेंहि, चांगल्या स्थितींत ठेवण्यास कोणत्याहि वेळीं हयगय केल्यास किंवा नाकारल्यास, तें चांगल्या स्थितींत ठेवण्याचा किंवा ठेवविण्याचा, आणि त्या संबंधानें होणारा खर्च या आक्टांतील ठरावांस विवक्षित काळीं पात्र असलेल्या फंडांच्या उत्पन्नांतून देण्याचा सदर्हू संस्थापित मंडळीस अधिकार आहे.

म्यानूशन-हौस व इतर जमीनजुमला दुरुस्त ठेवणें.

१४. सदर्हू संस्थापित मंडळीनें, "पेटिट हाल" या नांवानें प्रसिद्ध असलेलें मानूशन-हौस व जमीनजुमला आणि तसेंच या आक्टाप्रत्वें विवक्षित काळीं त्या मंडळीच्या नांवावर करून देण्यांत येईल तो कोणताहि जमीनजुमला हीं, सदर्हू बादशाही सनदेवरून दिलेल्या बारोनेटच्या किताबावर हक्क असून त्या किताबाचा वस्तुतः उपभोग घेणाऱ्या मनुष्याच्या अनुमतानें आणि मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या सदरीं सांगिल्याप्रमाणें जाहीर करून दिलेल्या अनुमतानें, मुंबई इलाक्यांत दुसऱ्या जमिनी किंवा जमीनजुमले घेण्याकरितां विकण्यासाठीं, अगर तशा जमिनी किंवा जमीनजुमले घेऊन त्यांच्या बदला देण्यासाठीं जिम्म्यांवर धारण केलीं पाहिजेत, आणि तीं याप्रमाणें दुसऱ्यांच्या बदला देण्यांत येतील तेव्हां अदलाबदलीची किंमत सारखी होण्यासाठीं लागेल तो कोणताहि पैसा दिला किंवा घेतला पाहिजे.

म्यानूशन-हौस किंवा इतर जमीनजुमला विकण्याचा अगर तीं बदलून दुसरीं घेण्याचा संस्थापित मंडळीचा अधिकार.

१५. आणि या कलमावरून असें ठरविण्यांत येत आहे कीं सदर्हूप्रमाणें कोणतीहि विक्री करणें ती, जाहीर लिलांव करून किंवा खासगी करार करून करण्याचा अधिकार आहे, व सदर्हू जमीनजुमल्याच्या किंवा त्याच्या कोणत्याहि भागाच्या विक्रीच्या कोणत्याहि शर्तींमध्यें, किंवा विक्रीसंबंधी अगर अदलाबदलीसंबंधी करारांत, मालकीच्या संबंधानें किंवा मालकी प्राप्त झाल्याबदलच्या पुराव्याच्या अगर तिच्या सुरवातीच्या संबंधानें अगर इतर कोणत्याहि संबंधानें कोणत्याहि अटी करण्यास, आणि विक्रीसंबंधी किंवा अदलाबदलीसंबंधी कोणताहि करार विकत घेतल्यानें किंवा रद्द केल्यानें किंवा त्यांत फेरबदल केल्यानें व पुनः विकल्यानें किंवा पुनः अदलाबदल केल्यानें कोणतेंहि नुकसान झाल्यास त्याबदल जबाबदार न होतां तसा करार विकत

अशा विक्रीच्या किंवा अदलाबदलीच्या संबंधानें संस्थापित मंडळीचे अधिकार.

घेण्यास, किंवा रद्द करण्यास किंवा फेरबदल करण्यास व पुनः विकण्यास किंवा पुनः अदलाबदल करण्यास सदर्हू संस्थापित मंडळी मुखत्यार आहे.

अशा विक्रीनें किंवा अदलाबदलीनें मिळालेला पैसा व्याजू लावणें.

१६. आणि या कलमावरून असें ठरविण्यांत येत आहे कीं सदर्हू संस्थापित मंडळीनें, सदर्हूप्रमाणें करण्यांत आलेल्या कोणत्याहि विक्रीच्या किंवा अदलाबदलीच्या संबंधानें येणें झालेला सर्व पैसा घेतला पाहिजे, आणि तो, सोईप्रमाणें होईल तितका लौकर, ग्रेट ब्रिटन व आयर्लंड या संयुक्त राज्याचे किंवा हिंदुस्तान सरकारचे, अगर त्यांतून कोणत्याहि एका सरकारानें ज्यांच्या मुदलाची व व्याजाची हमी दिलेली असेल असे, कोणतेहि स्टॉक, फंड किंवा सिक्यूरिटी विकत घेण्याच्या कामीं, किंवा मुंबई इलाक्यांत असून सदर्हू किताबाची योग्यता चालू राहण्यास योग्य अशा दुसऱ्या जमिनी अगर जमीनजुमले विकत घेण्याच्या कामीं लावला पाहिजे; मात्र इतकेंच कीं याप्रमाणें जमिनी किंवा जमीनजुमले विकत घेणें असतील त्या प्रत्येक प्रसंगीं, सदर्हू किताबावर त्यावेळीं हक्क असून त्याचा वस्तुतः उपभोग घेणाऱ्या मनुष्याचें त्या संबंधानें अनुमत घेतलें पाहिजे.

अशा विक्रीच्या किंवा अदलाबदलीच्या योगानें जो पैसा उत्पन्न होऊन व्याजू लावण्यांत येईल तो व ज्या जमिनी प्राप्त होतील त्या या आक्टावरून ठरविलेल्या जिम्म्यावर धारण करणें.

१७. आणि या कलमावरून असें ठरविण्यांत येत आहे कीं सदर्हूप्रमाणें विकत घेण्यांत येतील ते स्टॉक, फंड, व सिक्यूरिटी आणि जमिनी किंवा जमीनजुमले, आणि अदलाबदल करून घेण्यांत येतील त्या जमिनी किंवा जमीनजुमले हीं तत्संबंधी खरेदीचें किंवा अदलाबदलीचें काम पुरें झाल्यापासून व पुरें झाल्यानंतर लगेच, मुंबई शहरच्या म्युनिसिपल कार्पोरेशनच्या सदर्हू बॉण्डाच्या संबंधानें व "पेटिट हाल" या नांवाचें सदर्हू म्यानशन-हौस व ठिकाण यांच्या संबंधानें या आक्टांत व या आक्टावरून जे जिम्मे ठरविले आहेत त्या जिम्म्यांवर किंवा त्यांतून जे कोणतेहि त्या वेळीं चालू असून अमलांत असण्याजोगे असतील त्या जिम्म्यांवर धारण केलीं पाहिजेत.

संस्थापित मंडळीचा खर्च भरून काढणें.

१८. या आक्टांतील जिम्म्यांपरत्वें व ठरावांपरत्वें सदर्हू संस्थापित मंडळीच्या हातीं जो पैसा येईल त्या पैशांतून आपल्यापाशीं पैसा ठेवून घेण्याचा, आणि सदरीं सांगितलेले अधिकार, जिम्मे व ठराव बजाविण्याच्या कामीं किंवा बजाविण्यासाठीं अगर तत्संबंधानें त्या मंडळीस जो व्यय होईल, जो तोटा सोसावा लागेल व जो खर्च करावा लागेल तो सर्व भरून काढण्याचा त्या मंडळीस अधिकार आहे.

विद्यमान हक्क कायम ठेवणें.

१९. मात्र असें ठरविलें आहे कीं उलीयाजा मलिका माआंझमा महाराणी साहेब, त्यांचे वारस व स्थानापन्न यांना आणि ( सदर्हू दिनशा माणेकजी पेटिट, त्यांचे डिव्हैसी [मृत्युपत्रावरून ज्यांना मिळकत मिळेल ते मनुष्य], वारस व असैनी यांच्याखेरीज ) इतर कोणताहि पुरुष किंवा कोणतीहि स्त्री व इतर कोणतेहि पुरुष किंवा कोणत्याहि स्त्रिया आणि राजकीय व संस्थापित मंडळ्या, आणि अनुक्रमें त्याचे, तिचे व त्यांचे वारस, स्थानापन्न, वहिवाट करणारे व आड्मिनिस्ट्रेटर या सर्वांना व प्रत्येकाला "पेटिट हाल" या नांवाचें सदर्हू म्यानशन-हौस व जमीनजुमला किंवा त्यांचा कोणताहि भाग अगर कोणतेहि भाग यांत किंवा यांवर जो कोणत्याहि प्रकारचा हक्कसंबंध, हक्क, मालकी, हितसंबंध, दावा सांगण्याचा हक्क व मागणी सांगण्याचा हक्क, हा आक्ट ठरण्याचे पूर्वी, असेल व त्यांनीं धारण केला व उपभोगिला असेल, आणि हा आक्ट ठरला नसता तर त्यांना असता, असूं शकता किंवा असण्याचा संभव असता, अगर त्यांनीं धारण केला किंवा उपभोगिला असता अगर ते धारण करूं अगर उपभोगूं शकते अगर त्यांनीं धारण करण्याचा किंवा उपभोगण्याचा संभव असता तो सर्व हक्कसंबंध, हक्क, मालकी, हितसंबंध, दावा सांगण्याचा हक्क व मागणी सांगण्याचा हक्क त्या सर्वांना व प्रत्येकाला असेल असें समजावें.

( सही. ) जे. एम. म्याक्फर्सन,
ऑफिशिएटिंग सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार.

(True Translation.)
Y. M. KELKAR,
Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.